# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

November 2022 - January 2023 / Issue No. 7
Price : Rs. 30/-

26 January 74 Republic Day

MACCIA 100

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अॅग्रीकल्चर






G20
भारत 2023 INDIA




WORLD ECONOMIC FORUM

# विदर्भ विकास परिषदेची क्षणचित्रे...




विदर्भ विकास परिषदेत मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी. व्यासपीठावर उद्योगमंत्री ना. उदय सामंत, माजी खासदार अजय संचेती, चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, सौ. संगिता पाटील, संदिप भंडारी, प्रदिप पेशकर, किरण पातूरकर, निकेश गुप्ता, मधुसुदन रूंगठा, विनय अकुलवार, कॅप्टन सी. रणधीर, आनंद चारी, नितीन लोणकर, विजय वेदमुथा आदी मान्यवर.



उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करतांना अध्यक्ष ललित गांधी. समवेत महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ. संगिता पाटील, माजी खासदार अजय संचेती.



कौशल्य विकास मंत्री ना. मंगलप्रभात लोढा यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करतांना एमआयडीसी इंडस्ट्री असोसिएशनचे अध्यक्ष कॅप्टन चंद्रमोहन रणधीर. समवेत विनय अकुलवार, विजय वेदमुथा.



माजी वस्त्रोद्योगमंत्री व आमदार प्रकाश आवाडे यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करतांना बुटीबोरी इंडस्ट्री असोसिएशनचे अध्यक्ष नितीन लोणकर व एमआयडीसी असोसिएशन अमरावतीचे अध्यक्ष किरण पातुरकर.



माजी खासदार अजय संचेती यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करतांना वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी. समवेत युथ विंगचे चेअरमन संदिप भंडारी.



राध्येशाम चांडक यांचा सत्कार सोबत अध्यक्ष ललित गांधी.



शासकीय समन्वय समितीचे चेअरमन प्रदिप पेशकर यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करतांना डिफेन्स क्लस्टर असोसिएशन विदर्भचे अध्यक्ष दुष्यंत देशपांडे व कळमेश्वर इंडस्ट्री असोसिएशनचे अध्यक्ष अमर मोहिते.

MACCIA 100
GLORIOUS 95 YEARS - MARCHING TOWARDS CENTENARY
Apex Chamber of the State 1927-2027
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

November 2022 - January 2023/ Issue No. 7

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर**

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४०००००१
फोन : (०२२) २२८५५८५९/६०
ई-मेलः maccia@maccia.org.in
वेबसाईट : www.maccia.org.in

**संपादकीय समिती**

- अध्यक्ष
  **ललित गांधी**
- वरिष्ठ उपाध्यक्ष
  **उमेश दाशरथी**
- उपाध्यक्ष
  **करुणाकर शेट्टी**
  **शुभांगी तिरोडकर**
  **रविंद्र माणगावे**
  **सुधाकर देशमुख**
  **चंद्रशेखर पुनाळेकर**
  **तनसुख झांबड**
- प्रभारी सरकार्यवाह
  **सागर नागरे**
- संपादक
  **विनी दत्ता**
- सहसंपादक
  **अविनाश पाठक**

- **शाखा कार्यालय**
- २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक - १. फोनः (०२५३)२५७७७०४ । ई-मेलः nsk@maccia.org.in
- **रत्नागिरी जिल्हा कार्यालय**
  जावकर प्लाझा, जयस्तंभ, रत्नागिरी.

# अंतरंग

१ मनोगत
२ दोन दिवसात ९० हजार कोटींची गुंतवणूक
३ तीस दिवसात उद्योगांना परवानगी देणार : नाम. उदय सामंत
४ पर्यटन विकासासाठी ४०० कोटींची तरतूद : पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा
५ भारतीय उद्योग जगताला उज्वल भविष्यकाळ : ललित गांधी
६ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स आणि रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० यांच्यात सामंजस्य करार
७ ई-कॉमर्सचे आव्हान थोपवण्यिसाठी हायटेक टेक्नॉलॉजी वापरा : ललित गांधी
८ नॉन वोव्हन बॅग्स व पेपर उत्पादनांना बंदी आदेशातून वगळण्याचा महत्वपूर्ण निर्णय
९ शेठ वालचंद हिराचंद यांना भारतरत्न पुरस्कारासाठी सरकारकडे मागणी करणार - ललित गांधी
१० शेठ वालचंद हिराचंद यांच्या जयंतीनिमित्त..स्फूर्तीदायक अविस्मरणीय भेट
११ तरुणांना रोजगारासाठी उद्योग जगताचा सहभाग महत्त्वपूर्ण : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे
१२ महाराष्ट्र चेंबर व सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन सामंजस्य करारामुळे दोन्ही राज्याच्या व्यापार उद्योगांचा विकास होईल : राज्यपाल भगतसिंह कोश्यारी
१३ महाराष्ट्रातील विमानसेवांना गती देण्यात येईल : केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधीया
१४ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने रेल्वे विषयक केलेल्या मागण्या प्राधानान्ये पूर्ण करू : रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव
१५ सातारा जिल्हा डेव्हलपमेंट फोरमची स्थापना
१६ 'जी २०' परिषदेचे पुण्यात उद्घाटन
१७ विदर्भ औद्योगिक विकासाचे धोरण ठरणार : ललित गांधी
१८ फिक्कीच्या संचालक मंडळ निवडणुकीत तिसऱ्यांदा ललित गांधी विजयी

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.



# संपादकीय..

ललित गांधी

**अध्यक्ष**

सन्माननीय बंधू-भगिनींनो,
नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...!

आपल्या सर्वांचे सहकार्य व सदिच्छांची शिदोरी घेऊन 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' च्या ४० व्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्विकारून एक वर्ष पूर्ण झाले.

माझे व्यवस्थापन समिती व कार्यकारिणीतील सर्व सहकारी, विविध समित्यांचे पदाधिकारी व सर्व सभासद या सर्वांच्या सक्रीय पाठबळामुळे मला राज्याच्या व्यापार, उद्योग, कृषी उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी कार्यरत राहाता आले याचे विशेष समाधान आहे.

कोरोना च्या दोन वर्षांच्या खडतर कालखंडानंतर एकूणच व्यापार, उद्योग क्षेत्रातील सर्व घटक अडचणींना सामोरे जात असताना मिळालेली ही जबाबदारी आव्हानात्मक तर आहेच, सोबत आम्ही सर्व नवीन कार्यकारिणीने या कार्यकाळासाठी महत्वाकांक्षी योजनाही हाती घेतल्या आहेत.

चेंबरचे संस्थापक 'शेठ वालचंद हिराचंद' यांचे भारतीय उद्योग जगतातील अफाट योगदान, त्यांची धाडसी वृत्ती या गोष्टी या सर्व आव्हानांना पार करण्यासाठी उर्जा देत असतात. त्यांच्यासह ज्या विविध दिग्गज मान्यवरांनी चेंबरला नेतृत्व दिले त्या सर्वांच्या कार्याच्या प्रेरणेतून आपल्याला सर्व उद्दीष्टे पूर्ण करावयाची आहेत.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने माझ्या अध्यक्षपदाच्या पहिल्या एक वर्षाच्या कार्यकाळातील काही आकडेवारी आपल्यासमोर मांडताना मला आनंद होत आहे. या कार्यकाळातील संक्षिप्त अहवाल लवकरच आपल्याला पाठवित आहे.

पुढील कार्यकाळात याहीपेक्षा खूप अधिक काम करावयाचे आहे. आपल्या सर्वांच्या सक्रीय सहभागाशिवाय ते अशक्य आहे. आपण 'महाराष्ट्र चेंबर' च्या कामकाजात आपला सहभाग वाढवावा, ही विशेष विनंती.

पहिल्या वर्षभराच्या कामकाज करताना माझ्याकडून काही त्रुटी, उणीवा राहिल्या असतील तर आपण उदार अंतकरणाने क्षमा करावी.

मिळालेले यश आपल्या सर्वांच्या सहकार्याने, सामूहीक प्रयत्नांना मिळालेले यश आहे, अपयश काही असले, त्रुटी, उणिवा राहिल्या असतील त्या सर्व माझ्या व्यक्तिगत आहेत या भावनेने आपल्याला पुन्हा धन्यवाद देत आहे.

## पहिल्या वर्षातील वाटचाल

- नवीन सभासद - ७००
- नवीन पेट्रन सभासद - ३०
  (चेंबरच्या इतिहासातील एका वर्षात झालेले सर्वाधिक पेट्रन सभासद)
- बँकेत नव्याने केलेली गूंतवणुक - १ कोटी १५ लाख
- चेंबरच्या मुंबई येथील मुख्यालयाचे (हेरीटेज इमारत) दुरूस्तीचे अत्यावश्यक मात्र दीर्घकाळ प्रलंबित कामास सुरूवात (दुरूस्ती कामामुळे मुख्यालयातील कार्यक्रम आयोजन बंद करावे लागल्याने कामकाजाला मर्यादा पडत आहेत.)
- चेंबरच्या इतिहासात ५० वर्षानंतर प्रथमच नवीन स्थावर मालमत्ता खरेदी, पश्चिम महाराष्ट्र विभागासाठी 'पुणे' येथे स्वतःच्या मालकीच्या ऑफीस जागेचे बुकींग.
- चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यालय संकुलासाठी उद्योग विभागाकडून 'नाशिक' येथे नाममात्र दरात १०,००० चौ.फुट जागा मिळण्याची प्रक्रिया सुरू.
- जिल्हास्तरावर कार्यालय सुरू करण्याच्या योजने अंतर्गत पहिले जिल्हा कार्यालय 'रत्नागिरी' येथे सुरू.

राज्याच्या व्यापार, उद्योग, कृषि उद्योग, सेवा उद्योग क्षेत्राची शिखर संस्था या नात्याने 'महाराष्ट्र चेंबर' च्या कामाचा आवाका फार मोठा आहे. तो अजुनही विस्तारत आहे. संपूर्ण राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी चेंबर प्रयत्नशील आहे. त्याचा भाग म्हणून 'विदर्भ विकास परिषद' यशस्वीपणे संपन्न झाली. यापुढील वाटचालीत आपल्या सर्वांचा सक्रीय सहभाग अपेक्षित आहे, तो मिळेल याचा विश्वास ही आहे.

धन्यवाद !

# महाराष्ट्रात १ लाख ३७ हजार कोटींची नवी गुंतवणूक

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत करार





**स्वित्झर्लंड येथील दावोसमध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम' मध्ये महाराष्ट्र पॅव्हेलियन चे उद्घाटन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योग मंत्री उदय सामंत दुसऱ्या फोटोमध्ये 'वर्ल्ड इकॉनॉमिक आंतरराष्ट्रीय' परिषदेत विविध कंपन्यासोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत, अतिरीक्त मूख्य सचिव भुषण गगराणी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एम आयडीसी चे सीईओ विपिन शर्मा यांच्या उपस्थितीत करार करण्यात आले.**

**दावोस :** दावोस येथे गेल्या दोन दिवसांत विविध उद्योगांशी १ लाख ३७ हजार कोटीं गुंतवणुकीचे सामंजस्य करार झाले. प्रथमच दावोस इथे महाराष्ट्राचे इतक्या मोठ्या संख्येने करार झाल्यामुळे देशी आणि विदेशी गुंतवणूकदारांचा राज्यावर विश्वास असल्याचे स्पष्ट होत असून या गुंतवणूकदारांचे प्रकल्प लवकरात लवकर सुरु होतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे म्हणाले, महाराष्ट्रात उद्योग वाढीसाठी पोषक वातावरण असून उत्तम पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळ आहे. त्यामुळे उद्योजकांना मॅग्नेटीक म हाराष्ट्रात गुंतवणूक करण्याची संधी असून दावोस मध्ये महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी उद्योजकांनी पसंती दर्शवली आहे. दरम्यान महाराष्ट्रात गुंतवणूक केलेल्या उद्योजकांना सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले. या वेळी अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, MIDC मुख्य कार्यकारी अधिकारी विपिन शर्मा उपस्थित होते.

### हायटेक आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात ५४ हजार २७६ कोटी

हायटेक आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात सहा कंपन्यांसोबत ५४ हजार २७६ कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार झाले, त्याद्वारे ४३०० रोजगार निर्माण होणार आहेत.

### ऊर्जा आणि इलेक्ट्रीकल व्हेईकल क्षेत्रात ४६ हजार ८०० कोटी

ऊर्जा क्षेत्रातील नविनीकरणीय ऊर्जा आणि इलेक्ट्रीकल व्हेईकल क्षेत्रात ४६ हजार ८०० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. त्या माध्यमातून ४५ हजार रोजगार निर्माण होणार आहेत.

### आयटी, फिनटेक, डेटा सेंटर या क्षेत्रामध्ये ३२ हजार ४१४ कोटी

माहिती तंत्रज्ञान (आयटी), फिनटेक, डेटा सेंटर या क्षेत्रामध्ये ३२ हजार ४१४ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार झाले असून ८७०० जणांना रोजगार मिळणार आहे. लोह उत्पादन क्षेत्रात २२०० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून ३००० जणांना रोजगार मिळणार आहे. कृषी आणि अन्नप्रक्रिया उद्योग क्षेत्रामध्ये १९०० कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले असून सुमारे ६०० जणांना रोजगार मिळणार आहेत.

**महाराष्ट्र चेंबर चा पाठपुरावा...**
महाराष्ट्रात नवीन येणाऱ्या गुंतवणूकीमध्ये चंद्रपूरसह विदर्भातील जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येणार असून, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ने **'विदर्भ विकास परिषद'** आयोजित करून या गुंतवणूकीचा मार्ग खुला केला होता.

### उद्योग वाढीला चालना देण्यासाठी नवीन धोरण

राज्य शासनामार्फत जनतेच्या हिताच्या निर्णयासोबतच उद्योग वाढीला चालना मिळावी, यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळातील सदस्यांनी उद्योजकांसाठी नवीन धोरण ठरविले आहे. नविन धोरणामध्ये एक खिडकी योजना, भांडवली अनुदान, जीएसटी कर अनुदान त्याच बरोबर नविन तंत्रज्ञान आणि मोठ्या उद्योगांना विशेष पॅकेज देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

### दावोसमधील गुंतवणूकीचे प्रकल्प

भद्रावती, चंद्रपूर येथे २० हजार कोटींचा कोळसा गॅसिफिकेशन प्रकल्प, गडचिरोली येथे १ हजार ५२० कोटी रुपये गुंतवणूकीचा स्टील प्रकल्प, पुणे येथे जपानाच्या निप्रो कार्पोरेशनचा १६५० कोटी रुपयांचा ग्लास ट्यूबिंग प्रकल्प, महाराष्ट्रात पायाभूत सुविधांसाठी बर्कशायर हॅथवेकडून १६ हजार कोटींची गुंतवणूक, औरंगाबाद येथे १२ हजार कोटींचा ग्रीनको नविनीकरण उर्जेचा प्रकल्प, पुणे येथे २५० कोटी रुपयांचा रुखी फुड्सचा ग्रीनफिल्ड अन्न प्रक्रिया प्रकल्प




''विदर्भ विकास परिषदेस'' मार्गदर्शन करताना उद्योगमंत्री नाम. उदय सामंत व्यासपीठावर चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, चेंबरच्या महिला समितीच्या अध्यक्षा संगीता पाटील, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी व मान्यवर

# तीस दिवसात उद्योगांना परवानगी देणार : नाम. उदय सामंत

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे आयोजित 'विदर्भ विकास परिषदेत' घोषणा

**नागपूर** : विदर्भ यापुढे मागासलेला जिल्हा राहणार नाही. विदर्भासाठी जे-जे काही देता येईल, ते सर्व आमच्या सरकारकडून दिले जाईल. राज्य सरकार उद्योजकांच्या पाठीशी उभे आहे. तीस दिवसात नवीन उद्योगांना परवानगी देणार, अशी ठोस ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांना विदर्भ विकास परिषदेत दिली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अँण्ड अँग्रीकल्चर व महाराष्ट्र सरकारचा उद्योग विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २१ डिसेंबर रोजी ''विदर्भ विकास परिषद'' नागपूर येथील वसंतराव देशपांडे सभागृह, आमदार निवास समोर, सिव्हील लाईन्स येथे झाली. विदर्भातील ११ जिल्ह्यातून हजारांहून अधिक व्यापारी, उद्योजक या परिषदेत सहभागी झाले. राज्य सरकारचा उद्योग विभाग, एमएसएमई, एमआयडीसी आणि म हाराष्ट्र सरकारचा औद्योगिक संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद झाली. या परिषदेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दरम्यान उद्योजकांच्या मागण्यांसाठी महाराष्ट्र चेंबरने पुढाकार घेतला. त्या पुढाकारामुळे अनेक प्रश्न मार्गी लागल्याची ठोस ग्वाही मिळाली असल्याचे उद्योजक, व्यापारी यांनी परिषदेत सांगितले.

उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने परिषदेचे उद्घाटन झाले. व्यासपीठावर माजी खासदार अजय संचेती, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, प्रदीप पेशकर, फेडरेशन ऑफ

इंडस्ट्री असोसिएशन विदर्भचे अध्यक्ष मधुसूदन रुंगठा, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष निकेश गुप्ता, एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन हिंगणाचे अध्यक्ष कॅप्टन चंद्रमोहन रणधीर, बुटीबोरी मॅन्युफॅक्चर्स असोसिएशनचे अध्यक्ष नितीन लोणकर, एमआयडीसी असोसिएसन ऑफ अमरावतीचे अध्यक्ष किरण पातुरकर, चेंबरच्या महिला समितीच्या अध्यक्षा संगीता पाटील, चेंबरचे विजय वेदमूथा, चेंबरच्या युवा विंगचे चेअरमन संदीप भंडारी, चेंबरचे राज्य कार्यकारिणी सदस्य विनय आकुलवार, चेंबरचे नामकर्ण आवारे, चेंबरचे सरकार्यवाह सागर नागरे आदी उपस्थित होते.

उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, विदर्भ हा मागासलेला नाही. विदर्भाकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष लक्ष आहे. यापूर्वीच्या महाआघाडी सरकारने विदर्भात एकही प्रकल्प येत नाही, अशी आरडाओरड केली. त्यांच्या राजकीय रणनीती खेळण्याच्या परंपरेने विदर्भाचा विकास खुंटला. मात्र त्याऊलट फडणवीस-शिंदे सरकारने उद्योग, व्यवसायाला मोठी चालना दिली. त्यामुळे येत्या काही दिवसात विदर्भाचा चेहरा मोहरा बदलला जाईल. सरकार नेहमी उद्योजकांच्या पाठीशी राहिले आहे. उद्योग क्षेत्रातील प्रलंबित प्रश्नांसाठी येत्या काही दिवसांत उद्योजकांची मुंबई येथे बैठक घेतली जाईल. उद्योगाला न्याय दिला जाईल, हा माझा शब्द आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योग यावेत. त्यांना राज्यात उद्योगासाठी पोषक वातावरण मिळावे, यासाठी उद्योग निर्भय योजना ही देशातील पहिलीच योजना लागू करण्यात येणार आहे. या योजनेतंर्गत उद्योजकांना मैत्री पोर्टलच्या माध्यमांतून तीन दिवसांत सर्व परवानगी मिळतील. उद्योगमंत्री उदय सामंत  म्हणाले की, फडणवीस-शिंदे सरकार आल्याबरोबरच २३०० कोटीचे प्रोत्साहन अनुदान उद्योगांना देण्यात आले. कोविड महामारीच्या काळात राज्यातील उद्योजकांचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी आतापर्यंत दोन टप्प्यात २४ कोटी रुपयांची प्रोत्साहन अनुदानाची रक्कम दिली आहे. येत्या मार्च महिन्यापर्यंत उर्वरीत प्रोत्साहनाची रक्कम देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. उद्योजकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या सोडविण्यासाठी राज्य सरकार आग्रही असून त्यासाठी मंत्रिमंडळ उद्योग उपसमितीची  महिन्याला दोन वेळा बैठक घेण्यात येत आहे.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, राज्य सरकारने राज्याच्या उद्योग क्षेत्राला भरारी देणारे महत्वाचे निर्णय यापूर्वी घेतले आहेत. त्यासह सरकारने कोविड महामारीच्या काळात राज्यातील उद्योजकांचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी आतापर्यंत दोन टप्प्यात २४ कोटी रुपयांची प्रोत्साहन अनुदानाची रक्कम दिली आहे. मात्र उर्वरित रक्कम अद्याप मिळालेली नाही. त्यामुळे येत्या मार्च महिन्यापर्यंत उर्वरीत प्रोत्साहनाची रक्कम देण्याची मागणी अध्यक्ष गांधी यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली. या मागणीची तातडीने दखल घेऊन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी येत्या मार्चपर्यंत उर्वरित प्रोत्साहनपर अनुदानाची रक्कम दिली जाईल, अशी ग्वाही अध्यक्ष ललित गांधी यांना दिली. तसेच चेंबरचे अध्यक्षपद स्विकारल्यानंतर









## 'ट्रायबल इंडस्ट्रीयल पार्क'

विदर्भाला भरभरून नैसर्गिक साधन संपत्ती लाभली आहे. उद्योगासाठी येथे पोषक वातावरण आहे. स्थानिक आदिवासी उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी 'ट्रायबल इंडस्ट्रीयल पार्क' येत्या फेब्रुवारी महिन्यात कार्यान्वित करीत आहोत. उद्योगपूरक वातावरणाला चालना देत राज्यशासन उद्योजकांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे, अशी ग्वाही उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज विदर्भ विकास परिषदेत दिली.

केंद्रीय रस्ते आणि वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी महाराष्ट्राच्या विकासाचा आराखडा तयार करण्याची जबाबदारी चेंबरला दिली होती. त्यानुसार येत्या मार्च महिन्यापर्यंत ३६ जिल्ह्यात ३६ क्लस्टर, डेव्हलपमेंट फोरम स्थापन करण्याचे सुचविले होते. त्यांनी सोपविलेल्या जबाबदारी नुसार महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉम र्सकडून काम सुरु आहे. विदर्भातील प्रत्येक जिल्ह्याचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे विदर्भासाठी सरकारने ठोस निर्णय आणि कार्यवाही करणे गरजेचे आहे. येत्या काही दिवसांत विदर्भात ११ जिल्ह्याची फोरमची स्थापना केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. वीज दरात सबसिडी मिळावी. विदर्भातील ११ जिल्ह्यातील वेगळे औद्योगिक धोरण आणल्यास राज्याला ताकद देऊ शकतील, असेही ललित गांधी यांनी स्पष्ट केले.

## ग्रामीण भागाला सवलती द्या : आमदार प्रकाश आवाडे

आमदार प्रकाशअण्णा आवाडे यांनी राज्यातील उद्योग आणि व्यवसायाची सद्यस्थिती मांडली. सरकार मेगा क्लस्टरला मोठ्या प्रमाणात सवलती देते. याच सवलती विशेषत: ग्रामीण भागातील लघु, मध्यम उद्योगांना देण्यात याव्यात. या सवलती दिल्यास ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात उद्योग स्थापन केले जातील. शेकडो तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. जिल्हा, राज्य आणि देशाच्या विकासासाठी उद्योगाचा वाटा मोठ्या प्रमाणात राहील. राज्यात सध्या उद्योगाच्या वीजदराचा प्रश्न भेडसावत आहे. उद्योग क्षेत्रासाठी राज्याला वीज सवलत, कमी दरातील जागा आणि विविध प्रकारच्या सवलती देण्याची गरज आहे.

## गडचिरोली जिल्ह्यांतील उद्योगांसाठी ४१ हजार कोटींचा निधी

राज्याचा सर्वांगिण औद्योगिक विकास भौगोलिक विभागनिहाय समतोल साधून होणे आवश्यक आहे. गेल्या तीन महिन्यात ७१ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे प्रकल्प मंजूर झाले असून त्यापैकी ४१ हजार २०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे प्रकल्प विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये येत आहेत. यामुळे ३२ हजार जणांना रोजगार संधी उपलब्ध होणार आहे. विदर्भातील आदिवासी उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी 'ट्रायबल इंडस्ट्रीयल पार्क' येत्या फेब्रुवारी महिन्यात कार्यान्वित होईल, असा विश्वास श्री. सामंत यांनी व्यक्त केला.

## तरुण उद्योजकांना प्रोत्साहन

तरूण उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने ५०० कोटींहून अधिक निधींची तरतूद केली आहे.
ही रक्कम संपूर्ण खर्च करण्यास उद्योग विभागाचे प्राधान्य असेल.








## विदर्भ विकास परिषदेची वैशिष्ट्ये

- **उद्योग, व्यापार, कृषी, ऊर्जा, इनोव्हेशन, पर्यटन या पाच महत्वाच्या विषयावर चर्चा,**
- **तीन महिन्यात ७१ हजार कोटी रुपयांची तरतूद, त्यापैकी ४१ हजार कोटी रुपये विदर्भातील प्रकल्पांसाठी मंजूर**
- **महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळासाठी ४०० कोटी रुपयांची तरतूद**
- **राज्यात स्किल सेंटर, इनोव्हेशन सेंटरला चालना मिळणार**
- **उद्योजकांना दोन टप्प्यात २४ हजार कोटी रुपयांची प्रोत्साहन अनुदानाची रक्कम**

याकरिता शासनासह अन्य घटकांचीही महत्त्वाची भूमिका आहे. बँकांनी तरुण उद्योजकांना कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. त्यास बँकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला व आता बँकांद्वारे उद्योजकांना कर्ज नाकारण्याचे प्रमाण ४२ टक्क्यांवरुन ५ टक्क्यांवर आल्याचेही त्यांनी सांगितले. त्याह मुख्यमंत्री रोजगार योजनेच्या अंतर्गत तरुणांना झिरो रिजेक्शन पद्धतीने कर्जवाटप केले जाणार आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात २५ हजार नवे तरुण उद्योजक तयार केले जाणार आहे.

### विविध संस्थाकडून संयोजन

महाराष्ट्र इकॉनॉमी डेव्हलपमेंट काऊन्सिलचे अध्यक्ष रवी बोराटकर, गिरधर मंत्री, निकेश गुप्ता, अमरावती चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष विनोद कलंत्री, दलित इंडियन चेंबरचे अध्यक्ष निश्चय शेळके, विजय बाफना, देवेंद्र पारेख, सुरेश जैन, जुगलकिशोर कोठारी, भंडारा इंडस्ट्री को- ऑपरेटिव्ह इस्टेटचे अध्यक्ष सुनील रंभाड, नागपूर चेंबरचे अध्यक्ष गोविंद पसारी, श्रीकांत धोंडरीकर, प्रकाश लटणकर, अश्विन मेहाडिया, हुकुमचंदजी अग्रवाल, राजेंद्र सारडा, कमळेश्वर इंडस्ट्रीज असोसिएशनचे अमर मोहिते, किशोर गणात्रा, वर्धा जिल्हा एमआयडीसी इंडस्ट्री असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण हिवरे, डॉ मधुसूदन गोयंका, रामकिशोर सारडा, विशाल अग्रवाल, अशोक अग्रवाल, नितीन कोचे, प्रदीप माहेश्वरी, वीरेंद्र लड्डा आदींनी संयोजन केले.

### या संस्थाचा सहभाग

या विदर्भ परिषदेच्या आयोजनामध्ये सहयोगी संस्था म्हणून फेडरेशन ऑफ इंडस्ट्री असोसिएशन विदर्भ, बुटीबोरी मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन, एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन हिंगणा, बुटीबोरी मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन, विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन, नाग विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स, लघु उद्योग भारती केंद्र, नागपूर चेंबर ऑफ कॉमर्स, दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स, एमआयडीसी असोसिएशन अमरावती, अमरावती चेंबर ऑफ कॉमर्स, चेंबर ऑफ अमरावती महानगर मर्चंट अँड इंडस्ट्रीज, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स, अकोला इंडस्ट्रीज असोसिएशन, एमआयडीसी असोसिएशन चंद्रपूर, फेडेरेशन ऑफ ट्रेड, कॉमर्स, इंडस्ट्री, चंद्रपूर, वर्धा जिल्हा एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन, लघुउद्योजक संघ, हिंगणघाट, बुलढाणा चेंबर ऑफ कॉमर्स, व्यापारी मंडळ वाशिम जिल्हा, भंडारा इंड. को-ऑप इस्टेट, गडचिरोली इंडस्ट्रीज असोसिएशन, एमआयडीसी असोसिएशन गोंदिया यांच्यासह अकरा जिल्ह्यातील विविध व्यापारी औद्योगिक संघटना सहभागी झाल्या. नागपूर, अमरावती, अकोला, चंद्रपूर, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, भंडारा, वाशिम, बुलढाणा, गडचिरोली जिल्ह्यातील सर्व व्यापारी, उद्योजक संघटना, पदाधिकारी आणि सदस्य सहनिमंत्रक होते.

# पर्यटन विकासासाठी ४०० कोटींची तरतूद : पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा

## राज्यातील आयटीआयचे रुप बदलणार, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे आयोजित विदर्भ विकास परिषदेत घोषणा




विदर्भ विकास परिषदेत मार्गदर्शन करतांना कौशल्य विकास, पर्यटन, महिला व बालविकास मंत्री ना. मंगलप्रभात लोढा. व्यासपीठावर उपस्थित अध्यक्ष ललित गांधी, महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ. संगिता पाटील, एमआयडीसी इंडस्ट्री असोसिएशनचे अध्यक्ष कॅप्टन चंद्रमोहन रणधीर, युथ विंगचे चेअरमन संदिप भंडारी.

नागपूर : पर्यटन विकास महामंडळासाठी ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे पर्यटन क्षेत्रात रोजगार संधी उपलब्ध होतील. त्यासह राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थाही आता चकाचक होणार असून त्यासाठी १२०० कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचे प्रतिपादन कौशल्य विकास, पर्यटन, महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्री, अँग्रीकल्चरतर्फे नागपूर येथे २१ डिसेंबर रोजी झालेल्या विदर्भ विकास परिषदेत केले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या चेंबरच्या विविध उपक्रमांचे कौतुक करुन चेंबरला सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

राज्याचे कौशल्य विकास पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले, की, राज्यात पर्यटन क्षेत्रामध्ये विविध संधी आहेत. पर्यटन क्षेत्राला चालना मिळावी म्हणून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळासाठी ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे पर्यटन क्षेत्रात मोठ्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. महाराष्ट्रात पर्यटनाला खूप चालना आहे. गोवा राज्यापेक्षा महाराष्ट्र हा नैसर्गिक साधनसंपत्तीने परिपूर्ण आहे. अनेक सागरी किल्ले महाराष्ट्राकडे आहेत. त्यामुळे पर्यटन व्यवसाय वाढीसाठी एक नवे दालन खुले होईल.

पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले, गेल्या दहा वर्षापूर्वी

अन्य देशाचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा होता. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या सरकारने हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. चीनने भारतात घुसखोरी केलेल्या चीनी मार्केटला रोखण्यात यश आले आहे. अनेक बाबतीत भारत स्वयंपूर्ण होत असून अनेक उद्योग, व्यवसाच्या माध्यम ातून तरुणांना रोजगार उपलब्ध करुन दिला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली देशाचे, महाराष्ट्रासह विदर्भाचे भविष्य उज्ज्वल आहे. राज्यात कौशल्य आणि नाविन्यता केंद्रांना चालना देऊन औद्योगिक विकास संस्थांना सक्षम करण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले. ज्या व्यक्तिंकडे विशेष कला, कौशल्य आहे, ते स्किल सेंटर उघडू शकतात. ज्यांच्याकडे स्वत:ची जागा उपलब्ध नसेल त्यांच्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत जागेची व्यवस्था करुन दिली जाईल. त्यासह इनोव्हेशन सेंटरची उभारणी केली जाणार आहे. येत्या काही दिवसांत राज्यातील आयटीआयचे रुप पालटले जाणार आहे. त्यासाठी सुमारे १२०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. राज्यातील ५५० आयटीआय चकाचक होणार आहेत. व्हर्च्युअल क्लासरुम, अत्याधुनिक प्रयोगशाळा, शिक्षकांना प्रशिक्षण आदी हायटेक प्रयोग आयटीआयमध्ये राबविले जाणार आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक तरुणाच्या हाताला काम मिळेल, अशा योजना फडणवीस-शिंदे सरकारकडून राबविल्या जात आहेत. असे पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.




## संयुक्तपणे काम केल्यास विकास : माजी खासदार अजय संचेती

राज्य सरकार, उद्योगपती आणि विविध संस्था यांनी एकत्र येऊन संयुक्तपणे काम केल्यास विकास सहज शक्य आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रीकल्चर ही राज्यव्यापी संस्था मोठे व्यासपीठ आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून उद्योजक, व्यापारी यांचे अनेक प्रश्न मार्गी लागू शकतात. त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन चेंबरला पाठिंबा देणे अतिशय गरजेचे आहे. चेंबरच्या माध्यमातून विविध प्रश्न राज्य सरकारकडे मांडले जातील. त्यातून प्रलंबित प्रश्न मार्गी लागून उद्योग भरभराटीला येऊ शकतात. विदर्भाच्या विकासासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी निश्चितच ठोस धोरण राबवतील.



## रोजगारासाठी प्रयत्नशील : संदीप भंडारी

चेअरमन संदीप भंडारी यांनी 'युवकांकरिता उद्योजकता व स्वयं रोजगाराच्या विविध संधी' या विषयावर बोलताना म्हणाले, आर्थिक, सामाजिक उन्नती आणि विकासामध्ये उद्योग, व्यापार, व्यवसायांचे महत्त्व, योगदान मोठे आहे. रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट सरकार साध्य करत आहे. रोजगारासाठी बाहेर पडणाऱ्या असंख्य युवकांना चांगले काम देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर आणि राज्य सरकारचे विविध विभाग प्रयत्नशील आहेत. युवकांना सहभागी करून घेऊन रोजगाराबरोबरच, उद्योजक बनवण्याचे धोरण आहे.



## चौफेर विकासासाठी महाराष्ट्र चेंबर कार्यरत : उमेश दाशरथी

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी म्हणाले, राज्याचा व्यापार-उद्योग, सेवाक्षेत्र व कृषी क्षेत्राच्या चौफेर विकासासाठी महाराष्ट्र चेंबर अविरतपणे कार्यरत आहे. राज्य, देश आणि जागतिक स्तरावर महाराष्ट्र चेंबरने राज्यातील व्यापार उद्योगाला स्थान मिळवून दिले आहे. चेंबरच्या विविध समितीच्या माध्यमातून वेगवेगळ्या घटकांचे प्रश्न सोडविले जातात. व्यापारी आणि उद्योजकांचे एक हक्काचे व्यासपीठ म्हणून महाराष्ट्र चेंबर आहे. सरकार दरबारी असलेले अनेक प्रश्न सोडविण्यासाठी चेंबर अतिशय मोलाची भूमिका बजावतो. चेंबरतर्फे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत बैठका, परिषदा, सभा घेऊन व्यापारी उद्योजकांना मार्गदर्शन केले जाते. महिला धोरणांच्या अंमलबजावणीसाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत.



**रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० ची वार्षिक परिषद, शेगांव येथे संपन्न झाली. सदर परिषदेचे उद्घाटक व मुख्य मार्गदर्शक म्हणुन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी मार्गदर्शन करताना समोर उपस्थित रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० चे सदस्य.**

# भारतीय उद्योग जगताला उज्ज्वल भविष्यकाळ : ललित गांधी

## 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' व 'रोटरी' संयुक्तपणे व्यापार-उद्योगासाठी महत्वाची भूमिका बजावतील

**शेगांव** : स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करणाऱ्या भारताचा भविष्यकाळ उद्योग जगताशी अत्यंत उज्ज्वल असल्याने तरूणांनी नवनवीन उद्योग संधींचा लाभ घेऊन देशाच्या विकासाबरोबरच स्वतःची प्रगती साधावी, असे प्रतिपादन 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर' चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० ची वार्षिक परिषद, शेगांव येथे संपन्न झाली. सदर परिषदेचे उद्घाटक व मुख्य मार्गदर्शक म्हणुन ते बोलत होते.

डिस्ट्रीक्ट गव्हर्नर डॉ. आनंद झुंझनवाला यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या परिषदेत कालीका स्टील चे अनिल गोयल, रमेश मेहेर, राजेंद्र खुराणा, देवेश भगत, अलोक सकलकाळे आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

ललित गांधी आपल्या संबोधनात पुढे म्हणाले की, 'रोटरी' ही आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणारी संस्था आपल्या विविध सेवा प्रकल्पामुळे प्रतिष्ठित संस्था म्हणून भारतात अग्रक्रमाने ओळखली जाते. 'रोटरी' सारख्या संस्थेच्या पुढाकाराने देशातील नवयुवकांना, महिलांना नवीन उद्योग व्यवसायासाठी प्रोत्साहीत करणे शक्य आहे व अशा युवकांना व महिलांना प्रत्यक्ष उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी मार्गदर्शन व आवश्यक भांडवल उभारणीसह सर्वच बाबतीत 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर' सहकार्य करेल.

व्यापार-उद्योगांमधील नवीन संधींची माहिती देऊन ललित गांधी पुढे म्हणाले की, 'ई-कॉमर्स'च्या वाढत्या आक्रमणामुळे भारतीय रीटेल इंडस्ट्री धोक्यात येत आहे. त्यामुळे आपण स्थानिक दुकानातून खरेदीला प्राधान्य दिले पाहिजे. त्याचप्रमाणे स्थानिक दुकानदांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र चेंबर यासाठी लागणारे तंत्रज्ञान ' डिजीटल बिझनेस स्मार्ट कार्ड' च्या माध्यमातून विनामुल्य उपलब्ध करून देत आहे असे सांगितले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे संस्थापक शेठ






**रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० च्या वार्षिक परिषदेचे दिपप्रज्वलन करून उद्‌घाटन करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी सोबत, डिस्ट्रीक्ट गव्हर्नर डॉ. आनंद झुंझनवाला, कालीका स्टील चे अनिल गोयल आदि मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात ललित गांधी यांचा सत्कार करताना डिस्ट्रीक्ट गव्हर्नर डॉ. आनंद झुंझनवाला व सौ. मोनिका झुंझनवाला**

वालचंद हिराचंद यांचे भारतीय उद्योगामधील अतुलनीय योगदान व महाराष्ट्राच्या औद्योगिकराणाचा पाया रचण्याचे केलेले कार्य ही 'महाराष्ट्र चेंबरच' नव्हे तर प्रत्येक भारतीयांसाठी अभिमानाची व गौरवशाली बाब असल्याचे प्रतिपादन ललित गांधी यांनी केले.

प्रारंभी ललित गांधी व अन्य मान्यवरांनी दिपप्रज्वलन करून डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्स चे उद्‌घाटन केले.

डॉ. आनंद झुंझनवाला व सौ. मोनिका झुंझनवाला यांनी ललित गांधी यांचा स्मृतीचिन्ह व भेटवस्तु देऊन सन्मान केला.

रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० चा गावंडे पुरस्कार डॉ. दिलीप भावसर व एडल्जी पुरस्कार अशोक मुखी यांना ललित गांधी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

नागपूर, चंद्रपूर, वर्धा, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, नाशिक, जळगांव या जिल्ह्यातून २००० हून अधिक प्रतिनिधिंच्या उपस्थितीत दोन दिवसीय परिषद अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

या परिषदेला माजी डिस्ट्रीक्ट गव्हर्नर्स किशोर केडीया, दादा देशमुख, महेश मोकलकर, डॉ. के.एस.राजन, राजीव शर्मा, शब्बीर शाकीर, राजेंद्र भामरे, महाराष्ट्र चेंबरच्या महिला समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील, इंड. असो. समितीचे को–चेअरपर्सन धनंजय बेळे, जीसी मेंबर दिलीप गांधी, रोटरी डिस्ट्रीक्ट सेक्रेटरी प्रमोद अगरवाल, राजीव नाथाणी, श्रीनिवास लेले, रणजित साळवी, राकेश दिडवानीया आदि मान्यवर उपस्थित होते.





**रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० चा एडल्जी पुरस्कार अशोक मुखी व गावंडे पुरस्कार डॉ. दिलीप भावसर यांना प्रदान करताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, डॉ. आनंद झुंझुनवाला.**

# शहरांच्या संरचनेत आमूलाग्र बदल, हेच देशासमोर आव्हान

## मुंबईनंतर पुणे होणार आर्थिक राजधानी : केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचा विश्वास

### 'जी-२०' परिषदेचे पुण्यात थाटामाटात उदघाटन, २० देशांचा सहभाग






**'जी-२०' परिषदेचे उदघाटन प्रसंगी बोलताना केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे उपस्थितात अन्य देशातील प्रतिनिधी दुसऱ्या छायाचित्रात परिषदेतील विविध दालनांना भेट देवुन केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी पाहणी केली.**

**पुणे** : आगामी काळात भारतासह जगातील सर्वच देशासमोर सर्वांत मोठे आव्हान राहणार आहे, ते वाढत्या शहरीकरणामुळे त्यांच्या संरचना बदलण्याचे. त्यासाठी शासकीय बरोबरच खासगी क्षेत्राचीही मदत घ्यावी लागणार आहे. त्यासह मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी असून, त्यापाठोपाठ पुणे शहरदेखील भारताची आर्थिक व औद्योगिक राजधानी म्हणून नावारुपास आणण्याची तयारी जी-२० परिषदेच्या माध्यमातून भारत सरकार करीत असल्याचा विश्वास केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे यांनी व्यक्त केला. सेनापती बापट रोडवरील हॉटेल मॅरिएटमध्ये 'जी-२०' परिषदेचे उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. पुणे येथे १६ व १७ जानेवारी रोजी पुणे येथे जी-२० परिषद झाली.

केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे म्हणाले, २१ व्या शतकात शहरीकरण विकासाच्या केंद्रस्थानी आले आहे. त्यासाठी पायाभूत सुविधा संरचना यांचे महत्व अन्यय साधारण आहे. २०४५ पर्यंत शहरातील लोकसंख्या लक्षणीयरित्या वाढणार आहे. पुढील दोन दशकांत शहरांचा अधिकाधिक विस्तार होणार आहे. त्यादृष्टीने गुंतवणूकही वाढवावी लागणार आहे. त्यासाठी अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय संस्थाचे परस्परसंबध महत्वाचे ठरणार आहेत. सार्वजनिक, शासकीय आणि खासगी क्षेत्रांनी हातात हात घेऊन काम केल्यास परिवर्तन आणि शाश्वत विकास घडू शकेल. यंदाच्या जी-२० परिषदेचे 'वसुधैव कुटुंबकम' हे ब्रीदवाक्य आहे. दीर्घकालीन आर्थिक विकासासाठी यानिमित्ताने प्रोत्साहन मिळत असून जगाच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीसह परस्पर आंतरराष्ट्रीय संबंध यानिमित्ताने दृढ होणार आहे.

या परिषदेचे उद्घाटन करण्याचे भाग्य मला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे लाभल्याचे सांगून केंद्रीय मंत्री नारायण राणे म्हणाले, या परिषदेचे चांगले दूरगामी परिणाम पाहायला मिळतील. २० देशांतून आलेले प्रतिनिधी भारताविषयी जगात चांगल्या गोष्टी सांगून तेथील उद्योजकांना येथे गुंतवणूकीसाठी प्रोत्साहित करतील. अमेरिका ३० ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था आहे. त्यापाठोपाठ चीन, जर्मनी व जपानचा नंबर लागतो. या देशांच्या बरोबरीने भारत जात आहे. २०१४ साली भारत दहाव्या क्रमांकावर होता. सध्या भारत पाचव्या क्रमांकावर आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली २०३० पर्यंत भारत ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था असलेला देश म्हणून नावारुपास येईल. दरम्यान केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी परिषदेत विविध देशांतील प्रतिनिधी सोबत संवाद साधला. शाश्वत विकास, पर्यावरणाचे महत्व, परस्पर आंतरराष्ट्रीय संबंध आदी महत्वाचे मुद्दे अधोरेखित केले.

प्राकृतिक वर्चस्ववाद आणि स्वामित्व हक्क गाजविण्याच्या स्पर्धेमुळे जागतिक स्तरावर संघर्ष निर्माण होत आहे. त्यामुळे पर्यावरणाला मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला आहे. म्हणूनच 'जी-२०' परिषदेत पर्यावरणाला केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. 'पर्यावरणपूरक जीवनशैली' हे अभियान भारताने हाती घेतले आहे. यातूनच पर्यावरण संवर्धनाला गती मिळू शकेल असेही राणे यांनी भाषणात व्यक्त केले.

**२० देशांचे प्रतिनिधी उपस्थित**

या परिषदेत २० देशांचे एकूण ६६ प्रतिनिधी सहभागी झाले. यजमान भारतासह अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, इटली, इंडोनेशिया, जपान, कोरिया, मेक्सिको, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, तुर्की, इंग्लड, अमेरिका हे देश सहभागी झाले आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर वित्तीय विकास आणि अर्थव्यवस्थेला स्थिरता देण्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या कोएलीशन फॉर डिझास्टर रेझिलियंट इन्फ्रास्ट्रक्चर, इंटरनॅशनल फायनान्स कार्पोरेशन, युरोपियन युनियन, एशिअन डेव्हलपमेंट बँक या जागतिक संस्थांच्या प्रतिनिधी उपस्थित होते.

# ई-कॉमर्सचे आव्हान थोपविण्यासाठी व्यापारी बंधूनो हायटेक टेक्नॉलॉजी वापरा

## महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचे आवाहन




**मराठवाडा जिल्हा व्यापारी महापरिषदेचे दिपप्रज्वलनाने उद्घाटन करतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी समवेत माजी अध्यक्ष मानसिंग पवार, हिंगोली जिल्हा व्यापारी संघाचे अध्यक्ष गजाजन घुगे, हिंगोली शहर व्यापारी संघाचे अध्यक्ष पंकज जैन, मराठवाडा चेंबरचे अध्यक्ष आदेशपालसिंग छाबडा, पोलीस अप्पर पोलीस अधिक्षक अर्चना पाटील, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे, दिपक अग्रवाल, निरंजन जुआ आदी**

**हिंगोली :** देशभरात कोरोनाचे संकट कोसळल्याने अनेक व्यवसायावर संक्रात आली. या परिस्थितीचा फायदा घेत बाजारपेठेत ऑनलाईन खरेदीचा टक्का वाढला. त्यातच ई-कॉमर्सच्या आगमनामुळे देशातील तीस टक्के रिटेलर कायमचे बंद पडले आहेत. भविष्यात हीच स्थिती कायम राहिल्यास सुमारे ५० टक्के व्यवसाय बंद पडतील, अशी भीती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अँग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केली. ई-कॉमर्सचे वाढते आव्हान थोपविण्यासाठी व्यापारी बांधवांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची गरज आहे, असे आवाहनही त्यांनी केले.

हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघातर्फे 'भव्य मराठवाडा व्यापारी महापरिषद' शहरातील महावीर भवन येथे ८ जानेवारी रोजी झाली. त्यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी मार्गदर्शन केले. हिंगोली येथे झालेल्या पहिल्याच मराठवाडा व्यापारी महापरिषदेसाठी व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे माजी अध्यक्ष मानसिंग पवार यांनी त्यांच्या ओघवत्या शैलीत व्यापाऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच महाराष्ट्र चेंबरने मराठवाडा विभागाचे प्रश्न सोडविण्यासाठी विशेष पुढाकार घ्यावा.

चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, केंद्र सरकारने व्यापारी बांधवासाठी तीन हजार रुपये पेन्शन लागू केली आहे. मात्र ही पेन्शन भविष्यात तोकडी असल्याने सुधारित पेन्शन योजना लागू करावी, असा पाठपुरावा सरकारकडे सुरु आहे. येत्या २०२४ पूर्वी ही मागणी मान्य होऊ शकेल, अशी खात्री वाटते. देशात रेडपॉलिसी लागू करणारे महाराष्ट्र राज्य आहे. ही योजना १९९५ मध्ये लागू करण्यात आली. केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी रेडपॉलिसी संपूर्ण देशभरात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सन २०१७ मध्ये पंतप्रधानांनी जीएसटी प्रणाली सुरु केली, मात्र या जीएसटीने संपूर्ण व्यापारी बंधूना मनस्ताप दिला आहे. जीएसटीला अच्छे दिन आले, मात्र व्यापार्यांना अनेक त्रासातून जीएसटीला सामोरे जावे लागत आहे. जीएसटी लागू करण्याचा निर्णय चांगला असला तरी त्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नाही. त्यामुळेच व्यापारी वर्गाला अडचणीला सामोरे जावे लागत आहे. सरकार जीएसटी संदर्भात सहज, सोपी, सुटसुटीत प्रक्रिया असल्याची घोषणा करते. प्रत्यक्षात मात्र चित्र वेगळे आहे. जीएसटीच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी असल्याचे स्पष्ट होत असल्याने व्यापारी वर्गाचे त्रांगडे झाले आहे.

अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने व्यापाऱ्यांच्या अनेक अडीअडचणी सरकार स्तरावर मांडल्या जाऊन त्या मार्गीही लावल्या जात आहेत. दोन वर्षापूर्वी कोरोनाच्या काळात व्यापारी वर्गावर खूप संकटे आली. त्यातच अँमेझॉन व फिल्फकार्ड या कंपन्यामुळे ऑनलाईन खरेदीकडे कल वाढला. त्यामुळे स्थानिक व्यापारी डबघाईला आला. कोट्यावधी रुपयांची गुंतवणूक करुन सुद्धा दिवसेंदिवस व्यापारी वर्गाला ग्राहकांची प्रतीक्षा

MiTEX
MAHARASHTRA INTERNATIONAL
TRADE EXPO
17th to 26th February, 2023
Bandra Kurla Complex, Mumbai
MAHARASHTRA'S LARGEST TRADE FAIR
ELECTRONICS AND DURABLES
आपल्या व्यापार-उद्योगाच्या वाढीसाठी अवश्य सहभागी व्हा!
ORGANISED BY : MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY AND AGRICULTURE
REGISTER NOW




**महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा सन्माचिन्ह देऊन सत्कार करतांना हिंगोली शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष गजानन घुगे, शहराध्यक्ष पंकज अग्रवाल. महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष तनसुख झांबड यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करतांना हिंगोली शहर व्यापारी संघाचे पदाधिकारी**

करावी लागत असल्याचे बाजारपेठेतील चित्र आहे. परिसरातील ग्राहकांची व्यवस्था होण्यासाठी मोठमोठे मॉल व्यापारी बांधवांनी उभारले. या ठिकाणी ग्राहक गर्दी करतात, मात्र तेथील वस्तूंची पाहणी केल्यानंतर ऑनलाइन खरेदी करत असल्याने स्थानिक व्यापारी वर्गाचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे स्थानिक व्यापायांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची गरज आहे.

व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष आणि माजी आमदार गजाननराव घुगे म्हणाले, हिंगोली जिल्ह्यातील हळदीची जागतिक पातळीवर एक वेगळी ओळख आहेच. हिंगोली जिल्हा व्यापारी दृष्टीकोनातून मागास असूनही मराठवाडा व्यापारी महापरिषदेचे पहिलेच अधिवेशन हिंगोलीला होत आहे, हे हिंगोलीचे भाग्यच आहे. या अधिवेशनासाठी मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यातील व्यापारी बांधव सहभागी झाले आहेत. त्यामुळे व्यापारी बंधूची एकजूट अधिक भक्कम झाली आहे. शहराध्यक्ष पंकज अग्रवाल यांनी काही मागण्या परिषदेत मांडल्या. हिंगोली जिल्ह्यातील व्यापारी बांधवांना पेन्शन योजना लागू करावी. जिल्हा प्रशासनासने व्यापारी बांधवाना येत असलेल्या अडचणी सोडविण्यासाठी मदत करावी. जीएसटीच्या अडचणी मार्गी लावाव्यात. पोलिसांनी व्यापारी बांधवांच्या वाहनावरील दंडात्मक कारवाई कमी करावी, अशा मागण्या शहराध्यक्ष अग्रवाल यांनी महापरिषदेत मांडल्या. नाशिक येथील चार्टर्ड अकाउंटंट दीपक अग्रवाल यांनी 'जीएसटी व आयकर मधील सुधारणा आणि सध्यस्थितीत निर्माण होत असलेल्या अडीअडचणी' या विषयावर मार्गदर्शन केले. विशाल पोद्दार यांनीही मार्गदर्शन केले. अहमदाबादचे निरंजन जुआ यांनी 'व्यावसायिक कर्ज व विविध योजना' 'केंद्र, राज्य सरकारच्या उद्योगांना सुविधा' उद्यम रजिस्ट्रेशन, जीईएम गव्हर्मेंट ई-मार्केट प्लेस' या विषयावर मार्गदर्शन आणि उपयुक्त माहिती दिली. व्यापारी वर्गाने विचारलेल्या शंकाचे समाधानकारक त्यांनी उत्तरे दिली.

या महापरिषदेला अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, हिंगोली नगरपरिषदचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे, मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँण्ड कॉमर्सचे अध्यक्ष आदेशपालसिंगजी छाबडा, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष तनसुख झांबड, चेंबरचे माजी अध्यक्ष मानसिंग पवार, मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँण्ड कॉमर्सचे माजी अध्यक्ष सत्यनारायण लाहोटी, कार्याध्यक्ष रमेशचंद बगडिया, कोषाध्यक्ष सुदर्शन कंदी, कांता गुंडेवार, सावरमल अग्रवाल, दीपक निमोदिया, सुभाष लदनिया, नंदकिशोर तोष्णीवाल, शहर कार्याध्यक्ष सुधीर सराफ, शहर कोषाध्यक्ष मुरलीधर हेडा, शहर सचिव सुनील बगाडिया, आनंद निलावर आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद निलावर यांनी केले.

## व्यापारी महासंघाशी संलग्नित असोसिएशनचे सहकार्य

ग्रेन मर्चंट असोसिएशन, इंडस्ट्रियल असोसिएशन, खते व बी-बियाणे असोसिएशन, भुसार मर्चंट असोसिएशन,होलसेल व रिटेल किराणा असोसिएशन, कपडा रेडिमेड असोसिएशन, बिल्डींग मटेरियल, हार्डवेअर असोसिएशन, बर्तन-भांडे असोसिएशन, दूध डेअरी असोसिएशन, मेडिकल असोसिएशन, सराफ व सुवर्णकार असोसिएशन, सी.पी.डी. असोसिएशन, इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स असोसिएशन, कटलरी- जनरल स्टोअर्स असोसिएशन, हॉटेल स्वीट मार्ट असोसिएशन, ऑटोमोबाइल अँण्ड ट्रान्स्पोर्ट असोसिएशन, प्रिंटिंग स्टेशनरी असोसिएशन, पेट्रोलपंप असोसिएशन.

# नॉन वोव्हन बॅग्स व पेपर उत्पादनांना बंदी आदेशातून वगळण्याचा महत्वपूर्ण निर्णय

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या मागणी व पाठपुराव्याला मोठे यश : ललित गांधी



**नॉन वोव्हन बॅग्स व पेपर उत्पादनांना बंदी आदेशातून वगळण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतल्या प्रकरणी चेंबर च्या शिष्टमंडळाने मुंबईत उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन चेंबरचे अध्यक्ष अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते सत्कार केला. यावेळी उपस्थितात डावीकडून विपुल मेहता, सूर्यकांत रोकडे, पी. सी. जैन, मधुसुदन बियाणी, सागर नागरे.**

**नवी दिल्ली :** कागदापासून आणि एकदाच वापर होणाऱ्या केवळ विघटनशील वस्तूंवरील बंदी उठविली आहे. राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाने राज्यातील सुमारे सहा लाखांवर युवक, महिला बेरोजगार होण्यापासून दिलासा मिळाला आहे. या संदर्भात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने सरकारकडे सातत्याने केलेली मागणी आणि पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे, ही माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

नॉन वोव्हन बॅग्स व पेपर उत्पादनांना बंदी आदेशातून वगळण्याचा म हत्वपूर्ण निर्णय सरकारने घेऊन यासंबधीची अधिसूचना काढण्यात आली. यामध्ये पिशव्या, ताटे, स्ट्राँ, वाटय़ा, ग्लास, काटे, चमचे आदींच्या वापरावरील निर्बंध राज्यात शिथिल केल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स सोबत झालेल्या चर्चेनंतर राज्य सरकारने याबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

या प्रकरणी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने लक्ष घालून हा प्रश्न मार्गी लावावा, असे साकडे या वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या लघु व सूक्ष्म

### काय आहे अधिसूचना

कागदापासून व विघटन होणाऱ्या तत्सम पदार्थापासून बनविण्यात येणाऱ्या आणि एकदाच वापर होणाऱ्या केवळ विघटनशील वस्तूंवरील बंदी उठविली आहे. विघटनशील प्लास्टिक पिशव्या, विघटनशील स्ट्रॉ, ताटे, कप, प्लेट्स, ग्लासेस, काटे, चमचे, भांडे, वाडगे, कंटेनर आदीच्या वापरास आता मुभा असल्याचे अधिसूचनेत म्हटले आहे. ६० जीएसएम पेक्षा अधिक जाडीच्या वस्तूंना या बंदीतून वगळले आहे.

- लघु व सूक्ष्म उद्योजक, व्यापार्यांच्या मागणीचा पाठपुरावा
- ३१ जुलै, २०२२ रोजी औरंगाबाद येथे राज्यस्तरीय परिषद
- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर प्रश्नांची मांडणी
- २५ नोव्हेंबरला तज्ज्ञ समितीच्या बैठकीत सादरीकरण
- २९ नोव्हेंबरला शक्तीप्रदत समितीपुढे विषयाची मांडणी
- ३० नोव्हेंबरला सरकारकडून अधिसूचना जाहीर

उद्योजकांनी व व्यापारी यांनी घातले होते. या मागणीची तातडीने दखल घेऊन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने ३१ जुलै, २०२२ रोजी औरंगाबाद येथे राज्यस्तरीय परिषद आयोजित केली होती. या परिषदेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर चेंबरने हा प्रश्न गांभीर्याने मांडून लघुउद्योजक विशेषता बँकांच्या कडून कर्ज घेऊन हा व्यवसाय सुरू करणारे युवक व महिला यांच्यासाठी जीवन मरणाचा बनलेला हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी केली होती. या व्यवसायात बंदी आदेश असल्याने राज्यातील सुमारे सहा लाखांवर युवक, महिलांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळण्याचा धोका निर्माण झाला होता. या उद्योग उभारणीसाठी उद्योजकांनी विविध बँकांकडून सुमारे ३ हजार कोटी रुपयाचे अर्थसहाय्य घेतले होते.

या सर्व परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन महाराष्ट्र चेंबरने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे सातत्याने मागणी आणि पाठपुरावा केला होता. वेळोवेळी निवेदन, चर्चा आणि हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आग्रह धरला होता. अखेर नॉन वोव्हन बँग्स व पेपर उत्पादनांना बंदी आदेशातून वगळण्याचा महत्वपूर्ण निर्णय सरकारने घेतल्याने मोठा दिलासा मिळाला आहे.

दरम्यान चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी या निर्णयासाठी सातत्याने पाठपुरावा केल्यानेच हे यश मिळाले आहे. या निर्णयाने राज्यातील व्यापारी, उद्योजकांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या वेळी चेंबरचे प्रभारी सहकार्यवाह जनरल सागर नागरे, विपुल मेहता, संचालक सूर्यकांत रोकडे, पी. सी. जैन, मधुसुदन बियाणी यांच्यासह चेंबरचे पदाधिकारी उपस्थित होते. या निर्णयासाठी मुख्यमंत्र्याचे सचिव विकास खारगे, पर्यावरण सचिव प्रवीण दराडे, आमदार प्रकाश आवाडे यांचे विशेष सहकार्य लाभल्याचेही चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

## मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे व पर्यावरण सचिव प्रविण दराडे यांना धन्यवाद



मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे यांचा सत्कार करताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी. सोबत आमदार प्रकाश आवाडे यांच्यासह आदी मान्यवर.



पर्यावरण सचिव प्रविण दराडे यांना धन्यवाद करून चर्चा करताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी. सोबत मान्यवर.

केंद्र सरकारने सिंगल यूज प्लास्टीक बंदीचा आदेश लागू केल्यानंतर महाराष्ट्रात याची अंमलबजावणी करताना केलेल्या बदलात सुधारणा केली आहे. आता या बंदीतून ६० जीएसएम पेक्षा अधिक जाडीचे नॉन वुव्हन पॉलीप्रॉपिलीन बॅग्ज व पेपर कप, द्रोण, पत्रावळी, स्ट्रॉ, प्लेटस या वस्तूंना बंदीतून वगळण्यात आले आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स'ने ३१ जुलै, २०२२ रोजी औरंगाबाद येथे या विषयावर राज्यस्तरीय परिषद आयोजित करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समोर अडचणी मांडल्या होत्या. त्यावेळी या अधिसूचनेत आवश्यक ती दुरूस्ती करण्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली होती. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' ची याविषयी सातत्याने पाठपुरावा करून यासंबंधीच्या तज्ञ समितिच्या २५ नोव्हेंबरच्या च्या बैठकीत सादरीकरण केले होते. तसेच त्यानंतर २९ नोव्हेंबरच्या रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शक्तीप्रदत समितीपुढे हे विषय मांडून या वस्तू बंदीतून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयासाठी उद्योग मंत्री उदय सामंत, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खरगे, पर्यावरण सचिव प्रवीण दराडे, आमदार प्रकाश आवाडे यांचे विशेष सहकार्य लाभल्याचेही त्यांनी सांगितले. या निर्णयाचा राज्यातील ६ लाखांहून अधिक युवक व महिलांना जीवनदान दिल्याबद्दल अध्यक्ष ललित गांधी यांनी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, पर्यावरण सचिव प्रविण दराडे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन आभार मानले.

# शेठ वालचंद हिराचंद यांच्या दूरदृष्टीमुळे देशातील उद्योगात महाराष्ट्र आघाडीवर; भारतरत्न पुरस्कारासाठी भारत सरकारकडे मागणी करणार : ललित गांधी

## चेंबरचे संस्थापक अध्यक्ष शेठ वालचंद हिराचंद यांची १४० वी जयंती उत्साहात साजरी






**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, शेठ वालचंद हिराचंद यांच्या परिवारातील सदस्य तसेच चेंबरचे माजी अध्यक्ष अरविंदभाई दोशी, उपाध्यक्षा सौ. शुभांगी तिरोडकर, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर दुसऱ्या फोटोमध्ये चेंबर चे पदाधिकारी**

स्वातंत्र्यपूर्वकाळात ब्रिटिश धोरणाविरुद्ध स्थानिक व्यापारी समुदायाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरची स्थापना शेठ वालचंद हिराचंद यांनी केली. महाराष्ट्र राज्याच्या अनेक आर्थिक मुद्द्यावर प्रामुख्याने औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि अंतर्गत व बाह्य व्यापार व्यवसाय सुलभ करण्यासाठी प्रयत्न व मार्गदर्शन शेठ वालचंद हिराचंद यांनी केले. तसेच भारताच्या औद्योगिकीकरणाचा प्रमुख आधारस्तंभ, प्रखर देशभक्त आणि स्वदेशी उद्योगांना चालना देण्याचे ध्येय शेठ वालचंद हिराचंद यांचे असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले. शेठ वालचंद हिराचंद यांच्या दूरदृष्टीमुळे देशात उद्योगात महाराष्ट्र आघाडीवर आहे. देशाच्या व राज्याच्या औद्योगिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणारे शेठ वालचंद हिराचंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला सलाम करून अभिवादन केले. शेठ वालचंद हिराचंद यांच्या कार्याचा गौरव होण्यासाठी भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा यासाठी भारत सरकारकडे मागणी करणार असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

भारताच्या व महाराष्ट्राच्या औद्योगिकीकरणाचे जनक व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांची १४० वी जयंती बुधवार दि. २३ नोव्हेंबर २०२२ रोजी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, शेठ वालचंद हिराचंद यांच्या परिवारातील सदस्य चेंबरचे माजी अध्यक्ष श्री. अरविंदभाई दोशीयांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र चेंबरच्या मुख्य कार्यालयात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, शेठ वालचंद हिराचंद यांच्या परिवारातील सदस्य तसेच चेंबरचे माजी अध्यक्ष अरविंदभाई दोशी यांनी शेठ वालचंद हिराचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी उपाध्यक्षा सौ. शुभांगी तिरोडकर, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर उपस्थित होते.

शेठ वालचंद हिराचंद यांच्या परिवारातील सदस्य तसेच चेंबरचे माजी अध्यक्ष श्री. अरविंदभाई दोशी यांनी शेठ वालचंद हिराचंद यांच्या कार्याचा आढावा घेऊन महाराष्ट्र चेंबरतर्फे राज्यातील व्यापार, उद्योग, कृषी क्षेत्राच्या विकासासाठी शेठ वालचंद हिराचंद यांनी सुरू केलेले कार्य अविरत सुरू असून महाराष्ट्र राज्य व्यापार, उद्योग क्षेत्रात प्रगतीपथावर जाण्यासाठी महत्त्वाची भूमिका महाराष्ट्र चेंबर करत असल्याचे मनोगत व्यक्त केले. शेठ वालचंद हिराचंद यांच्या कार्याचा आदर्श चेंबरच्या माध्यमातून सर्वश्रुत होत असल्याचे सांगितले. आभार प्रदर्शन उपाध्यक्षा सौ. शुभांगी तिरोडकर यांनी केले. याप्रसंगी कार्यकारिणी सदस्य संदीप भंडारी, प्रदीप मांजरेकर, डॉ. धनश्री हरदास, प्रमोद शहा, उत्तम शहा, सुरेश ठक्कर, गिरीश पारख, प्रदिप मांजरेकर, मानसी मांजरेकर, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.





उद्योग विकास आयुक्त दिपेंद्र कुशवाह यांची महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी  व प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे यांनी भेट घेतली. राज्यातील उद्योगांच्या समस्यांबाबत चर्चा केली. अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरतर्फे राज्यातील व्यापार उद्योगांच्या विकासाच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविले जात असून राज्यात उद्योग वृध्दी यात्रा  व महिला उद्योजकता अभियान या दोन उपक्रमाद्वारे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती देऊन उद्योजकता वाढीस प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे व्यापारी उद्योजकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगितले.

याप्रसंगी उद्योग विकास आयुक्त दिपेंद्र सिंग कुशवाह यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याचे कौतुक केले. उद्योग वृध्दी यात्रा व महिला उद्योजकता अभियान या उपक्रमास उद्योग विभागाचा पाठिंबा असल्याचे सांगितले.





न्यू जर्सी, सीजीआय टेक्नॉलॉजीज आणि सोल्युशन्स इंक. चे अध्यक्ष व सीईओ वेस्ली मॅथ्यूज, वरिष्ठ उपाध्यक्ष माईक रेगन, व्यवसाय विकास संचालक विल्यम बिल नूनन, न्यू जर्सी इंडिया सेंटर प्रतिनिधी सौरभ खन्ना यांची मुंबई येथे हॉटेल ताज येथे भेट घेतली. याप्रसंगी अध्यक्ष ललित गांधी यांनी सीजीआय टेक्नॉलॉजीज आणि सोल्युशन्स इंक. चे अध्यक्ष व सीईओ वेस्ली मॅथ्यूज यांचे सन्मान चिन्ह देऊन स्वागत केले. याप्रसंगी राज्यातील व्यापार उद्योग व महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली. सीजीआय टेक्नॉलॉजीज आणि सोल्युशन्स इंक चे अध्यक्ष व सीईओ वेस्ली मॅथ्यूज यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याचे कौतुक केले तसेच व्यापार उद्योगांच्या विकासासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे उपस्थित होते.



**मलबार हिल महाराष्ट्र राजभवन मुंबई येथे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते जनतेसाठी खुले केलेल्या ब्रिटिशकालीन बंकरची पाहणी करतांना अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, महिला समितीच्या चेअरपर्सन सौ. संगिता पाटिल, पर्यटन समितीचे चेअरमन संतोष तावडे, कर समितीचे चेअरमन उदय गोडबोले.**

# शेठ वालचंद हिराचंद यांच्या जयंतीनिमित्त...

# स्फूर्तीदायक अविस्मरणीय भेट



**वालचंद इंडस्ट्रीज चे कार्यकारी संचालक चिराग दोशी यांना 'महाराष्ट्र चेंबर पत्रिका' देताना अध्यक्ष ललित गांधी सोबत स्वप्निल शहा, संतोष दोशी.**



**वालचंद इंडस्ट्रीज येथील 'शेठ वालचंद हिराचंद' यांच्या पूर्णाकृती पुतळयास अभिवादन करताना अध्यक्ष ललित गांधी सोबत स्वप्निल शहा.**

देशाच्या संरक्षण विभागाची सर्वात महत्त्वाची सर्वाधिक उत्पादने बनविणारा कारखाना वालचंदनगर इंडस्ट्रीज

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांनी १९०८ साली उभारलेल्या वालचंद इंडस्ट्रीज या सध्याच्या वालचंदनगर मधील मुख्य कारखाना कार्यस्थळास १७ नोव्हेंबर रोजी भेट दिली.

शंभरहून अधिक वर्षांपूर्वी शेठ वालचंद हिराचंद यांच्या दूरदृष्टीने त्यांनी उभारलेला हा कारखाना परिसर स्तिमित, अचंबित करणारा असा आहे. कारखाना व त्याचा परिसर म्हणजे एक गावच त्या ठिकाणी बसवले गेले.

सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणे योग्य होतील अशी निवासस्थाने.

पूर्ण परिसरासाठी प्युरिफाय फिल्टर वॉटर प्लांट. मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांची सुविधा. फुटबॉल, क्रिकेट, हॉकी, कबड्डी, खो–खो, टेनिस, लॉन टेनिस अशा सर्व प्रकारच्या खेळांची विविध मैदाने इतकेच नव्हे तर गोल्फ मैदान सुद्धा अधिकारी कर्मचाऱ्यांच्या कॉलनीमध्ये प्रत्येक घरात पाणी व आवश्यक सर्व सुविधा, लाईट सुद्धा. या सर्व गोष्टी १०० हून अधिक वर्षांपूर्वी करण्याची दृष्टी ठेवणे हेच मुळात आश्चर्यकारक असे आहे. आज शंभर वर्षानंतर या वसाहती पाहताना जुन्या वाटतात. परंतु त्याकाळी त्या काळाची परिस्थिती विचारात घेतली तर अत्यंत दूरदृष्टीने आधुनिक पद्धतीने बांधलेली वसाहत आजही तशीच टिकून आहे. कारखान्याचा प्रचंड मोठा परिसर, विविध उत्पादनांचे वेगवेगळे विभाग हे सर्व पाहणे निश्चितच स्फूर्तीदायक होते. शेठ वालचंद हिराचंद यांच्या परिवारातील तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधी व चेंबरचे माजी अध्यक्ष श्री. लालचंद हिराचंद यांचे नातू व सध्याचे या कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री चिराग दोशी यांनी आमचे अत्यंत उत्साहात व आदरपूर्वक स्वागत केले. त्यांच्याशी विविध विषयावर मनमोकळ्या गप्पा मारता आल्या. या भेटीप्रसंगी त्यांनी शेठ वालचंद हिराचंद यांच्या जीवन चरित्राच्या मराठी व इंग्रजीतील दोन प्रती मला भेट दिल्या. माझ्यासाठी ही भेट अमूल्य अशीच आहे.

श्री चिराग दोशी म्हणाले की कारखाना कार्यस्थळावर महाराष्ट्र चेंबर कडून मला भेटायला आलेले आपण पाहिलेच अध्यक्ष आहात. आपल्या भेटीचा आनंद आहे व हे संबंध वृद्धिंगत व्हावेत अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

शेठ वालचंद हिराचंद यांच्या पन्नासाव्या स्मृती व्याख्यानमालेला उपस्थित राहण्याचे मान्य करून या पुढील काळात चेंबरच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचा प्रयत्न करू अशी ग्वाही सुद्धा श्री चिराग दोशी यांनी दिली. वालचंदनगर इंडस्ट्रीज मध्ये सध्या देशाच्या

MiTEX
MAHARASHTRA INTERNATIONAL TRADE EXPO
17th to 26th February, 2023
Bandra Kurla Complex, Mumbai
MAHARASHTRA'S LARGEST TRADE FAIR
TEXTILES / FASHION & ACCS.
आपल्या व्यापार-उद्योगाच्या वाढीसाठी अवश्य सहभागी व्हा!
ORGANISED BY : MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY AND AGRICULTURE
REGISTER NOW

संरक्षण खात्याला तसेच इस्रो व अन्य संबंधित संस्थांना लागणारी उत्पादने बनवली जातात. त्यामुळे सुरक्षेची बंधने असल्याने कारखान्याच्या आतील भागातील फोटो काढता आले नाहीत. परंतु देशाच्या सुरक्षा व्यवस्थेत अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका निभावणाऱ्या विविध मिसाईल चे उत्पादन या ठिकाणी सुरू होते ते पाहायला मिळाले.

देशाच्या संरक्षण विषयक उत्पादनामध्ये भारताला आत्मनिर्भर बनवण्यामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण, ज्या ठिकाणी उच्च गुणवत्ता लागते अशी उत्पादने वालचंदनगर इंडस्ट्रीज मध्ये बनतात.

देशाच्या संरक्षण सिद्धतेतील अत्यंत महत्त्वाची उपकरणे बनवण्यात वालचंदनगर इंडस्ट्रीचा वाटा सर्वात मोठा आहे हे जाणून घेताना अभिमानाने उर भरून आला. देशाच्या रॉकेट लॉन्चिंग विभागामध्ये लागणारी सर्वात महत्त्वाची उत्पादने याच ठिकाणी बनवली जातात. भारताने राबवलेल्या चांद्रयान, मंगळयान, अग्नीयान या विविध मोहिमांमध्ये व आगामी मोहिमांमध्ये लागणारी सर्व महत्त्वाची उपकरणे वालचंद नगर इंडस्ट्रीमध्येच बनवली जातात. एकेकाळी अनेक वेगवेगळी उत्पादने या ठिकाणी केली जात होती. सध्या संरक्षण विषयक उत्पादनावर प्रामुख्याने भर दिला गेला आहे.

संपूर्ण साखर कारखान्याची यंत्रसामग्री, संपूर्ण सिमेंट कारखान्याची यंत्रसामग्री या ठिकाणी बनवली जात होती. कारखान्याचा हा भव्य परिसर या उद्योगाच्या निमित्ताने वसलेले वालचंदनगर हे गाव.

शेठ वालचंद हिराचंद राहत असलेले व सध्या गेस्ट हाऊस म्हणून वापरत असलेले त्यांचे निवासस्थान. शाळा व विविध सामाजिक उपक्रम या सर्व गोष्टी पाहताना वाटणारा आनंद व अभिमान एक वेगळाच होता.

शेठ वालचंद हिराचंद यांच्या कर्तृत्वाबद्दल थोडक्यात लिहिणे अशक्य आहे. परंतु एक व्यक्ती किती वेगवेगळ्या उत्पादनांचा विचार करू शकते. किती दूरदृष्टी असू शकते, याचे एक अत्यंत दुर्मिळ असे उदाहरण म्हणजे शेठ वालचंद हिराचंद.

कारखाना परिसर, सर्व महत्वपूर्ण उपक्रम व घटनांची माहिती आम्हाला देण्यासाठी कारखान्याचे वरिष्ठ अधिकारी श्री हरी डोळे व श्री.डी.आर. सरदेशमुख यांनी आम्हाला भरपूर वेळ दिला याबद्दल आम्ही त्यांना विशेष धन्यवाद ही दिले. या भेटी प्रसंगी माझ्या सोबत असलेले चेंबरच्या गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य श्री स्वप्नील शहा, वालचंदनगर येथील आपले सदस्य श्री संतोष दोशी, आम्ही सर्वांनी शेठ वालचंद हिराचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

कधीही विसरता येणार नाहीत अशा विविध आठवणींचा खजिना सोबत घेऊन, चेंबरच्या सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्यांना बैठकीसाठी श्री चिराग दोशी यांनी दिलेले आमंत्रण स्वीकारून, मी परत आलो... एका नव्या ऊर्जेसह... जगातील सर्वकालीन सर्वश्रेष्ठ उद्योजकापैकी एक भारताच्या व महाराष्ट्राच्या औद्योगीकरणाचे जनक अशा शेठ वालचंद हिराचंद यांचा महाराष्ट्र चेंबरमधील वारसा चालवताना महाराष्ट्रासाठी जे जे काही उत्तम करता येईल ते करण्याच्या दृढ संकल्पासह ...

**ललित गांधी,** अध्यक्ष.



**शेठ वालचंद हिराचंद यांच्या प्रचंड मोठ्या उद्योग समूहाचे त्याकाळी मुख्यालय असलेले कन्स्ट्रक्शन हाऊस येथील त्यांच्या पुतळ्यास १४० व्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी, संदीप भंडारी,विकास अच्छा, दीपक मेहता, सागर नागरे.**





कौशल्य विकास , रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, महाराष्ट्र सरकार व महाराष्ट्र चेंबरमध्ये सामंजस्य कराराप्रसंगी मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दुसऱ्या फोटोमध्ये महामहिम राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता, पर्यटन आणि महिला व बाल विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती मनीषा वर्मा, महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे.

# तरुणांना रोजगारासाठी उद्योग जगताचा सहभाग महत्त्वपूर्ण : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## महाराष्ट्र चेंबरचा उद्योजकता विभागाशी सामंजस्य करार

**नवी दिल्ली :** कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, महाराष्ट्र सरकार व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रिकल्चरमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून नोकरी मिळण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण देणे, जिल्हास्तरीय रोजगार मेळावे आयोजित करणे, कौशल्य विभागाच्या सहकार्याने गाव पातळीवर एक हजार कौशल्य विकास केंद्र निर्माण करण्याकरिता प्रयत्न करण्यात येणार आहे.

दिल्ली येथील राजभवनात महामहिम राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता, पर्यटन आणि महिला व बाल विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती मनीषा वर्मा, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार झाला.

राज्यपाल भगतसिंग कोश्यारी म्हणाले, सरकारच्या कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता विभाग व महाराष्ट्र चेंबर यांच्यात सामंजस्य करार झाला. या कराराने राज्यातील व्यापार उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल. नवीन उद्योजक तयार होतील. महाराष्ट्र चेंबर राज्याच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, राज्यामध्ये रोजगार मेळावे, कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम, व्होकेशनल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, आयटीआयच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात. तरुणांना रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. येत्या काही दिवसांत राज्यातील ५८९ आयटीआयला अद्यायावत करण्यात येणार आहे. राज्यातील १ हजार गावांमध्ये कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यात येणार आहे. तरुणांना काम देण्यासाठी विविध उपक्रमाच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. राज्यातील व्यापार उद्योगांचा विकासासाठी व तरुणांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने सरकार कटिबद्ध आहे. महाराष्ट्र चेंबर व कौशल्य, रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता विभाग यांच्यात झालेल्या सामंजस्य करारामुळे उद्योग क्षेत्राचा विकास होऊन तरुणांना रोजगार उपलब्ध होईल.

व्यापार, उद्योग वाढीसाठी व रोजगार निर्मितीसाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. ते म्हणाले, राज्यात उद्योगांना आवश्यक असलेले प्रशिक्षित मनुष्यबळ मिळावे यासाठी तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देण्याचे काम कौशल्य विकास विभाग करत आहे. शेती क्षेत्र, सेवा क्षेत्र उत्पादन क्षेत्राला जोडल्यानंतर चांगले काम होईल व राज्याचा आणि व्यापार उद्योग क्षेत्राचा स्थिर विकास होईल.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी राज्यातील व्यापार, उद्योगांच्या विकासासाठी व तरुणांना रोजगार मिळण्याच्या हेतूने महाराष्ट्र चेंबर तर्फे विविध उपक्रम व कौशल्य विकास प्रशिक्षण राबविण्यात येत असल्याचे सांगितले. यासंदर्भातील आणखी माहिती देताना ते म्हणाले, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आणि नाविन्यता विभागासोबत झालेल्या या कराराने उद्योग वाढीला अधिक बळ मिळणार आहे. महाराष्ट्र चेंबर या विभागाच्या सहकार्याने राज्यात जिल्हास्तरावर व गावपातळीवर तरुणांसाठी रोजगार मेळावे, कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. कौशल्य विकासासाठी उत्कृष्ट काम करण्यात येईल. तसेच राज्यात महिला उद्योजकता अभियान व उद्योगवृद्धी यात्रेच्या माध्यमातून महिला व तरुणांना प्रशिक्षण दिले जाईल. उद्योग करण्यास मार्गदर्शन, शासनाच्या योजनांची माहितीही दिली जाणार आहे.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र चेंबरच्या महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील, एमएसएमई समितीचे चेअरमन प्रकाश शहा, स्किल कौन्सिल समितीचे को चेअरमन स्वप्निल शहा, कार्यकारिणी सदस्य नितीन धूत, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे उपस्थित होते. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या प्रधान श्रीमती मनीषा वर्मा यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाचे आयुक्त डॉ. रामास्वामी एन यांनी आभार मानले.

- **कौशल्य प्रशिक्षण मिळणार**
- **जिल्हास्तरीय रोजगार मेळावे**
- **एक हजार कौशल्य विकास केंद्राची उभारणी करणार**
- **राज्यातील ५८९ आयटीआय अद्यावयत होणार**
- **नवउद्योजक तयार होणार**
- **महिला आणि तरुणांना विशेष प्रशिक्षण**




## ॲडव्हाटेज महाराष्ट्र एक्स्पो २०२३ मध्ये अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार

औरंगाबाद येथे मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरतर्फे ॲडव्हाटेज महाराष्ट्र एक्स्पो २०२३ आयोजन करण्यात आले होते. ॲडव्हाटेज महाराष्ट्र एक्स्पो २०२३ला महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी भेट दिली. याप्रसंगी मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष किरण जगताप यांनी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष श्री. ललित गांधी यांचा सन्मानचिन्ह देऊन स्वागत व सत्कार केला. उपाध्यक्ष तनसुख झांबड यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. याप्रसंगी मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरतर्फे आयोजित ॲडव्हाटेज महाराष्ट्र एक्स्पो २०२३ ची माहिती दिली. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी एक्स्पोस मिळालेल्या प्रतिसाद व उत्कृष्ट आयोजनाबद्दल टिमचे कौतुक केले.

याप्रसंगी संयोजक अभय हंचनल, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष तनसुख झांबड, दुश्यंत आठवले, किशोर राठी, अनिल पाटील, सचिन गायके उपस्थित होते.

# महाराष्ट्र, उत्तराखंड उद्योगांना स्टार्टअप



''सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन'' व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रीकल्चर यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराप्रसंगी मान. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, उत्तराखंडचे उद्योग मंत्री चंदन राम दास, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. हरिंद्र कुमार गर्ग, महाराष्ट्र चेंबरच्या विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, पर्यटन समितीचे चेअरमन संतोष तावडे, टॅक्सेशन कमिटीचे चेअरमन उदय गोडबोले, इंटरनल ट्रेड कमिटीचे चेअरमन प्रदीप मांजरेकर, ट्रेड असोसिएशन कमिटीचे चेअरमन धैर्यशील पाटील आदी.

## महाराष्ट्र चेंबर व सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन सामंजस्य करारामुळे दोन्ही राज्याच्या व्यापार उद्योगांचा विकास होईल : राज्यपाल भगतसिंह कोश्यारी

### महाराष्ट्र व उत्तराखंड राज्यातील गुंतवणुकीसाठी सहकार्याचे ललित गांधी यांना उत्तराखंडचे उद्योग मंत्री चंदन राम दास यांचे आश्वासन

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र चेंबर व सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन सामंजस्य करारामुळे महाराष्ट्र आणि उत्तराखंड या दोन्ही राज्याच्या व्यापार उद्योगांच्या विकास निश्चितच होईल, असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अॅग्रीकल्चर यांच्यात १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी राजभवन येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये हा सामंजस्य करार करण्यात आला. त्या वेळी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी हे प्रतिपादन केले. दोन्ही राज्यांनी केलेल्या या कराराचे त्यांनी कौतुक केले. चेंबरने हे महत्वपूर्ण आणि सकारात्मक पाऊल टाकले आहे, असे सांगून महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची प्रशंसा केली. उत्तराखंडचे उद्योगमंत्री श्री. चंदन राम दास, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. हरिंद्र कुमार गर्ग यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

उत्तराखंडचे उद्योगमंत्री चंदन राम दास यांनी उत्तराखंड सरकारच्या विविध उपक्रमांची आणि योजनांची माहिती दिली. उत्तराखंड मध्ये व्यापार उद्योगांसाठी पोषक वातावरण आहे. दोन्ही राज्यातील उद्योगांच्या गरजेनुसार गुंतवणुकीसाठी सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांना देऊन तसेच महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळास उत्तराखंडच्या भेटीचे निमंत्रणही उद्योगमंत्री चंदन राम दास यांनी दिले.

MAHARASHTRA'S LARGEST TRADE FAIR
PROCESSED FOOD
आपल्या व्यापार-उद्योगाच्या वाढीसाठी अवश्य सहभागी व्हा!
ORGANISED BY : MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY AND AGRICULTURE
MITEX
MAHARASHTRA INTERNATIONAL TRADE EXPO
17th to 26th February, 2023
Bandra Kurla Complex, Mumbai
REGISTER NOW





**''सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन'' व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अॅग्रीकल्चर यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराप्रसंगी चर्चा करताना मान. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी. यावेळी उत्तराखंडचे उद्योग मंत्री चंदन राम दास, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित मान्यवर.**





**मान. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, उत्तराखंडचे उद्योग मंत्री चंदन राम दास यांच्यासोबत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, आशिष पेडणेकर, करुणाकर शेट्टी, संतोष तावडे, संगीता पाटील, उदय गोडबोले, प्रदीप मांजरेकर, धैर्यशील पाटील**

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या विविध उपक्रमांची माहिती सांगितली. अध्यक्ष गांधी म्हणाले, राज्यातील व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबरतर्फे इन्वेस्ट इन महाराष्ट्र अभियान सुरु केले आहे. इतर देशांबरोबरच भारतातील अन्य राज्यांसोबत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन समवेत सामंजस्य करार करून दोन्ही राज्यातील व्यापार, उद्योग, कृषी क्षेत्रातील उत्पादनांची आयात-निर्यात करणे. दोन्ही राज्यात गुंतवणूक वाढविण्यासाठी संयुक्त उपक्रम राबविणे. त्यासह माहितीची देवाण-घेवाण करण्यात येणार आहे. महाराष्ट्र चेंबरतर्फे राज्यात व्यापार उद्योग वाढीसाठी महिला उद्योजकता अभियान, उद्योग वृद्धी यात्रा, महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्सपोचे आयोजन केले आहे.

सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. हरिंद्र कुमार गर्ग यांनी उत्तराखंडमध्ये व्यापार उदयोगांच्या संधींबाबत माहिती दिली. तसेच व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्रासाठी उत्तराखंडमध्ये गुंतवणूक करण्यास सकारात्मक वातावरण असल्याचे सांगितले. व्यापार उद्योगांच्या विकासासाठी माहितीची देवाण -घेवाण करून व्यापार उद्योगांचा विकास करण्यासाठी सर्व प्रकारचे सहकार्य केले जाईल, असेही त्यांनी सांगितले. या वेळी महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळात विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील, पर्यटन समितीचे चेअरमन संतोष तावडे, इंटरनॅशनल रिलेशन्स कमिटीचे चेअरमन मनप्रीत नेगी, टॅक्सेशन कमिटीचे चेअरमन उदय गोडबोले, इंटरनल ट्रेड कमिटीचे चेअरमन प्रदीप मांजरेकर, ट्रेड असोसिएशन कमिटीचे चेअरमन धैर्यशील पाटील, प्रभारी सहकार्यवाह सागर नागरे यांचा समावेश होता. त्यांच्यासह उत्तराखंडमधील उद्योजक जगदीश लाल पहावा, डॉ. मोहिंदर आहूजा, रणजीत जालान, सुयश वालिया, राकेश कुमार त्यागी, जतीन अग्रवाल, सुरेश बोरा, सुभाष शर्मा, अनिल कुमार, शैलेश अजमेरा, कुणाल दाढीया, विमलकुमार सिंग, खुबिलाल राठोड हे उद्योजक उपस्थित होते. गुंतवणूक केंद्राची स्थापना उत्तराखंडमध्ये गुंतवणूक वाढविण्यासाठी महाराष्ट्र चेंबरमध्ये गुंतवणूक केंद्र स्थापन करण्यात येईल, असे आश्वासन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी उत्तराखंडचे उद्योगमंत्री चंदन राम दास यांना दिले.

## राज्यातील विमानसेवांना मिळणार भरारी

# महाराष्ट्रातील विमानसेवांना गती देण्यात येईल : केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधीया

### महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी यांना आश्वासन

### जळगाव, नांदेड, गोंदिया, लातूर येथून लवकरच विमानसेवा सुरू करण्याचे विशेष प्रयत्न




**दिल्ली येथे झालेल्या बैठकीत केंद्रीयमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांचा सत्कार करताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी. उपस्थितात शशांक त्रिवेदी, योगिन गुर्जर, केतन शहा आदी.**

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील विमानसेवांना गती देण्यासाठी नागरी उड्डाण मंत्रालयातर्फे विशेष प्रयत्न केले जातील, अशी ठोस ग्वाही केंद्रीय विमान वाहतूकमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजला दिली. चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाला त्यांनी दिल्ली येथे बैठकीसाठी शुक्रवारी आमंत्रित केले होते. त्यावेळी त्यांनी हे ठोस आश्वासन दिले. नवी दिल्ली येथील नागरी उडडयन मंत्रालय, राजीव गांधी भवन येथे बैठक झाली.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी ज्योतिरादित्य सिंधीया यांची कोल्हापूर दौर्‍याच्या वेळी भेट घेतली होती. राज्यातील विमातळांचे प्रश्न महत्वाचे असून ते तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी केली होती. त्या पार्श्वभूमीवर विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधीया यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या शिष्टमंडळाला दिल्ली येथे बैठकीसाठी आमंत्रित केले होते. या बैठकीत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्रातील विविध विमानतळांच्या सद्यस्थितीचा व महाराष्ट्राच्या अपेक्षांचा अहवाल त्यांना सादर केला. महाराष्ट्रातील नांदेड, जळगाव, लातूर, गोंदिया या पूर्ण असलेल्या विमतळावर विमानसेवा तत्काळ सुरु करावी, अशी मागणी अध्यक्ष गांधी यांनी केली. त्यावर विमान कंपन्यासोबत बैठक घेऊन या विमानसेवा लवकरात लवकर सुरु करण्याचे आश्वासन केंद्रीय मंत्री सिंधीया यांनी दिले. सोलापूर विमातळप्रश्नी सुरु असलेले सोलापूर विकास मंचचे आंदोलन आणि विमातळाची सद्यस्थितीची माहिती अध्यक्ष गांधी यांनी त्यांना दिली. त्या वेळी सोलापूर विमानतळावरील अडथळे दूर करण्यासाठी राज्य सरकारला सूचना दिल्या आहेत. लवकरच तोही विमानतळ सुरु करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशीही ग्वाही मंत्री सिंधीया यांनी दिली. अध्यक्ष गांधी यांनी अमरावती, रत्नागिरी या दोन्ही विमानतळांचे प्रश्न त्यांच्यासमोर मांडले. त्या वेळी अमरावती, रत्नागिरी या दोन्ही विमानतळाची कामेही गतीने पूर्ण केली जातील. या



दोन्ही विमातळावरुन लवकरच विमानसेवा सुरु केली जाईल, असे त्यांनी सांगितले. कोल्हापूर विमानतळ विस्तारीकरणाची कामे गतीने पूर्ण करावीत व कार्गो टर्मिनल सेवा सुरू करावी अशीही त्यांनी मागणी केली. त्या वेळी मंत्री सिंधीया यांनी ही कामे गतीने पूर्ण करण्याची व कार्गो सेवा सुरू करण्याची ग्वाही अध्यक्ष गांधी यांना दिली. शिष्टमंडळात शशांक त्रिवेदी, योगिन गुर्जर, केतन शहा यांचा समावेश होता.




REGISTER NOW



# महाराष्ट्रात ‘तीन’ पीएम मित्र वस्त्रोद्योग क्लस्टर’ द्यावेत, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची पियुष गोयल यांच्याकडे मागणी

## डिफेन्स व इलेक्ट्रॉनिक्स क्लस्टरसाठी ही पाठपुरावा करणार

**मुंबई** : केंद्र सरकारच्या नवीन पीएममित्र टेक्सटाईल पार्क धोरणानुसार होणाऱ्या सात वस्त्रोद्योग क्लस्टरर्स पैकी तीन क्लस्टर्स महाराष्ट्रासाठी द्यावेत अशी मागणी

‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर’ चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय वस्त्रोद्योगमंत्री पियुष गोयल यांचेकडे केली.

महाराष्ट्रात ईचलकरंजी, भिवंडी व मालेगांव ही तीन केंद्रे वस्त्रोद्योगासाठी प्रसिध्द आहेत या ठीकाणी वस्त्रोद्योग मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहे. त्यामुळे वस्त्रोद्योग मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहे. त्यामुळे वस्त्रोद्योगातील सर्व प्रकारांसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ आवश्यक तंत्रज्ञान महाराष्ट्रात सहजपणे उपलब्ध आहे.

पीएम मित्र पार्क वस्त्रोद्योग क्लस्टर मुळे वस्त्रोद्योगातील आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याबरोबर तरूणांना वस्त्रोद्योग करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल व मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतील. त्यामुळे महाराष्ट्रात कोल्हापूर, औरंगाबाद, ठाणे, लातुर, नाशिक, नागपुर या सहापैकी जागा उपलब्ध असेल अशा तीन ठीकाणी नवीन वस्त्रोद्योग क्लस्टर्स मंजुर करावीत अशी मागणी राज्याच्या व्यापार-उद्योग क्षेत्राची शिखर संस्था ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर’ च्या वतीने अध्यक्ष ललित गांधी यांनी केली. या योजनेमध्ये वस्त्रोद्योगासाठी थेट उत्पादन सुरू करता येईल अशी तयार युनिटस् विकसित करण्याची योजना आहे. यासाठी १००० जागा उपलब्ध असण्याची अट असुन या पीएस मित्र टेक्सटाईल पार्क योजनेत ग्रीनफील्ड क्लस्टर उभारण्यासाठी ५०० कोटी रूपये व ब्राउनफिल्ड क्लस्टर उभारण्यासाठी २०० कोटी रूपये इतके अनुदान केंद्र सरकारकडुन देण्यात येणार आहे. गेल्या अर्थसंकल्पात केंद्र सरकारने अशा प्रकारची सात क्लस्टर्स उभारण्यासाठी ४५०० कोटी रूपयांची तरतुद अर्थसंकल्पात केली असल्याने सदर प्रकल्प लवकर कार्यान्वित होऊ शकतात अशी माहीतीही ललित गांधी यांनी दिली.

MiTEX
MAHARASHTRA INTERNATIONAL TRADE EXPO
17th to 26th February, 2023
Bandra Kurla Complex, Mumbai
MAHARASHTRA'S LARGEST TRADE FAIR
AUTOMOBILES – FOCUS ON E.V.
आपल्या व्यापार-उद्योगाच्या वाढीसाठी अवश्य सहभागी व्हा!
ORGANISED BY : MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY AND AGRICULTURE
REGISTER NOW

## महाराष्ट्र चेंबरसोबत लवकरच बैठक घेणार

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने रेल्वेविषयक केलेल्या मागण्या प्राधान्याने पुर्ण करू – रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव



दिल्ली : राज्याच्या उद्योग, व्यापाराला चालना देण्यासाठी भारतात आणि महाराष्ट्र राज्यात रेल्वेचे जाळे अधिक विस्तारित करावेत. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात रेल्वेसेवा वाढवून नवे रेल्वेमार्ग जोडावेत. राज्यातील रेल्वे सेवांच्या प्रश्नी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अँग्रीकल्चर सोबत केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने संबधितांना बैठक घेण्याची सूचना करावी, अशी मागणी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री, संवाद, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली. त्यांनी नवी दिल्ली, रेल्वेभवन येथे त्यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले. त्यावेळी त्यांनी महाराष्ट्र चेंबरसोबत लवकरच बैठकीचे नियोजन केले जाईल, अशी ग्वाही दिली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर ही राज्याच्या आर्थिक विकासासाठी काम करणारी सर्वोच्च संस्था आहे. आर्थिक विकासाच्या वाटेवर महाराष्ट्र राज्यासमोर अनेक आव्हाने आहेत. रेल्वेच्या विकासासाठी सहकार्य करणाया घटकांसोबत चर्चा आणि बैठक घेतल्यानंतर या आव्हानांवर मात करता येऊ शकते, असे चेंबरचे मत आहे. आपल्या नेतृत्वाखाली देशातील भारतीय रेल्वे विकासाने जलद गतीने वाढ केली आहे. महाराष्ट्र चेंबरने राज्यातील उद्योगाच्या सर्वांगीण वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि मेक इन महाराष्ट्र च्या संयोगाने आत्मनिर्भर भारत योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी, म हाराष्ट्रातील उद्योग आणि व्यवसायाची वाढ वाढवण्यासाठी राज्यव्यापी अभ्यास दौरा हाती घेतला आहे. त्यानुसार चेंबरने काही शिफारशी मांडल्या आहेत. त्यांचा विचार करण्याची मागणी चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय मंत्री वैष्णव यांच्याकडे केली.

**विद्युतीकरण गतीने करा**

कॉरिडॉरसह औद्योगिकीकरणाला गती द्यावी. कॉरिडॉरच्या बाजूने लॉजिस्टिक पायाभूत सुविधा विकसित कराव्यात. देशांतर्गत कृषी उत्पादनांसाठी मध्य भारतापासून देशाच्या पूर्व भागापर्यंत रेल्वे सेवा द्यावी. ऑटोमोबाईल, अभियांत्रिकी आणि फार्मास्युटिकल उत्पादनांची निर्यातीसाठी सेवा द्यावी, अशी मागणी करण्यात आली. महाराष्ट्रातील विविध मार्गावर सुरु असलेले विद्युतीकरण आणि दुहेरी ट्रॅक सुविधेचे काम प्राधान्याने पूर्ण करावे.



## महाराष्ट्र चेंबर चा दिल्लीतील आवाज म्हणुन नेहमीच सहकार्य करू : खास. धनंजय महाडीक

### खासदार धनंजयजी महाडीक यांची महाराष्ट्र चेंबर ला सदिच्छा भेट!

खासदार धनंजय महाडीक यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरच्या कार्यालयात सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली व राज्यातील व्यापार उद्योगांना देश व जागतिक स्तरावर बाजारपेठ मिळवून देण्यात महाराष्ट्र चेंबरने महत्वाची भूमिका बजावली असल्याचे सांगितले. खासदार धनंजय महाडीक यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याचे कौतुक केले व व्यापार उद्योगांच्या विकासासाठी संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन अध्यक्ष ललित गांधी यांना दिले.



# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी डिस्ट्रीक्ट डेव्हलपमेंट फोरम ची स्थापना : ललित गांधी

**सातारा :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रीकल्चरतर्फे सातारा जिल्हा विकास मंच स्थापन केला जाणार आहे. लवकरच चेंबरचे अद्यावयत कार्यालय सुरु करण्यात येणार आहे. या मंचच्या माध्यमातून जिल्ह्यातील उद्योजकतेला वाव दिला जाणार आहे. नवउद्योजकांना ही एक नवीन संधी मिळणार आहे. ही माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सातारा येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, सातारा जिल्ह्यामध्ये उद्योग, व्यवसाय, पर्यावरण, पर्यटनासाठी प्रचंड वाव आहे. सातारा शहर आणि जिल्ह्यातील अनेक उद्योजक, व्यावसायिकांच्या सोबत बैठक आणि चर्चा झाली आहे. या सर्व उदयोजकांचा सातारा जिल्हा विकासासाठी सकारात्मक पाऊल आहे. बैठकीत तंत्रप्रधान व्यवसाय, माहिती तंत्रज्ञान पार्क यासारख्या सुविधा उपलब्ध झाल्यास, त्यासह अन्न उद्योग प्रक्रियासारख्या व्यवसायांना उत्तेजन दिले गेल्यास साताऱ्यात खूप मोठी संधी आहे. या गरजा जाणून घेऊन पहिल्या बैठकीत जिल्हा विकास मंच स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

अधिक माहिती देताना श्री. ललित गांधी म्हणाले, मंचमध्ये सातारा जिल्ह्यातील व्यावसायिकांची कार्यकारिणी स्थापन करण्यात येणार आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीच्या माध्यमातून नवीन उद्योजकांचा शोध घेणे. त्यांचे उद्योग प्रकल्प तयार करणे. त्यांना कर्जविषयक सुविधा उपलब्ध करुन देणे. नवीन व्यवसाय आणि विकासाच्या संधी शोधणे, यासारख्या मार्गदर्शनपर सुविधा या मंचच्या माध्यम तून सातारा जिल्ह्यातील उद्योजकांसाठी देण्यात येणार आहेत. केंद्र सरकारच्या नवीन धोरणानुसार जर सातारा जिल्ह्यात २५० एकर जागा उपलब्ध झाल्यास इलेक्ट्रॉनिक पार्क तयार करण्यासाठी संधी आहे. याशिवाय ॲमेझान फ्लिककार्ट यासारख्या बड्या



**सातारा जिल्हा व्यापारी, उद्योजकांच्या बैठकीत बोलताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, चेंबर चे गव्हर्निंग काऊन्सील सदस्य धैर्यशील कदम, धैर्यशील भोसले, महाराष्ट्र राज्य ट्रान्स्पोर्ट असोसिएशनचे प्रकाश गवळी**

MiTEX
MAHARASHTRA INTERNATIONAL TRADE EXPO
17th to 26th February, 2023
Bandra Kurla Complex, Mumbai
MAHARASHTRA'S LARGEST TRADE FAIR
REAL ESTATE DEVELOPERS
आपल्या व्यापार-उद्योगाच्या वाढीसाठी अवश्य सहभागी व्हा!
ORGANISED BY : MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY AND AGRICULTURE
REGISTER NOW






**सातारा जिल्हा व्यापारी, उद्योजक, विविध संस्था, संघटनांच्या वतीने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार करण्यात आला.**

जागतिक कंपन्याचे ऑनलाइन मार्केटिंगचे अतिक्रमण सर्वच रिटेलर आणि विक्रेत्यावर होत आहे. त्याला उत्तर देण्यासाठी आम्ही आत्म निर्भर ॲप तयार करण्याचे काम सुरु झाले आहे. त्याची सध्या चाचपणी सुरु असून हे ॲप मोफत उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

राज्य सरकारने पश्चिम महाराष्ट्रातील उद्योग, व्यवसाय, पर्यटन विस्तीकरणाबाबतचे धोरण लवचिक आणि व्यवसायभिमुख बनवावे. यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील उद्योजकांची बांधणी सुरु आहे. एम आयडीसीच्या विविध सुविधांसाठी राज्य सरकारकडे निश्चितच पाठपुरावा केला जाणार असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला चेंबरचे गव्हर्निंग काऊन्सिल सदस्य धैर्यशील कदम, सचिन दोशी, राजन मामनिया, आय. टी. क्षेत्रातील मनीष शहा, महाराष्ट्र राज्य ट्रान्स्पोर्ट असोसिएशनचे प्रकाश गवळी, मनोज शहा, फार्मासिटीकल क्षेत्रातील नितीन शहा, क्रेडाई साताराचे राहुल वखारिया, डॉ. सचिन साळुंखे, निलेश शहा, विकास गोसावी, जितेंद्र शहा आदी उपस्थित होते. दरम्यान सातारा दौऱ्यात अध्यक्ष ललित गांधी यांचा विविध मान्यवर, संस्था, संघटनेतर्फे स्वागत आणि सत्कार करण्यात आला.

## जिल्हा फोरम तातडीने पाठपुरावा करणार

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स राज्यातील सर्व जिल्ह्यात पोहोचणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात उद्योग–व्यवसाय, व्यापार, पर्यटनासाठी जिल्हा फोरम स्थापन करणार आहे. स्थापन केलेले फोरमच्या माध्यमातून समाजातील सर्वच विषयांपर्यंत पोहोचून प्रश्न मार्गी लावणार आहेत. त्या–त्या जिल्हा फोरम कडून माहिती घेऊन संबधित प्रश्न राज्य आणि केंद्र सरकारपर्यंत पोहोचविले जाणार आहेत. त्या फोरमची मागणी आणि ती पूर्ण होण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाणार आहे. विशेषतः बेरोजगारी कमी करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाची मोहिमही हाती घेतली जाणार आहे. सातारा जिल्हा यापुढे दुर्लक्षित राहणार नाही, याची विशेष काळजी घेतली जाईल. पर्यावरणाचे कोणतेही नुकसान होणार नाही, याचे भान सातत्याने ठेवले जाऊनच उद्योग विस्तारले जातील.

## व्यापारी अर्थव्यवस्थेचा कणा

देशातील उद्योग उभारणीत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲग्रीकल्चरचा मोठा वाटा आहे. सरकारला जोडणारा दुवा म्हणजे महाराष्ट्र चेंबर आहे. चेंबरच्या माध्यमातून सर्व व्यापारी, उद्योजकांचे प्रश्न मार्गी लागतात. एक हक्कांचे व्यासपीठ म्हणून मासिआ सर्वांना संधी उपलब्ध करुन देत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील व्यापारी, उद्योजक निश्चितच मोठ्या संख्येने महाराष्ट्र चेंबरचे सदस्य होतील, अशी ग्वाही गव्हर्निंग काऊन्सिल सदस्य आणि धैर्यशील कदम यांनी बैठकीत दिली.

## चेंबरचे दैदिप्यमान यश

बैठकीत धैर्यशील भोसले यांनी नॉनवूव्हन वस्तूवरील बंदी अधिसूचनेत बदल करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे सहा लाख सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना दिलासा मिळाल्याने मोठे देदिप्यमान यश मिळाल्याचे गौरवोद्गागार ही त्यांनी काढले.

## नॉन वूव्हन अधिसूचना अंमलबजावणीची घेतली माहिती

जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. सातारा एमपीसीबीचे लिंबाजी भड, सातारा जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक कमलाकर जवळघे यांनी स्वागत केले. सरकारने ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी कागदापासून आणि एकदाच वापर होणाऱ्या केवळ विघटनशील वस्तूंवरील बंदी उठविली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी होत आहे का, याची माहिती अध्यक्ष आणि पर्यावरण मंत्रालयाचे समिती सदस्य म्हणून ललित गांधी यांनी अधिकाऱ्यांकडून घेतली.

MiTEX
MAHARASHTRA INTERNATIONAL TRADE EXPO
17th to 26th February, 2023
MAHARASHTRA'S LARGEST TRADE FAIR
BUILDING MATERIALS
आपल्या व्यापार-उद्योगाच्या वाढीसाठी अवश्य सहभागी व्हा!
ORGANISED BY : MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY AND AGRICULTURE
REGISTER NOW

# सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र चेंबर काम करणार : ललित गांधी

## सोलापूरात लवकरच चेंबरचे जिल्हाकार्यालय





**सोलापुरातील शासकीय विश्रामगृहात येथे आयोजित जिल्हास्तरीय व्यापार-उद्योग परिषदेत मार्गदर्शन करताना 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' चे अध्यक्ष ललित गांधी व्यासपीठावर मिलिंद भोसले, नरसिंग मेंगजी, केतन शहा, स्वप्नील शहा, प्रेमरतन दमाणी आदी.**

**सोलापूर :** सोलापूर विकास मंच व सोलापुरातील व्यापाऱ्यांची शासकीय विश्राम गृह येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीत महाराष्ट्र ऑफ चेंबर्सचे राज्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी मार्गदर्शन केले. सोलापूरच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू. होटगी रोड विमानतळासाठी गेल्या वीस दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू आहे. या उपोषण ठिकाणी येऊन सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष धर्मराज कडादी यांनी सोलापूर विकास मंचचे केतन शहा यांना धमकी देत बघून घेण्याची भाषा वापरली. तसेच रिव्हॉल्व्हर काढून दाखवले. या प्रकारामुळे सोलापुरातील वातावरण बिघडले आहे. त्या पार्श्वभुमीवर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी शासकीय विश्रामगृह येथे बैठकीनंतर पत्रकार परिषद घेतली.

आम्ही व्यापारी उद्योजक असलो तरी बांगड्या घातलेल्या नाहीत. सिद्धेश्वर साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष धर्मराज कडादी यांच्या विरोधात फिर्याद देण्याचा विचार विनियम सुरु आहे. मात्र सोलापूरचे पोलिस अजूनही गप्प का आहेत, असे खडेबोल महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अॅग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सोलापूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत सुनावले. व्यापारी, उद्योजकांचा संयम पाहू नका असे त्यांनी पत्रकारांसमोर सांगितले. या प्रकरणी लवकरच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सोलापूर विमानसेवेला मुख्य अडथळा ठरणारी सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी पाडण्यात यावी यासाठी गेल्या वीस दिवसांपासून सोलापूर विकास मंचने चक्री उपोषण सुरू केले आहे. या उपोषणादरम्यान सिद्धेश्वर साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष धर्मराज कडादी यांची मंचाचे केतन शहा यांच्याशी वाद



आम्ही बांगड्या भरलेल्या नाहीत, पिस्तूल आम्हालाही चालवता येते

चेंबरचे प्रदेशाध्यक्ष ललित गांधी यांचा इशारा



लोकमत

व्यापाऱ्यांनी बांगड्या घातल्या नाहीत, सोलापूरचे, पोलिस अजूनही गप्प का?

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष म्हणाले, आम्ही फडणवीसांना भेटणार

धमकी ही ग्रामदैवतानेच दिलेली सद्‌बुद्धी

केकने तलवार कापल्याचे उदाहरण

झाला. यावेळी कडादी यांनी पिस्तूल दाखवत गोळी घालेन, अशी धमकी दिल्याने तणाव निर्माण झाला. या मुद्यावर बोलताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे राज्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी कडादी यांना आव्हान दिले आहे. त्यांनी सोलापुरात घेतलेल्या पत्रकार परिषदेत हे खडेबोल सुनावले.

'माझी इच्छा फक्त सोलापूरची विमानसेवा सुरू व्हावी अशी आहे' साखर कारखाना बंद व्हावा, अशी आमची बिलकुल इच्छा नाही, पण आमच्यावर कोणी दबाव किंवा, दडपण आणण्याचा प्रयत्न करत असेल तर आम्ही बांगड्या घातलेल्या नाहीत. मी ललित गांधी आहे. 'आरे म्हटले' की , कारे' म्हणून उत्तर देणारा मी गांधी आहे, असा हल्ला व्यापारी आणि उद्योजकांना धमकी देणाया काडादी यांच्या विरोधात चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी चढविला. धमकी देऊन धर्मराज कडादी यांनी मोठी घोडचूक केली आहे. सोलापुरात बंदूक दाखवून दडपशाही चालत नाही, हे त्यांनी लक्षात ठेवावं. पत्रकार परिषदेसाठी मिलिंद भोसले, नरसिंग मेंगजी, केतन शहा, ज्येष्ठ उद्योजक प्रेमरतन दमाणी आदी उपस्थित होते.

### चोवीस तासानंतरही गुन्हा दाखल नाही

सोलापूर विमानसेवेला सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी मुख्य अडथळा ठरत आहे. ही चिमणी पाडण्यात यावी यासाठी गेल्या वीस दिवसांपासून सोलापूर विकास मंचने चक्री उपोषण सुरू केले आहे. या उपोषण ठिकाणी येऊन कारखान्याचे माजी अध्यक्ष धर्मराज कडादी यांनी केतन शहा यांना धमकावून सांगत बघून घेण्याची भाषा वापरली. तसेच खिशामधून रिव्हॉल्व्हर काढून धमकी देण्याचा प्रयत्न केला.

### सुरक्षा प्रदान करावी : अध्यक्ष ललित गांधी

याचा व्हिडीओ सोशल मीडियावर वायरल झाला होता. पण याबाबतचा सदरबाजार पोलिस ठाण्यात कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल झाला नाही. तलवारीने केक कापला तरी पोलिस स्वतः हून गुन्हा दाखल करतात. मात्र या प्रकरणात ते गप्प का आहेत. आम्ही तक्रार देणे गरजेचे आहे का, पोलिसांनी स्वतः हून गुन्हा दाखल करावा व आम्हाला सुरक्षा प्रदान करावी, असेही त्यांनी सांगितले. काडादी यांच्या विरोधात फिर्याद दाखल करण्याचा विचार सुरु आहे, मात्र एखादा विषय माफीने सुटणार असल्यास आमची काही हरकत राहणार नसल्याचेही गांधी यांनी स्पष्ट केले.

### ग्रामदैवतानेच दिली सद्‌बुध्दी

सिद्धेश्वर हे सोलापूरचे ग्रामदैवत आहे. कदाचित ग्रामदैवताने त्यांना ही घोडचूक करण्याची संधी दिली. त्यांच्या हातून घडलेले पाप सोलापूरची विमानसेवा सुरु करण्यास कारण ठरेल. गुंडगिरी कशी मोडून काढायची, हे मला चांगलेच माहिती आहे. तसेच सोलापूरच्या विमानसेवेबाबत लवकरच दिल्ली येथे बैठक होत आहे. सोलापूर विकास मंचने सुरु केलेल्या आंदोलनाला आम्ही पाठिंबा दिला असल्याचे चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



# जळगाव जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र चेंबर पुढाकार घेणार : ललित गांधी

## चेंबर ऑफ कॉमर्सच्या बैठकीला जिल्ह्यातील उद्योजकांसह संस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**जळगाव - येथील रोटरी भवन येथे महाराष्ट्र चेंबरचे ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी व संस्थांची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ग्रीकल्चर ने राज्यातील उद्योजक, व्यापारी यांचे विविध प्रश्न सोडवण्याबरोबर अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात जोरदार पुढाकार घेतला आहे. जळगाव जिल्ह्यात उद्योग व व्यापार वाढावेत. पायाभूत सुविधांचा विकास व पर्यटनासह जिल्ह्याचा सर्वांगीण विकास व्हावा, ही जळगावकरांची इच्छा आहे. याच उद्देशाने जळगाव जिल्ह्यातील उद्योग, व्यापार वाढीसाठी चर्चा करण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.**

बैठकीला जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी, कृषी उद्योजक व संस्था यांची उपस्थिती लक्षणीय होती.

या प्रसंगी ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्याची माहिती देऊन डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट फोरम संकल्पना समजवण्यात आली. ८५० औद्योगिक संघटना या चेंबरशी संलग्न असल्याने तसेच चेंबरचे कार्य पाहून केंद्र सरकारने राज्यातील ३६ जिल्ह्याचे पायाभूत सुविधा व्यापार उद्योग पर्यटन या सर्व क्षेत्रातील विकासाच्या अपेक्षासह डेव्हलपमेंट प्लान बनवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्या अनुषंगाने जळगाव जिल्ह्याच्या नियोजनासाठी व्यापार, उद्योग, पर्यटन या सर्व क्षेत्रासह सामाजिक संस्थांच्या सहभागाने 'महाराष्ट्र चेंबर पुरस्कृत डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट फोरम' स्थापनेचा निर्णय घेण्यात आला.

जिल्ह्यातील दळण वळणाच्या साधनांची जसे रस्ते, रेल्वे व विमानसेवेच्या वाहतुकीसंबंधी देखील चर्चा करण्यात आली. राज्यातील निर्यात व्यापार सुलभ होण्यासाठी १० ड्राय पोर्ट मंजूर होण्यासाठी महाराष्ट्र चेंबरने विशेष पुढाकार घेतला आहे. सरकारच्या औद्योगिक क्षेत्रासाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती देऊन उद्योग क्षेत्रातील नवीन संधी यावर सविस्तर मार्गदर्शन उपस्थितांना केले. औद्योगिक क्षेत्रातील प्रमुख अडचण म्हणजे शासकीय धोरण, दुहेरी करपद्धती व यामधील तरतुदी



सुधारणा संबंधी चर्चा करण्यात आली. महिलांसह नवतरुणांनी व्यापार उद्योग सुरू करावा, यासाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' तर्फे आवश्यक ती मदत करण्यात येईल असे उपस्थितांना ललित गांधी यांनी आश्वासित केले. जळगाव जिल्ह्याला विकासाच्या महामार्गावर अग्रेसर करून दूरगामी सकारात्मक परिणाम करणारे धोरण निश्चितीसाठी लवकरच जळगाव जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी, कृषी उद्योजक, व्यापार, महिला उद्योजिका, औद्योगिक संघटनाची भव्य परिषद आयोजित करुन 'ब्रँड जळगांव' विकसित करण्याचे ध्येय असल्याचा मानस ललित गांधी यांनी बोलून दाखविला.

महिला उद्योजक समितीच्या अध्यक्षा संगीता पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, राज्यातील महिलांना आत्मनिर्भर बनवून उद्योग, व्यापार क्षेत्रात आणण्यासाठी चेंबरच्या माध्यमातून राज्य शासन व केंद्र सरकारच्या उद्योग विभागांच्या संयुक्त सहकार्याने 'महिला उद्योजकता अभियान' राबविण्यात येणार आहे. ज्या माध्यमातून विविध उपक्रम घेऊन महिलांच्या उद्योजकतेसह सर्वांगीण विकासाला चालना मिळेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या प्रसंगी गव्हर्निंग कौन्सिल मेंबर नितीन इंगळे, दिलीप गांधी यांच्यासह जिल्ह्यातील विविध व्यापारी उद्योग संघटनेचे प्रमुख व विविध मान्यवर उपस्थित होते.






# जळगावची विमानसेवा फेब्रुवारीपासून पूर्ववत करण्याचा प्रयत्न

## महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांची माहिती






**जळगाव :** स्टार एअरच्या माध्यमातून येत्या फेब्रुवारीपासून मुंबई, अहमदाबाद, इंदौर व पुणे यापैकी एका ठिकाणी विमानसेवा सुरु करण्याचा प्रयत्न करणार असून चार रेल्वेगाड्यांना जळगाव स्थानकावर थांबा मिळवा, या मागणीसाठी महाराष्ट्र चेंबर प्रयत्नशील असल्याची माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी जळगाव येथे पत्रकार परिषदेत दिली.

राज्यातील ३६ जिल्ह्यात उदयोग, व्यवसाय, शेतीपूरक व्यवसाय व शेत उत्पादनांची बाजारपेठ विस्तारावी आणि त्यांना व्यासपीठ मिळावे, यासाठी चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरच्या वतीने जिल्हा निहाय आढावा घेतला जात आहे. त्यानिमित्ताने चेंबरचे अध्यक्ष गांधी जळगाव दौऱ्यावर आले होते. जळगाव जिल्ह्यातील उद्योजक, व्यावसायिक, शेतकरी प्रतिनिधींची बैठक घेतली. तत्पूर्वी ते पत्रकारांशी बोलत होते. महिला उद्योजक समितीच्या अध्यक्षा संगीता पाटील, समितीचे सदस्य दिलीप गांधी, नितीन इंगळे आदी उपस्थित होते.

चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, जळगावच्या विमानतळावर नाइट लँडींगची सुविधा आहे. मात्र ही विमानसेवा बंद असल्याने औद्योगिक वसाहतीसह जिल्ह्यातील उद्योग व्यवसायासाठी अनेक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे जळगाव स्थानकावर पुण्याकडे जाणाऱ्या रेल्वेगाड्यांना थांबे द्यावेत आणि विमानसेवा तत्काळ सुरु करावी, यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

जळगाव विमानतळावरुन सेवा सुरु करण्यासंदर्भात केंद्रीय मंत्र्यासोबत गेल्या आठवड्यात बैठक झाली. जळगावच्या औद्योगिक विकासात बंद विमानसेवा मोठा अडसर ठरत असल्याची बाब या बैठकीत मांडण्यात आली. त्यानंतर स्टार एअर कंपनीकडून जळगावहून विमानसेवा सुरु करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती दिली. या कंपनीतर्फे बिझनेस क्लासची सेवाही उपलब्ध आहे. ८० जणांची आसनक्षमता असलेले कंपनीचे विमान आहे. मुंबई, अहमदाबाद, पुणे, इंदौर येथे ही विमानसेवा सुरु केली जाणार आहे. त्यासाठी कंपनीने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या संदर्भात विमानतळ विभागाचे संचालक व जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठकही झाली असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

### महिला व युवकांसाठी अभियान

महिला व युवकांना उद्योग व व्यावसायिक क्षेत्रात आणण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्री सातत्याने प्रयत्नशील आहे. त्यासाठी राज्यभरात महिला व उद्योजकता अभियान व उद्योगवृद्धी यात्रा अभियान राबविण्यात येणार आहे. तसेच राज्यात जिल्हानिहाय डेव्हलपमेंट फोरमचे कार्यालय स्थापन करुन उद्योग वाढीदरम्यान येणाया अडचणींचा आढावा घेतला जाणार आहे. हा एकत्रित आढावा केंद्र आणि राज्य सरकारकडे सादर केला जाणार आहे.

### पुण्याकडे जाण्यासाठी रेल्वेगाड्या

पुण्याकडे जाण्यासाठी जळगाव येथे थांबा असणार्या रेल्वेगाड्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे अन्य गाडयांनाही थांबा मिळावा, यासाठी चेंबर ऑफ कॉमर्सने पाठपुरावा करत आहे. त्यानुसार दुरांतो, गरीबरथ, दाणापूर-पुणे व हमसफर एक्स्प्रेस या रेल्वेगाड्यांना लवकरच जळगाव स्थानकावर थांबा मिळू शकेल.

### ई कॉमर्स कंपन्यामुळे ३० टक्के व्यवसाय बंद

ई कॉमर्स कंपन्यांनी चुकीच्या मार्गाने व्यवसाय सुरु ठेवला आहे. सुरुवातीला ग्राहकांना कमी दरात उत्पादने उपलब्ध करुन द्यायची आणि ग्राहकांना जोडून ठेवायचे, यासाठी, ई कॉमर्स कंपन्या चुकीचा मार्ग अवलंब करत असल्याचा आरोप अध्यक्ष ललित गांधी यांनी पत्रकार परिषदेत केला. ते म्हणाले, ई-कॉमर्स कंपन्यांनी कमावलेला नफा परदेशात जात असल्याची बाबही केंद्र सरकारच्या निदर्शनास आणून दिली आहे. पर्याय म्हणून विक्रेत्यांना, व्यावसायिकांना कार्ड देऊन डिजिटल पोर्टल उभारण्यात येत आहे. त्यातून हा घटक एकत्र येईल आणि स्पर्धेत यशस्वी ठरेल. यादृष्टीने कार्यवाही सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.



रेल भवन, दिल्ली येथे रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याशी चर्चा करताना म हाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी सोबत संदिप भंडारी व अन्य.

# रेल्वेसाठी लागणाऱ्या उत्पादनांत खाजगी उद्योगांचा सहभाग वाढविणार : रावसाहेब दानवे

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या मागणीला यश

**नवी दिल्ली : रेल्वे विभागासाठी लागणाऱ्या विविध उत्पादनांपैकी खाजगी उद्योगांसाठी अधिक उत्पादने खुली करू अशी ग्वाही रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची ललित गांधी यांना दिले. 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने नुकतीच नवी दिल्ली मधील रेल भवन येथे रेल्वेमंत्री रावसाहेब दानवे यांची भेट घेऊन रेल्वे विभागासाठी लागणारी अधिकाधिक उत्पादने खाजगी उद्योगांसाठी खुली करून देण्याची मागणी केली होती त्याप्रसंगी ते बोलत होते.**

रेल्वेसाठी लागणारे विविध सुटे भाग, उपकरणे उत्पादन करण्याची परवानगी खाजगी उद्योगांना दिल्यास मोठ्या प्रमाणावर उद्योग वाढण्यासाठी व रोजगार निर्मितीसाठी उपयोगी ठरेल अशी भुमिका ललित गांधी यांनी मांडली.

यावेळी रेल्वे माल वाहतुक प्रवासी वाहतुकीसंबंधी विविध मागण्याही सादर करण्यात करण्यात आल्या. त्यामध्ये प्रामुख्याने कोल्हापूर– वैभववाडी या कोकण रेल्वेस जोडणाऱ्या मार्गाचे काम तात्काळ सुरू करणे, कोल्हापूर– मुंबई सुपरफास्ट एक्सप्रेस सुरू करणे, कोल्हापूर – पुणे इंटरसिटी एक्सप्रेस सुरू करणे, कोल्हापूर– अहमदाबाद रेल्वे दररोज सुरू करून ती आबुरोड पर्यंत वाढविणे, कोरोना नंतर सेवा बंद केलेली सह्याद्री एक्सप्रेस पुर्ववत सुरू करणे, कोरोना काळानंतर महालक्ष्मी एक्सप्रेस चे बंद केलेले सर्व थांबे पुर्ववत सुरू करणे या मागण्यांचा प्रामुख्याने समावेश होता. तसेच १७ ते १९ नोव्हेंबर या कालावधीत लखनौ येथे संपन्न होणाऱ्या रेल्वे च्या डिझाईन व संशोधन केंद्रातर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय प्रदर्शनास सहभागी होण्याची महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या शिष्टमंडळाला निमंत्रण दिले. तसेच कोकण रेल्वे मार्गावरील कुडाळ मध्ये पार्सल सेवा सुरू करण्याची मागणीही करण्यात आली. यासर्व मागण्यांसाठी आवश्यक तो अहवाल तात्काळ तयार करण्याचे निर्देश रेल्वे राज्यमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.



# विदर्भ औद्योगिक विकासाचे धोरण ठरणार

## महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांची पत्रकार परिषदेत माहिती




**नागपूर :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अँण्ड अँग्रीकल्चर सह राज्य सरकारचा उद्योग विभागाच्या संयुक्त विद्यमाने विदर्भ विकास परिषद २१ डिसेंबर रोजी संपन्न होत आहे, ही माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अँण्ड अँग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी नागपूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. ही परिषद मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उदयोगमंत्री उदय सामंत या प्रमुख मान्यवरांसह सरकारच्या विविध विभागांचे सचिव, वरिष्ठ अधिकारी, विविध विषयातील मान्यवर, तज्ञ वित्तीय संस्थांचे प्रमुख यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, या परिषदेत औद्योगिक क्षेत्राचा आढावा घेतला जाणार आहे. महाराष्ट्र सरकारचा उद्योग विभाग, सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्योग (एम एसएमई), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि महाराष्ट्र सरकारचा औद्योगिक संचलनायाचे परिषदेसाठी सहकार्य आहे. नागपूर येथील सिव्हील लाईन्स, आमदार निवास समोरील वसंतराव देशपांडे सभागृहात सकाळी साडेनऊ वाजता परिषदेची सुरुवात होईल. दिवसभरात तीन सत्रात परिषद होत आहे. पत्रकार परिषदेला एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन हिंगणाचे अध्यक्ष कॅप्टन चंद्रमोहन रणधीर, फ ेडरेशन ऑफ इंडस्ट्री असोसिएशन विदर्भचे अध्यक्ष मधुसूदन रुंगठा, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष निकेश गुप्ता, चेंबरच्या युवा विंगचे चेअरमन संदीप भंडारी, चेंबरचे राज्य कार्यकारिणी सदस्य विनय आकुलवार, बुटीबोरी मॅन्युफॅक्चर्स असोसिएशनचे अध्यक्ष नितीन लोणकर, एमआयडीसी असोसिएसन ऑफ अमरावतीचे अध्यक्ष किरण पातुरकर, चेंबरचे सरकार्यवाह सागर नागरे, विनोद कलंत्री, प्रदीप माहेश्वरी आदी उपस्थित होते.

### या संस्था होणार सहभागी

या विदर्भ परिषदेच्या आयोजनामध्ये सहयोगी संस्था म्हणून विदर्भ इंडस्ट्री असोसिएशन, फेडरेशन ऑफ इंडस्ट्री असोसिएशन विदर्भ, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स, एमआयडीसी असोसिएशन अम रावती, नाग विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स, कॉन्फिडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स ,चेंबर ऑफ अमरावती महानगर यांच्यासह अकरा जिल्ह्यातील विविध व्यापारी औद्योगिक संघटना सहभागी होणार आहेत आहेत. परिषदेचे नागपूर, अमरावती, अकोला, चंद्रपूर, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, भंडारा, वाशिम, बुलढाणा, गडचिरोली जिल्ह्यातील सर्व व्यापारी, उद्योजक संघटना, पदाधिकारी आणि सदस्य सहनिमंत्रक आहेत.

### पाच महत्वाच्या विषयावर होणार चर्चा

दिवसभर होणार्या या विकास परिषदेत उद्योग, व्यापार, कृषी, ऊर्जा, इनोव्हेशन या पाच महत्वाच्या विषयावर चर्चा होणार असल्याचे चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले. या परिषदेत विदर्भाच्या विकासासाठी महत्वाची पाऊले, निर्णय आणि ठोस धोरण ठरविले जाणार आहे. विदर्भाच्या विकासासाठी विविध प्रकारचे उद्योग, व्यापार, कृषी विभागासाठी विविध योजना, ऊर्जा आणि नवनिर्मितीचे संकल्प परिषदेत मांडले जाणार आहेत. उद्योगासह अन्य विभागासाठी राज्य सरकारकडून विविध प्रकारच्या असलेल्या योजनांची माहिती परिषदेत दिली जाणार आहे. विदर्भातील ११ जिल्ह्यातून सुमारे दोन हजारांहून अधिक व्यापारी, उद्योजक या परिषदेत सहभागी होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# विदर्भ विकासासाठी चर्चासत्रात महत्वाची पाऊले, ठोस धोरण निश्चित
## विदर्भ विकास परिषदेत अनेक तज्ज्ञ, विश्लेषकांचे विचारमंथन







विदर्भ परिषदेत मार्गदर्शन करताना एमआयडीसी इंडस्ट्री असोसिएशनचे अध्यक्ष कॅप्टन चंद्रमोहन रणधीर, बीएसई, एसएमई, बीएसई लिमिटेडचे उपसरव्यवस्थापक आनंद चारी, महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील, बी. यू. भंडारी एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक कुशल शाह, प्रदीप माहेश्वरी.






विदर्भ परिषदेत मार्गदर्शन करताना एमआयडीसी असोसिएशन अमरावतीचे अध्यक्ष किरण पातुरकर, बुटीबोरी इंडस्ट्री असोसिएशनचे अध्यक्ष नितीन लोणकर, फेडरेशन ऑफ इंडस्ट्री असोसिएशन विदर्भचे अध्यक्ष मधुसुदन रुंगठा, डिफेन्स क्लस्टर ऑफ विदर्भचे अध्यक्ष दुष्यंत देशपांडे.






विदर्भ परिषदेत मार्गदर्शन करताना शासकीय समन्वयक समितीचे चेअरमन प्रदिप पेशकर, चेंबर चे पर्यटन समितीचे चेअरमन दत्तात्रय भालेराव, असोसिएशन कमिटीचे चेअरमन नामकर्ण आवारे, महाराष्ट्र इकॉनोमिक डेव्हलपमेंट काऊन्सिलचे अध्यक्ष रविंद्र बोराटकर

नागपूर : उद्योग, व्यापार, कृषी, ऊर्जा, इनोव्हेशन, पर्यटन या पाच महत्वाच्या विषयावर नागपूर येथील विदर्भ विकास परिषदेत चर्चा करण्यात आली. विदर्भाच्या विकासासाठी महत्वाची पाऊले, निर्णय आणि ठोस धोरण या परिषदेत ठरविण्यात आले. विदर्भाच्या विकासासाठी विविध प्रकारचे उद्योग, व्यापार, कृषी विभागासाठी विविध योजना, ऊर्जा आणि नवनिर्मितीचे संकल्प परिषदेत मंडण्यात आले. विदर्भातील ११ जिल्ह्यातून मोठ्या संख्येने व्यापारी, उद्योजक, कृषी उद्योजक, सेवा उद्योजक, नवउद्योजकांनी सहभागी झाले. विदर्भ विकास परिषदेमुळे विदर्भातील व्यापार, उद्योगाला निश्चितच चालना मिळणार असल्याची मतेही परिषदेत मांडण्यात आली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरसह

जळगांव : उद्योग, व्यापार, कृषी, ऊर्जा, इनोव्हेशन, पर्यटन या पाच महत्वाच्या विषयावर नागपूर येथील विदर्भ विकास परिषदेत चर्चा करण्यात आली. विदर्भाच्या विकासासाठी महत्वाची पाऊले, निर्णय आणि ठोस धोरण या परिषदेत ठरविण्यात आले. विदर्भाच्या विकासासाठी विविध प्रकारचे उद्योग, व्यापार, कृषी विभागासाठी विविध योजना, ऊर्जा आणि नवनिर्मितीचे संकल्प परिषदेत मंडण्यात आले. विदर्भातील ११ जिल्ह्यातून मोठ्या संख्येने व्यापारी, उद्योजक, कृषी उद्योजक, सेवा उद्योजक, नवउद्योजकांनी सहभागी झाले. विदर्भ विकास परिषदेमुळे विदर्भातील व्यापार, उद्योगाला निश्चितच चालना मिळणार असल्याची मतेही परिषदेत मांडण्यात आली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरसह

MiTEX
MAHARASHTRA INTERNATIONAL TRADE EXPO
17th to 26th February, 2023
MAHARASHTRA'S LARGEST TRADE FAIR
FARM & AGRO
आपल्या व्यापार-उद्योगाच्या वाढीसाठी अवश्य सहभागी व्हा!
ORGANISED BY : MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY AND AGRICULTURE
REGISTER NOW

११ जिल्ह्यातील औद्योगिक संघटना या परिषदेचे आयोजक होते. फेडरेशन ऑफ इंडस्ट्री विदर्भचे अध्यक्ष मधुसुदन रुंगटा, बुटीबोरी असोसिएशनचे अध्यक्ष नितीन लोणकर, एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन हिंगणाचे अध्यक्ष कॅप्टन चंद्रमोहन रणधीर हे सहआयोजक होते.

उद्योग व व्यापारासह युवक व महिला उद्योजकांसाठी केंद्र व राज्य सरकारकडून विविध प्रकारच्या असलेल्या योजनांची माहिती परिषदेत देण्यात आली. विदर्भातील व्यापारी व लघु उद्योजकांचे प्रश्न अमरावती चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष विनोद कलंत्री, विदर्भ चेंबर ऑफ कॉम र्सचे अध्यक्ष निकेश गुप्ता आणि लघुउद्योग भारती केंद्राचे श्रीकांत धोत्रीकर यांनी मांडले. 'विदर्भातील पर्यटनाच्या विविध संधी' या विषयावर पर्यटन समि तीचे व चेअरमन दत्तात्रय भालेराव यांनी माहिती दिली. चेंबरच्या युवा विंगचे चेअरमन संदीप भंडारी यांनी 'युवकांसाठी उद्योजकता व स्वयंरोजगाराच्या विविध संधी' या विषयावर मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील यांनी 'महिला उद्योजकता विविध योजना व संधी' यांची माहिती दिली. 'कृषी प्रक्रिया उद्योगातील संधी' या विषयावर बुलढाणा अर्बन को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे चेअरमन राधेश्याम चांडक यांनी व महाराष्ट्र चेंबरच्या ॲग्रीकल्चर कमिटीचे चेअरमन मयांक गुप्ता यांनी सविस्तर माहिती दिली. इकॉनॉमिक डेव्हलपमेंट काऊन्सिलचे उपाध्यक्ष प्रदीप माहेश्वरी यांनी मार्गदर्शन केले. डिफेन्स क्लस्टर ऑफ विदर्भचे अध्यक्ष दुष्यंत देशपांडे यांनी 'संरक्षण क्षेत्रातील उद्योगांच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन केले. विदर्भातील उद्योगांना भेडसावणारे प्रश्न यासंदर्भात महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, एमआयडीसी असोसिएशन अमरावतीचे अध्यक्ष किरण पातुरकर व महाराष्ट्र इकॉनोमिक डेव्हलपमेंट काऊन्सिलचे अध्यक्ष रविंद्र बोराटकर यांनी चर्चा केली. बी. यू. भंडारी एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक कुशल शहा यांनी 'सोलर पॉवर सोल्युशन्स' या विषयावर मार्गदर्शन केले. या मान्यवरांच्यासह वरिष्ठ शासकीय अधिकारी, तज्ज्ञ, वित्तीय संस्थांचे प्रमुख यांनी मार्गदर्शन केले. बीएसई, एमएसई, एक्सचेंज बीएसई लिमिटेडचे उपमहाव्यवस्थापक आनंद चारी यांनी म ार्गदर्शन केले. परिषदेत काही विषयावर उपस्थितांनी प्रश्ने विचारली. उपस्थितांकडून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तज्ज्ञांकडून देण्यात आली.


**धनंजय बेळे**
अध्यक्ष


**आशिष नहार**
उपाध्यक्ष



**राजेंद्र आहिरे**
सरचिटणीस


**राजेंद्र बडनेरे**
अध्यक्ष-निमा हाउस


**संजय सोनवणे**
विश्वस्त


**मिलिंद रजपूत**
विश्वस्त


**रविंद्र झोपे**
विश्वस्त


**मनिष रावल**
विश्वस्त


**सुधीर बडगुजर**
विश्वस्त


**श्रीधर व्यवहारे**
विश्वस्त

## नाशिक इंडस्ट्रीज ॲण्ड मॅन्यु. असो (निमा) च्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे अभिनंदन

नाशिक इंडस्ट्रीज ॲण्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या विश्वस्तपदी धर्मादाय आयुक्तांनी महाराष्ट्र चेंबरचे सदस्य संजय सोनवणे, आशिष नहार, राजेंद्र वडनेरे, धनंजय बेळे, रविंद्र झोपे, मिलिंद राजपूत, श्री. श्रीधर व्यवहारे, मनिष रावल, सुधीर बडगुजर यांची निवड केली. विश्वस्त मंडळाच्या झालेल्या सभेत अध्यक्षपदी धनंजय बेळे, उपाध्यक्ष आशिष नहार व सरचिटणीसपदी राजेंद्र आहिरे, निमा हाऊस समितीच्या अध्यक्षपदी राजेंद्र वडनेरे यांची निवड करण्यात आली.

# उद्योग, व्यापार जगताची राष्ट्रीय शिखर संस्था 'फिक्की'च्या संचालक मंडळ निवडणुकीत सलग तिसऱ्यांदा ललित गांधी विजयी




नवी दिल्ली : देशातील उद्योग, व्यापार व आर्थिक जगताची सर्वोच्च शिखर संस्था म्हणून काम करत असलेल्या व 'फिक्की' या नावाने ओळखले जात असलेल्या नवी दिल्लीच्या 'फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रीज'च्या कार्यकारी समिती संचालकपदाच्या निवडणुकीत ललित गांधी सलग तिसऱ्यांदा विजयी झाले. या निवडणुकीत ललित गांधी विक्रमी मतांनी निवडून आले. निवडीचा कालावधी तीन वर्षासाठीचा आहे. फिक्कीचे महासंचालक अरुण चावला यांनी त्यांना नुकतेच निवडून आल्याचे प्रमाणपत्र दिले.

दिल्ली येथे फिक्कीच्या ९५ व्या वार्षिक सभेप्रसंगी ही निवडणूक संपन्न झाली. या निवडणुकीत गांधी यांनी सलग तिसऱ्यांदा निवडून येऊन बाजी मारली. यावेळी झालेल्या निवडणुकीत या गटात उर्वरित महाराष्ट्रातून निवडून आलेले ते एकमेव प्रतिनिधी आहेत.

देशातील विविध उद्योग व व्यापारी घटकांची राष्ट्रीय शिखर संस्था असलेल्या 'फिक्की' च्या औद्योगिक संस्था गटातून झालेल्या निवडणूकीत ललित गांधी यांनी हा विजय प्राप्त केला. यापूर्वी दोन वेळा संचालक म्हणून काम करताना अचूक माहिती उद्योग जगताला देत सरकार बरोबर योग्य तो समन्वय करण्याचं महत्वाचं काम केले आहे. देशाच्या अर्थविषयक आणि उद्योग विषयक धोरण ठरविण्यात प्रमुख भूमिका बजाविणाऱ्या 'फिक्की'च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासासाठी विशेष पुढाकार घेतला जाईल, महाराष्ट्रातील छोट्या व मध्यम उद्योगांना सुद्धा अधिक बळ देण्यासाठी या संस्थेच्या माध्यमातून काम करू असेही त्यांनी सांगितले.

# हार्दिक अभिनंदन!



महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारीणी सदस्य, वस्त्रोद्योग समितीचे चेअरमन व आम. प्रकाश आवाडे यांची राष्ट्रीय साखर संघाच्या संचालकपदी फेरनिवड झाल्याबद्दल महाराष्ट्र चेंबरतर्फे हार्दिक अभिनंदन!



महाराष्ट्र चेंबरच्या च्या महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील यांची कॅट च्या महिला विभागाच्या 'राष्ट्रीय संयोजिका' पदी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र चेंबरतर्फे हार्दिक अभिनंदन !



महाराष्ट्र चेंबरच्या इंटरनॅशनल रिलेशन समितीचे को-चेअरमन श्री. चेतन नरके यांची युथ को-ऑप बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र चेंबरतर्फे हार्दिक अभिनंदन !



महाराष्ट्र चेंबरचे सदस्य श्री. मनिष कोठारी यांची नाशिक इंजिनिअरींग क्लस्टरच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र चेंबरतर्फे हार्दिक अभिनंदन !

# महाराष्ट्रातील युवक व महिलांना उद्योजकता प्रोत्साहनासाठी महाराष्ट्र चेंबर व एमएसएमई मंत्रालय संयुक्त अभियान राबवणार

## केंद्रीय मंत्री नारायण राणे यांची मान्यता





**केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना उद्योजक प्रोत्साहन अभियानाची अभियानाचे प्रस्ताव सादर करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, संदीप भंडारी व अन्य मान्यवर.**

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील युवकांना व महिलांना उद्योजकतेसाठी प्रेरित करून त्यांना आत्मनिर्भर करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज व केंद्र सरकारच्या एम.एस.एम.ई मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण महाराष्ट्रात अभियान राबविण्यासाठी एम.एस.एम.ई खात्याचे केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी मान्यता दिली असल्याची माहिती महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी शिष्टमंडळासह नवी दिल्ली येथे केंद्रीय मंत्री नारायण राणे यांची भेट घेऊन यासंबंधीची संकल्पना मांडून प्रस्ताव सादर केले होते. त्यानुसार हे अभियान महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, एम.एस.एम.ई मंत्रालय भारत सरकार व उद्योग विभाग महाराष्ट्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार असल्याची माहिती ललित गांधी यांनी दिली. महाराष्ट्र चेंबरचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांच्या २३ नोव्हेंबर च्या जयंती दिनापासून या अभियानास सुरुवात होईल व राज्यातील ३६ जिल्ह्यातील ७५ ठिकाणी या अभियानांतर्गत कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून व्यापार उद्योगातील नवीन संधी, त्यासाठी असलेल्या सरकारच्या योजना, अर्थ पुरवठ्यासाठीच्या उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या योजना, केंद्र व राज्य सरकारच्या अनुदानाच्या योजना व्यापार, उद्योगासाठी लागणारे प्रशिक्षण यासंबंधीची माहिती या अभियानाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. तसेच या अभियानांतर्गत उद्योग आधार योजनेखाली राज्यातील व्यापारी, उद्योगांची नोंदणी करण्याची मोहीमही हाती घेण्यात येणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून किमान ५००० युवक व ५००० महिला नवीन व्यापार उद्योग सुरू करतील अशा प्रकारचे हे आयोजन केले असल्याची माहिती देऊन ललित गांधी पुढे म्हणाले की या अभियानामुळे राज्याच्या सर्व जिल्ह्यातील तरुण व महिलांना व्यापार उद्योगासाठी प्रेरणा मिळणार आहे. महाराष्ट्र चेंबरच्या महिला समितीच्या अध्यक्ष संगीता पाटील, युथ विंगचे चेअरमन संदीप भंडारी एम. एस. एम. ई कमिटीचे चेअरमन आशिष नहार व अन्य पदाधिकारी या अभियानाच्या यशस्वीतेसाठी कार्यरत असून, २३ नोव्हेंबर ते १५ मार्च या कालावधीत राज्यभरातील ५०००० युवक व महिलांच्या पर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवल्याची माहिती ही ललित गांधी यांनी यावेळी दिली.यावेळी भेटलेल्या शिष्टमंडळात संदीप भंडारी, महाराष्ट्र चेंबर चे दिल्ली प्रतिनिधी जे.के. जैन यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

MiTEX
MAHARASHTRA INTERNATIONAL TRADE EXPO
17th to 26th February, 2023
Bandra Kurla Complex, Mumbai
MAHARASHTRA'S LARGEST TRADE FAIR
TRAVEL AND TOURISM
आपल्या व्यापार-उद्योगाच्या वाढीसाठी अवश्य सहभागी व्हा!
ORGANISED BY : MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY AND AGRICULTURE
REGISTER NOW



# अँल्युमिनियम फाउंड्रीमध्ये लागणाऱ्या मेटलिंग आणि व्होल्डींग फर्नेसमध्ये वीज बचतीचे नवे संशोधन

## कोल्हापूरच्या प्रकाश मालाडकर यांना केंद्रीय विद्युत मंत्रालयाचा ‘राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण पुरस्कार’



**प्रकाश मालाडकर**
**गव्हर्निंग काउन्सील मेंबर,**
MACCIA

## उत्पादनाने घेतली सातासमुद्रापार भरारी, कोल्हापूरचे नाव पुन्हा जागतिक नकाशावर

कोल्हापूर : केंद्र सरकारचा राष्ट्रीय ऊर्जा कार्यक्षमता इनोव्हेशन अवॉर्डस् अंतर्गत ‘ऊर्जा कार्यक्षम अँल्युमिनियम मेटलिंग अँण्ड होल्डींग फर्नेस श्रेणीमध्ये देशपातळीवरील ‘राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण पुरस्कार’ कोल्हापूरच्या प्रकाश मालाडकर यांना मिळाला आहे. त्यांनी शून्य टक्के कार्बन उत्सर्जित करणारा ‘अँल्युमिनीयम होल्डींग फर्नेस अल थर्मोस’ या उत्पादनाची निर्मिती केली आहे. दुचाकी, चारचाकी वाहनांना लागणार्या सुटे पार्टच्या उत्पादनासाठी लागणाया अँल्युमिनीयम होल्डींग फर्नेस अल थर्मोस फर्नेस मध्ये वीजेची मोठी बचत या संशोधनामुळे होणार आहे. वीज बचत, तोटा/नुकसान विरहित उत्पादन आणि उत्पादनाची क्षमता वाढ असा तिहेरी फायदा या उद्योगांना होणार आहे.

नवी दिल्ली येथे नुकतेच महामहीम राष्ट्रपती द्रौपद्री मूर्म यांच्या प्रमुख उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण झाले. त्यांच्या संशोधनाचा उद्योग, व्यापार क्षेत्राला मोठा फायदा होणार असून वीजेची सुमारे ८० टक्के बचत होणार आहे. देशात या श्रेणीत पुरस्कार मिळालेले श्री मालाडकर हे देशातील एकमेव उद्योजक आहेत. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रीजचे ते कार्यकारिणी सदस्य आहेत. कोल्हापुरातील गोकुळशिरगाव एमआयडीसीमध्ये ‘आफेको हिटिंग सिस्टीम’च्या युनिटचे ते कार्यकारी संचालक आहेत. त्यांच्या या नव्या संशोधनाने कोल्हापूरचे नाव पुन्हा एकदा जागतिक नकाशावर आले आहे. राष्ट्रीय उर्जा संरक्षण दिवसानिमित्त १४ डिसेंबर रोजी नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात या पुरस्कारचे वितरण करण्यात आले. विद्युत मंत्रालयाचे सचिव आलोक कुमार, केंद्रीय विद्युत आणि ऊर्जा मंत्री आर. के. सिंह, उद्योग राज्यमंत्री कृष्ण पाल या मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

**अल थर्मोस फर्नेस उत्पादन**

इलेक्ट्रिक फर्नेसमध्ये सॅण्ड कोअर मोल्ड, ड्राईंग आणि हिट ट्रिटमेंट प्लॅट, रोबोटिक ऑटोमेशन आदी यशस्वी प्रयोग झाल्यानंतर नवे संशोधन करण्याची जिद्द मालाडकरांनी घेतली. अल थर्मोस हे उत्पादन तयार करण्यासाठी काही पार्ट जर्मनीतून आणले. हे उत्पादन तयार झाल्यानंतर केंद्रीय समितीने त्यांच्या संशोधनाची तीन महिने पाहणी करुन केली. विविध प्रकारे या संशोधनाची तपासणी, लेखापरीक्षण करुनच समितीने वीज बचत होत असल्यावर शिक्कामोर्तब केले. या संशोधनामुळे घराण्याचा औद्योगिक वारसा नसलेल्या मालाडकरांनी उद्योग क्षेत्रात आपल्या कर्तृत्वावर यशाची मोठी झेप सातासमुद्रापार घेतली आहे. दुचाकी, चारचाकी वाहनांचे सुटे पार्ट तयार करताना तापमान स्थिर







ठेवण्यात या उत्पादनाचा मोठा फायदा होणार आहे. अ‍ॅल्युमिनियम फाउंड्रीमध्ये एक टन मोल्टेन मेटल होल्डींग उत्पादन तयार करण्यासाठी फक्त ९ युनिट पर तास वीज लागते. तसेच उत्पादन मेल्ट तयार करण्यासाठी सुमारे फक्त ४०० केव्ही/टन वीज लागते.

नव्या संशोधनामुळे हेच उत्पादन तयार समान तापमानात व्होल्ड करण्यासाठी १००० केजीसाठी साठी केवळ ९ किलोवॅट पर तास वीज लागणार आहे. अल थर्मसमुळे सुमारे ८० टक्के वीजेची बचत होणार आहे. स्थानिक उद्योगात मेनन पिस्टन, सुवर्णा अलॉय, व्हर्सेटाइल, बेसपास, अलकोपसह, टिव्हीएस ग्रुप, सुंदरम क्लायटन (चेन्नई) मिंडा ग्रुप (दिल्ली), इंडूरन्स (पुणे), कोसाई मिंडा,(चेन्नई), टाटा मोटर्ससह परदेशातील मारुती सुझुकी, होंडा, यामाहा, हिरो मोटारसायकल, टिव्हीएस, सुंदरम यासह देश आणि परदेशातील मोठ्या कंपन्याना या नव्या संशोधनाचा फायदा होणार आहे.

**उद्योजकांना मोठा फायदा**

ऑईलचे वाढते दर, वीजेचे वाढते दर, त्यासाठी होणारी आंदोलन, उद्योगातील अस्थितरतेचा प्रश्न उद्योजकांना भेडसावत आहे. त्यासाठी काहीतरी करण्याची जिद्द प्रकाश मालाडकर यांनी ठेवली होती. दोन्ही मुलांसाठी परदेशात चांगल्या पॅकेजची नोकरी मिळाली होती. मात्र दोन्ही मुलांनी भारतातच सेवा बजावावी, अशी त्यांची अपेक्षा होती. त्यानुसार या संशोधनात बी. ई. मॅकेनिकल इंजिनिअर असलेली त्यांची कन्या शिवरंजनी आणि मॅकेनिकल इंजिनीअर मुलगा नितीकेश तसेच कंपनीतील, कार्यालयीन कर्मचारी आणि सर्व कारागीर यांनी फार मोलाची भूमिका बजाविली. दरम्यान या पुरस्कारामुळे मालाडकर यांना त्यांच्या प्रत्येक उत्पादनावर 'ब्युरो ऑफ एनर्जी इफिशियन्सी' असा लोगो वापरता येणार आहे.



**संघर्षमय जीवनप्रवास**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन उद्योगपती झालेले प्रकाश मालाडकर यांचा संघर्षमय जीवनप्रवास आहे. त्याचे मूळ गाव सांगली जिल्ह्यातील जत आहे. गावातील प्राथमिक शाळेतच त्याच्या शिक्षणाचा श्रीगणेशा सुरु झाला. आईचे छत्र लहानपणीच हरविले. वडील वायरमन होते. त्यामुळे घरची सर्व जबाबदारी त्यांच्यावर पडली. चांगले शिक्षण घेऊन चांगली नोकरी मिळविण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु झाले. सांगली येथील वालचंद कॉलेजमधून मॅकेनिकल इंजिनीअरिंगची पदवी घेतली. त्यानंतर १९८८ मध्ये त्यांना स्वीडन येथे स्वीडिश कंपनी येथे ट्रेनिंग आणि नोकरीची संधी मिळाली. स्वीडीश कंपनीत १९८८ ते १९९१ या कालावधीत डिझाइन इंजिनीअर म्हणून काम केले. त्यानंतर १९९२ मध्ये त्यांचे मित्र गिरीष भीमराव पाटील यांनी कोल्हापुरातच छोटे युनिट सुरु करण्याचा संकल्प केला. त्यानुसार कोल्हापुरातील गोकुळशिरगाव एमआयडीसीमध्ये सन १९९२ मध्ये त्यांनी या उत्पादन निर्मितीचे छोटे युनिट भागीदारीमध्ये सुरु केले. वेगवेगळ्या प्रकारच्या फाऊंड्रीसाठी लागणार्या फर्नेस (भट्टी) तयार होऊ लागल्या. त्या काळात कोल्हापुरात लाकूड आणि कोळशावर वाळूचा मोल्ड भाजला जात होता. त्या वेळी मालाडकर आणि गिरीश पाटील यांच्या कंपनीने इलेक्ट्रिकवर वाळूचा मोल्ड भाजण्याचा नवा प्रयोग केला. आणि या प्रयोगाला उद्योग क्षेत्राने मोठ्या प्रमाणात स्वीकार केला. लाकूड आणि कोळशामुळे होणारे वायू प्रदुषणही मोठ्या प्रमाणात थांबले. तसेच अ‍ॅल्युमिनीयम वितळविणे, होल्डींगचे कामासाठी अफेको मेकच्या इलेक्ट्रिक फर्नेसचा वापर मोठया प्रमाणात सुरु झाला.

**आज अखेर मिळालेले पुरस्कार**

२००७ : जत पत्रकार संघाचा जतभूषण पुरस्कार

२०२१ : UNIDO पुरस्कार : व्हिएन्ना (ऑस्ट्रिया)– युनायटेड नेशन इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन – यूएसए पुरस्कार.

सप्टेंबर २०२२ : सीआयआय कॉनफेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज अवॉर्ड, नवी दिल्ली.

जानेवारी २०२३ : मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँण्ड, अ‍ॅग्रीकल्चर पुणे, जी. एस. पारखे संशोधन उद्योजकता पुरस्कार

# ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स’ ने उद्योग व शिक्षण क्षेत्रात समन्वयासाठी पुढाकार घ्यावा : राज्यपाल भगतसिंह कोश्यारी





**राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याशी राजभवन येथे चर्चा करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी सोबत संदिप भंडारी**

**मुंबई** : राज्याच्या व्यापार, उद्योग क्षेत्राची शिखर संस्था या नात्याने ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इंडस्ट्रीज’ ने उद्योग जगत व शिक्षण क्षेत्रामध्ये समन्वय करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

नवीन शिक्षण धोरणात अभ्यासक्रमामध्ये उद्योग – व्यापारास आवश्यक गोष्टींचा अंतर्भाव करणे अभिप्रेत आहे. यासंदर्भात व्यापार-उद्योग क्षेत्राच्या अपेक्षा व भुमिका जाणुन घेण्यासाठी राज्यपाल महोदयांनी ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर’ चे अध्यक्ष ललित गांधी यांना चर्चेसाठी राजभवन, मुंबई येथे आमंत्रित केले होते. यावेळी झालेल्या चर्चेप्रसंगी ते बोलत होते. प्रचलित अभ्यासक्रमानुसार पदवीधर होणाऱ्या युवकांना प्रत्यक्षात उद्योगासाठी आवश्यक ज्ञान योग्य पध्दतीने मिळत नसल्याचे सांगुन ललित गांधी यांनी उद्योग पुरक अभ्यासक्रम रचना करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. तसेच राज्यपाल महोदयांनी सुचविल्यानुसार महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स राज्यातील सर्व विद्यापीठे, अभियांत्रिकी व वाणिज्य महाविद्यालय यांच्याशी समन्वय करून उद्योगपुरक शिक्षण मिळेल यासाठी सहकार्य करू व यासाठी विशेष अभियान राबवू अशी ग्वाही ललित गांधी यांनी दिली.

# औद्योगिक व्यापार वृद्धीसाठी विमान सेवा आवश्यकच : ललित गांधी

## सोलापूर चेंबर तर्फे ललित गांधी यांचा सत्कार

व्यापार उद्योगाच्या प्रगतीसाठी शासनाकडून व्यापाऱ्यांना सहकार्य मिळावे यासाठी आपण नेहमीच सहकार्य करू आगामी काळात व्यापार उद्योगातील जलद बदलांचा अचूक वेध घेऊन सर्वांनी भविष्याच्या सुरक्षेसाठी स्वत:ला बदलायला हवे असे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी स्पष्ट केले. औद्योगिक विकासासाठी विमानसेवा सुरू व्हायलाच हवी अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अ‍ॅण्ड अ‍ॅग्रिकल्चरतर्फे ललित गांधी यांच्या उपस्थितीत हॉटेल प्रथम येथे बैठक संपन्न झाली. यावेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व स्वप्निल शहा यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सोलापूर चेंबरचे अध्यक्ष राजू राठी, उपाध्यक्ष किशोर चांडक, सचिव धवल शहा, पशुपती माशाळ, खजिनदार निलेश पटेल, संचालक गोविंद भैया, कापड व्यापारी संघाचे अध्यक्ष शांतीकुमार दोशी, सोलापूर कंज्यूमर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्यूटर असोसिएशनचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, इलेक्ट्रिक डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष शैलेश बचुवार, भुसार अडत व्यापारी संघाचे अध्यक्ष सुरेश चिकळ्ळी, महेश सिंदगी, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष तिलोकचंद कासवा, यंत्रमागधारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, मल्लिकार्जुन कमटम, अंबादास बिंगी, सिमेंट डिलर्स असोसिएशनचे सुकुमार चंकेश्वरा, मधला मारुती फायर वर्क्स असोसिएशनचे प्रकाश मलजी, रेडिमेट असोसिएशनचे प्रकाश पवार, दयासागर सालुटगी, राकेश पटेल, विजय जोशी, दीपक लड्डा, माणिक गोयल, मल्लिनाथ कटप, रेवनसिद्ध चडचणकर, सुनील मेंगजी, शैलेंद्र गणाते, कौस्तुभ करवा, इंदरमल होतवाणी आदी उपस्थित होते.




**महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार करतांना सोलापूर चेंबरचे अध्यक्ष राजु राठी समवेत मान्यवर.**




# फूड सेफ्टी कायद्यांतर्गत परवाना नूतनीकरण आता सोपे व सुटसुटीत

## Ease of Doing Business: Instant Renewal of License/ Registration-reg.

FSSAI Licenses and Registrations were granted for 1-5 years based on the selection and payment made by the Food Business Operators (FBOS) in the application, as prescribed under the FSS (Licensing and Registration of Food Businesses) Regulations, 2011. Thereafter, FBOs were required to renew their License/ Registration by submitting the application, along with necessary documents as per the FSSAI order dated 19th March 2021, which was then required to be scrutinized by the concerned Licensing and Registering Authority for granting renewed License/ Registration. This scrutiny required additional time and effort, which was increasing with time as the number of licensed/registered FBOs in their jurisdiction is increasing.

2. In view of the above and to further streamline the process of licensing/ registration and its renewal, Food Authority has decided the following:

a. Henceforth, all the renewal of license/ registration upon submission of the application by the FBO will be granted instantly, without requiring the scrutiny/approval of the concerned authority, subject to the following conditions: i. No change in the existing details of the license/ registration shall be allowed

Food Safety and Standards Authority of India

**ii. Validity of the Renewal:**

- **For License :** This renewal of the license shall be for 1 year only
- **For Registration:** Renewal shall continue as per existing provision i.e. for 1-5 years,

based on the selection and payment made by the FBO in the application.

iii. FBOs whose licenses/ registrations have been suspended/canceled, shall not be allowed to renew their license/registration. iv. Further, w.e.f 10th November 2022, the FOSCOS system ensures that FBO

(Manufacturers and Importers) shall file annual returns with penalties (if any), before renewal, for FY 2021-22 onwards.

v. A declaration to be submitted by Food Business Operator (tick in the checkbox) has been added in FOSCOS as follows:

- I/We have complied with all the permissions/rules, which are applicable to my

food business and the premises of the food business such as CGWA NOC etc. I/We do not possess more than one active license/ registration for any other

food business(es) at the same premises.

b. Validity of the New License and Registration:

**i. For License:** The validity of the new license is now restricted to only 1 year instead of the existing provision i.e. "Clause 2.1.7 of the FSS (Licensing and Registration of Food Businesses) Regulation, states that Registration or license granted shall be valid for a period of 1-5 years, as chosen by FBO, from the date of issue of the registration/license".

**ii. For Registration:** validity will be continued as per existing provision i.e. for 1-5 years, based on the selection and payment made by the FBO

c. Now as the grant of renewal of license and registration is instant and without the scrutiny of licensing and registration authority, there shall be no late fee of Rs. 100 per day levied [earlier



applicable in case of license as per Clause 2.1.7 of the FSS (Licensing and Registration of Food Businesses) Regulation] if the renewal application for the license is filed in the last 30 days prior to expiry. However, the penalties levied for applying renewal of expired license/ registration upto 180 days after the date of expiry shall continue. [FSSAI order number 15(31)2020/ FOSCOS/RCD/FSSAIpt.4 dated 29th October 2021].

3. As the window for renewal of license and registration is available as early as 180 days prior to expiry date, FBOs are advised to apply for renewals as early as possible without waiting for the expiry date to avoid last minute rush and to avoid the eventual penalty (due to expiry) in case of unavoidable online/portal related gliches on the day of expiry.

4. Declaration regarding the FSMS plan has also been automated in FOSCOS and now FBOs are required to self-declare the compliance regarding the points in the inspection checklist at the time of the renewal.

5. This order shall be applicable on the applications submitted on or after 12/01/2023.

**(Inoshi Sharma)**

Executive Director (CS)

Email: ed-office@fssai.gov.ins

# INCREDIBLE INDIA

## *Defining Upward Arrow in Tourism*



**Santosh Tawade**
Chairman
Tourism Committee, MACCIA
santoshgovindtawade@gmail.com
7620017957

Incredible India - Those are the only words that come to my mind when I think of India. The myriad landscapes, the great heritage, the diverse culture, and the varied flora and fauna, so much to offer in each aspect, makes our country truly incredible. That is why the Government of India launched the "Incredible India" Campaign, for the tourists and the people to experience this unseen, unexplored, uncharted, mesmerising, appealing beauty of our country. The campaign launched in 2002, had managed to attract plenty of foreign and domestic tourists to explore and experience this beauty. Their video commercials left everyone so amazed and awestruck that people were tempted to visit the destinations straight away.

The campaign had tremendous success over the years and it continues to thrive. This was evident in the increasing number of tourists visiting India. The publicity, marketing and advertising of such campaigns in the country and the foreign regions, subconsciously improved the image of India as an upcoming Tourist Destination, alongside the efforts and measures taken by the government.

Foreign Tourists and domestic tourists, were at an all- time high in the Year 2019, making it the most important year marked in the Indian tourism industry. As the Years before the birth of Jesus are known as B.C. (Before Christ) and the years thereafter are known as A.D. (Anno Domini), Similarly, these numbers, which are a benchmark for the Indian Tourism Industry, and would be known as the numbers in the era Before Covid (B.C.) and After Covid (A.C.).

We all know that the fight against covid is almost over, but rather than talking about the negatives of covid and the cruel impact that it had on the tourism and hospitality industry, in this article let's talk about the numbers of our tourism industry before covid and in the coming articles we will discuss the support that Tourism and Hospitality Industry got from the Government of India and Maharashtra.

The Tourism sector contributes immensely to the GDP of the Country. According to the WTTC (World Travel and Tourism Council), India ranked 10th among the 185 Countries in terms of Travel and Tourism's total contribution to GDP in 2019. During 2019, the contribution of Travel & Tourism to GDP was 6.8% of the total economy, about Rs. 13,68,100 Cr (US$ 194.30 billion). The sector's direct contribution to GDP is expected to grow by 7.1% per annum from 2018-2028. In FY20, the tourism sector also accounted for 3.90Cr Jobs, which was 8.0% of the total employment of the country. This number is expected to reach 5.3Cr by 2025.

Foreign tourists' arrival in the country is one of the major sources of Foreign Exchange Earnings for the country. The Foreign Exchange Earnings in the year 2019 were Rs. 2,11,661 Crore. Foreign Exchange earnings have been growing consistently over the last 5 years and in the coming years, it could prove to be one of the significant sources of Income for the country.

**Let's look at the number of Foreign Tourists arrivals in the country for the last 5 Years before Covid**

| | | |
|---|---|---|
| **2019** | **-** | **1.791 Cr** |
| **2018** | **-** | **1.742 Cr** |
| **2017** | **-** | **1.681 Cr** |
| **2016** | **-** | **1.503 Cr** |
| **2015** | **-** | **1.376 Cr** |

| State | 2015 | 2016 | 2017 | 2018 | 2019 |
|---|---|---|---|---|---|
| **Uttar Pradesh** | 20.48 Cr (14.3%) | 21.17 Cr (13.1%) | 23.29 Cr (14%) | 28.5 Cr (15.4%) | 53.5 Cr (23.1%) |
| **Tamil Nadu** | 33.34 Cr (23.2%) | 34.38 Cr (21.3%) | 34.50 Cr (20.8) | 38.5 Cr (20.8%) | 49.4 Cr (21.3%) |
| **Andhra Pradesh** | 12.15 Cr (8.4%) | 15.31 Cr (9.4%) | 16.54 Cr (9.9%) | 19.4 Cr (11.6%) | 23.7 Cr (10.2%) |
| **Karnataka** | 11.98 Cr (8.3%) | 12.97 Cr (8.0%) | 17.99 Cr (10.8%) | 21.4 Cr (10.5%) | 22.7Cr (9.8%) |
| **Maharashtra** | 10.34 Cr (7.22%) | 11.65 Cr (7.22%) | 11.99 Cr (7.2%) | 11.9 Cr (6.4%) | 14.9Cr (6.4%) |
| **Total Tourists** | 143.19 Cr | 161.35 Cr | 165.75 Cr | 185.53 Cr | 232.19 Cr |

The average growth of foreign tourists in the country over the last 20 years before covid had been tremendous and is growing at the rate of almost 8.45%.

**Domestic Tourists Visits in India for the last 5 years before Covid**

| | | |
|---|---|---|
| **2019** | **-** | **232.19 Cr** |
| **2018** | **-** | **185.37 Cr** |
| **2017** | **-** | **165.75 Cr** |
| **2016** | **-** | **161.53 Cr** |
| **2015** | **-** | **143.19 Cr** |

From the following table, we could see that Uttar Pradesh had become the upcoming Tourist Destination for the people. The number of tourists visiting the state had increased by almost 2.61 Times in the last 5 Years before covid. On the contrary, if we look at the State of Maharashtra, which in itself can be called mini-India because of the diversity that it had to offer, the growth of Tourism in these 5 Years had been very minuscule. Thus, as a Citizen of India and Maharashtra and having travelled extensively, witnessing the beauty of our State, it is sad to see the State not even reaching close to its tourism potential.


Thus, the travelling of tourists in India is huge and in the last 2-3 Years before covid, the number had gone up exponentially, the primary reason for this being the initiatives by GOI like Swadesh Darshan Scheme, PRASHAD (National Mission Pilgrimage Rejuvenation and Spiritual Augmentation Drive), UDAN (Ude Desh ka Aam Nagrik) and many such Schemes. These schemes primarily focused on infrastructure development, skill development, Human Resource Development and Promotion and Marketing.

Thus, as the members of the Maharashtra Chamber of Commerce, Industry and Agriculture, the apex Chamber of Maharashtra and the Hospitality Sector of Maharashtra being recently awarded Industry Status, it is our responsibility to propel this industry forward and make the state one of the leading tourist destinations in the Country in the coming years.

This article was part 1 in the series on the Tourism Industry which described the status of the Industry before Covid 19. In the next article, we will go on to describe the measures taken by the Government of India and Maharashtra to promote tourism during and after the covid era.



# महाराष्ट्रातील लॉजिस्टिक सुविधा वर्तमान स्थिती आणि अपेक्षा



**डॉ प्रशांत दत्तात्रय पटवर्धन**
९४२२०५२१३२
अध्यक्ष - रत्नागिरी जिल्हा इंडस्ट्रीज फेडरेशन

लॉजिस्टिक क्षेत्र हा औद्योगिक विकासाचा कणा मानला जातो. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रांची वाढ लॉजिस्टिक नेटवर्कच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. भारतात पुढील काही वर्षात या क्षेत्रात १०% वाढ होण्याची अपेक्षा आहे. इतर देशांच्या तुलनेत भारतात लॉजिस्टिकची किंमत जास्त आहे. इतर देशांत उत्पादन किमतीच्या सात ते आठ टक्के लॉजिस्टिक खर्च येतो, तर भारतात लॉजिस्टिक खर्च १७ ते १८ टक्के येतो. यामुळे जागतिक स्पर्धेत भारत मागे पडत आहे. जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी केंद्र सरकारने गतिशक्ती योजनेच्या माध्यमातून लॉजिस्टिक खर्च कमी करण्याचे दृष्टीने महत्त्वपूर्ण पावले टाकली आहेत, त्याचाच एक भाग म्हणून केंद्र सरकारने लॉजिस्टिक धोरण जाहीर केले आहे.

मालवाहतुकीसाठी रस्ते आणि रेल्वे यावर भारतातील उद्योग अवलंबून आहेत. रस्ते वाहतूक हा सर्वात महाग वाहतुकीचा प्रकार आहे. याचा ५९% वाटा आहे. तर रेल्वेचा ३५% वाटा आहे. सर्वात स्वस्त व किफायतशीर असणाऱ्या जल वाहतुकीचा ५% वाटा आहे, हवाई वाहतूक १% पेक्षा कमी आहे.

केंद्र सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने लॉजिस्टिक क्षेत्रातील सुलभता, पायाभूत सुविधांची उपलब्धता आणि गुणवत्ता, रस्त्यांची उपलब्धता आणि दर्जा, रेल्वे ट्रॅक आणि सुलभता, गोदाम उपलब्धता आणि दर्जा, लॉजिस्टिक सेवांची गुणवत्ता, कार्गो डिलिव्हरीची वेळेवरता, इतर राज्य सुविधा आणि समन्वय, नियामक प्रक्रियेची कार्यक्षमता, सुरक्षा, मोबाईल आणि इंटरनेट सुविधा या वर आधारित लॉजिस्टिक इझ अँक्रॉस डिफरेंट स्टेट ( Logistics Ease Across Different States) (LEADS) क्रमवारी तयार केली आहे. या क्रमवारीत महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक आहे तर गुजरातचा पहिला क्रमांक आहे. महाराष्ट्राच्या पुढे हरियाणा, पंजाब, तामिळनाडू यांचा क्रमांक वरचा आहे. महाराष्ट्र सरकारने २०१८ मध्येच लॉजिस्टिक धोरण जाहीर केले आहे. नवीन धोरण तयार करताना, या धोरणातून निर्माण झालेल्या सुविधा आणि उद्योगाला झालेले फायदे याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

सुविधांचे मॅपिंग

राज्यभरातील विद्यमान लॉजिस्टिक सुविधांची यादी करून त्याचे मॅपिंग करणे व त्या माध्यमातून विद्यमान लॉजिस्टिक सेवांचा नकाशा तयार करणे गरजेचे आहे. सुविधांच्या मॅपिंगमध्ये विद्यमान लॉजिस्टिक सुविधा व सेवा, राज्य आणि राष्ट्रीय रस्ते, व त्यांची अवस्था, रेल्वे नेटवर्कच्या क्षमता, जलवाहतूक आणि विमान वाहतुकीच्या सुविधा, मोबाईल व इंटरनेट ची सुविधा विचारात घेतल्या पाहिजेत. जलवाहतूक, बंदरे, रेल्वे नेटवर्क, विमानतळ आणि लॉजिस्टिक पायाभूत सुविधांच्या भविष्यातील गरजा विरुद्ध वर्तमान स्थिती याचा लेखाजोखा मांडणे आवश्यक आहे.

**विद्यमान सुविधांचा कार्यक्षम वापर**

सध्याच्या लॉजिस्टिक सुविधांचा वापर सुधारण्यासाठी विद्यमान सुविधांचे विविध मापदंडांवर मूल्यमापन करून त्याच्या सक्षमीकरणासाठी विविध प्रकारच्या सहाय्यभूत गोष्टी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

**स्टोरेज आणि हाताळणी सुविधांचा विकास**

कृषी उत्पादने,फार्मास्युटिकल्स, ई–कॉमर्स, इत्यादी क्षेत्रांमध्ये लॉजिस्टिक कार्यक्षमता सुधारण्यासाठी स्टोरेज व हाताळणी सुविधांचा विकास करण्यावर लक्ष केंद्रित कलेले पाहिजे. कृषी एकत्रीकरण आणि विघटन केंद्रे, प्रकाश प्रक्रिया केंद्रे, कोल्ड यासारख्या सुविधांचा विकास हाती घेतला पाहिजे. अशा विकासामुळे अन्न आणि इतर नाशवंत वस्तूंचा अपव्यय कमी होण्यास मदत होईल, ज्यामुळे रसद साखळीतील कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

किनारपट्टीचा फायदा महाराष्ट्राला ७२० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे.एकेकाळी या किनारपट्टीवरून फार मोठ्या प्रमाणावर जलवाहतुक केली जात होती. किनारपट्टीवरील असलेली बंदरे सक्षम करून नवीन बंदराची उभारणी करण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे व स्वस्त असलेल्या जलवाहतूकीला विकसित करणे गरजेचे आहे.

मल्टी मॉडेल कनेक्टिव्हिटी महाराष्ट्र राज्यामध्ये असलेल्या जल, रेल्वे, हवाई आणि रस्ते वाहतुकीच्या विविध वाहतूक प्रकारांचा एकात्मिक व अखंडित वापर करण्यासाठी सुलभता आणणे आवश्यक आहे. कोणत्याही वाहतूक प्रकारात सहजी स्थलांतरित होता आले पाहिजे व त्यामुळे वेळ आणि किंमत याची बचत झाली पाहिजे. यासाठी मल्टी मॉडेल कनेक्टिव्हिटीचे नियोजन करून वाहतुकीचा सक्षम पर्याय उभा केला पाहिजे.

मास्टरप्लॅन राज्य सरकारने या क्षेत्राची गरज लक्षात घेऊन तयार केलेल्या वाहतूक सुविधांच्या मॅपिंग नकाशाच्या आधारे, मास्टर प्लॅन तयार केला पाहिजे.मास्टरप्लॅन तयार करताना पुढील २५ वर्षात होणारा औद्योगिक विकास लक्षात घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करून भारतात लॉजिस्टिक वर होणारा खर्च नियंत्रित करण्याचां मुख्य उद्देश आहे हे लक्षात घेऊन मास्टर प्लॅन केला पाहिजे.

**उर्वरीत लेख पुढील अंकात...**

# महिला उद्योजकता अभियानासाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' व 'रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३०' यांच्यात सामंजस्य करार

## चेंबरची महिला समिती व रोटरी ची साक्षरता समिती यांचा सहभाग






**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' व रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० यांच्यामधील सामंजस्य करारावरप्रसंगी चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० च्या वतीने डिस्ट्रीक्ट गव्हर्नर डॉ. आनंद झुंझनवाला, चेंबरच्या महिला उद्योजकता समिती चेअरपर्सन सौ. संगीता पाटील दुसऱ्या छायाचित्रात मार्गदर्शन करताना सौ. संगीता पाटील.**

**शेगांव** : 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' चे महत्वपुर्ण राज्यस्तरीय 'महिला उद्योजकता अभियान' संयुक्तपणे संचलित करण्यासाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' व रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० यांच्यामधील सामंजस्य करारावर रोटरी ३०३० डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्स मध्ये शेगांव येथे स्वाक्षरी करण्यात आल्या.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' ची 'महिला उद्योजकता समिती' व रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० ची साक्षरता समिती संयुक्तपणे हा उपक्रम संचालित करण्याचा निर्णय या कराराद्वारे घेण्यात आला. महाराष्ट्र चेंबर तर्फे अध्यक्ष ललित गांधी व रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० च्या वतीने डिस्ट्रीक्ट गव्हर्नर डॉ. आनंद झुंझनवाला यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

तर चेंबरची महिला समिती व रोटरी ची साक्षरता समिती या दोन्ही समित्यांच्या प्रमुख या नात्याने सौ. संगीता पाटील यांनी करारावर स्वाक्षरी केली. सौ. संगीता पाटील यांनी प्रारंभी आपल्या भाषणातुन महिला उद्योजकता अभियानाची संकल्पना व माहीती दिली व डिस्ट्रीक्ट ३०३० च्या कार्यक्षेत्रातील सर्व रोटरी क्लबचे अध्यक्ष, सेक्रेटरी, साक्षरता समितीचे प्रमुख यांच्या सक्रीय सहभागातुन हा प्रकल्प यशस्वी केला जाईल असे सांगितले.

चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व डिस्ट्रीक्ट गव्हर्नर डॉ. आनंद झुंझुनवाला यांनी या अभियानास शुभेच्छा दिल्या व अशा प्रकारचे सामंजस्य करार महाराष्ट्रातील अन्य रोटरी डिस्ट्रीक्टस मध्येही करावेत अशी अपेक्षा केली.

### ललित गांधी यांनी फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ पिंपरी चिंचवड ला भेट



**महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ पिंपरी चिंचवड ला भेट दिली. याप्रसंगी चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा पुष्पगुच्छ देवुन सत्कार करताना असोसिएशन चे अध्यक्ष गोविंद पानसरे. सोबत संदिप भंडारी**



भारतीय उद्योगांसाठी युएइमधील विविध व्यवसाय संधी याविषयावर आयोजित बैठकप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, एमएसएमइ (पीआर) समितीचे चेअरपर्सन आशिष नहार, असोचेमचे उपसंचालक इरफान आलम, यूएई शारजाह, सैफ झोनचे पी. राजीव, अनुप वॉरियर, कार्यकारीणी सदस्य संजय राठी, मिलिंद राजपूत, संजय महाजन, संदिप सोमवंशी आदि.

# भारतीय उद्योगांसाठी युएइमधील विविध व्यवसाय संधी याविषयावर बैठक संपन्न

**नाशिक :** भारत आणि संयुक्त अरब अमिराती (UAE) यांच्यात नुकत्याच स्वाक्षरी झालेल्या 'व्यापक आर्थिक भागीदारी करार' अंतर्गत, भारतातून UAE मध्ये निर्यात केल्या जाणार्या बहुतांश मालावरील आयात शुल्क कमी किंवा कमी करण्याचे मान्य करण्यात आले आहे. या अनुषंगाने असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज ऑफ इंडिया (ASSOCHEM), महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर, अंबड इंडस्ट्रीज मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन आणि स्त्री उद्यमी फाउंडेशन यांच्या सहकार्याने SAIF झोनसह (शारजाह सरकार) जागतिक स्तरावर तुमचा व्यवसाय विस्तार आणि भारतीय उद्योगांसाठी णअए मधील विविध व्यवसाय संधी आणि SAIF झोनमध्ये व्यवसाय सुरू करण्याचे फायदे या विषयावर शारजाह (दुबई) सरकारच्या उच्च शिष्ट मंडळासोबत परिषद आणि बी२बी बैठक हॉटेल मेरियट कोर्टयार्ड येथे संपन्न झाले.

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, एमएसएमइ (पीआर) समितीचे चेअरपर्सन आशिष नहार, असोचेम चे उपसंचालक इरफान आलम, यूएई शारजाह, सैफ झोनचे पी. राजीव, अनुप वॉरियर, स्त्री उद्यमी फाउंडेशनच्या उपाध्यक्षा श्रीमती स्वाती शहा उपस्थित होते.

महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष सुधाकर देशमुख यांच्या हस्ते असोचेमचे उपसंचालक इरफान आलम, यूएई शारजाह, सैफ झोनचे पी. राजीव, अनुप वॉरियर यांचा उत्तर महाराष्ट्र शाखेचे को चेअरमन संजय सोनवणे, सैफ झोनचे पी. राजीव यांचा सत्कार कैलास पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

महाराष्ट्र चेंबर च्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (PR) कमिटी चेअरपर्सन आशिष नहार म्हणाले चेंबरचा ने विविध २१ देशांबरोबर सामंजस्य करार केला आहे. शतक महोत्सवी वर्षापर्यंत राज्यात ३६ महिला क्लस्टर, कृषी क्लस्टर व उत्पादन आधारित क्लस्टर महाराष्ट्र चेंबरतर्फे उभारण्यात येणार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात व्यापार उद्योगांनाही आधुनिक करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरतर्फे मोफत वेबसाईट व प उपलब्ध करून देण्यात येत आहे. भारत अमेरिका व्यापार उद्योग वाढविण्यासाठी व महाराष्ट्रात गुंतवणूक येण्यासाठी इंडो यूएस डेव्हलपमेंट फोरमची महाराष्ट्र चेंबरतर्फे स्थापना करण्यात आल्याचे सांगितले.

स्त्री उद्यमी फाउंडेशनच्या उपाध्यक्षा श्रीमती स्वाती शहा, अंबड इंडस्ट्रीज ॲण्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष निखिल पांचाळ यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे उत्तर महाराष्ट्र शाखेचे को चेअरमन संजय सोनवणे, कार्यकारिणी सदस्य रवी जैन, ललित नहार, हेमंत कांकरिया, सचिन शाह, संजय राठी, कैलास पाटील, मनिष रावल, भरत येवला, भावेश मानेक, मिलिंद राजपूत, स्वप्निल जैन यांच्या सह संदिप सोमवंशी, ललित बुब, अमित अलई, प्रमोद छाजेड, महेंद्र खैरनार आदिंसह व्यापारी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

MITEX
MAHARASHTRA INTERNATIONAL TRADE EXPO
17th to 26th February, 2023
Bandra Kurla Complex, Mumbai
MAHARASHTRA'S LARGEST TRADE FAIR
WRITING INSTRUMENTS
आपल्या व्यापार-उद्योगाच्या वाढीसाठी अवश्य सहभागी व्हा!
ORGANISED BY : MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY AND AGRICULTURE
REGISTER NOW

# आंतरराष्ट्रीय खरेदीदार कसे शोधायचे या विषयावर कार्यशाळा संपन्न





महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरतर्फे आंतरराष्ट्रीय खरेदीदार कसे शोधायचे या विषयावर शुक्रवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२२ रोजी कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत आंतरराष्ट्रीय व्यवसाय सल्लागार प्रशिक्षक अजित शहा यांनी आंतरराष्ट्रीय खरेदीदार कसे शोधायचे त्याचे म हत्त्व आणि प्रक्रिया उपस्थितांना समजावून सांगितली. तसेच निर्यात मार्केटिंग मध्ये कशाप्रकारे काम करावे यांची तांत्रिक माहिती दिली.

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, उत्तर महाराष्ट्र शाखा को चेअरमन संजय सोनवणे, एमएसएमई समितीचे चेअरमन आशिष नहार, प्रशिक्षक अजित शहा उपस्थित होते.

उपाध्यक्ष सुधाकर देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत केले व पुष्पगुच्छ देऊन प्रशिक्षक अजित शहा यांचा सत्कार केला. उत्तर महाराष्ट्र शाखा को चेअरमन संजय सोनवणे यांनी प्रास्ताविकात कार्यशाळेची थोडक्यात माहिती दिली व महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली. एमएसएमई समितीचे चेअरमन आशिष नहार यांनी आंतरराष्ट्रीय बाजारात खरेदीदार कसे शोधायचे हे कार्यशाळेत समजणार असून उपस्थित सर्वांना कार्यशाळेचा निश्चित फायदा होईल. तसेच आपल्या दर्जेदार उत्पादनांसाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ग्राहक मिळण्यास मदत होईल असे सांगितले. आभार प्रदर्शन सचिव विनी दत्ता यांनी केले. कार्यकारणी सदस्य रवींद्र झोपे, उद्योजक डॉ. श्रीहरी एस. टाकळीकर, सुदिप हासे, संदिप फटांगरे, सुहास सराफ, अतुल संघवी, कैलास पाटील, पूजा महाजन, आदींसह उद्योजक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



**महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष तनसुख झांबड यांनी बीड आणि गेवराई येथील व्यापारी संघटनेला भेट दिली. याप्रसंगी स्थानिक व्यापारी व उद्योजकांशी स्थानिक व राज्यस्तरीय व्यापार उद्योग क्षेत्रातील अडचणीबाबत चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच राज्यस्तरावरील समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र चेंबरमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले.**



**कोपरगाव तालुका किराणा मर्चंट असोसिएशनच्या वतीने युवा किराणा व्यापारी प्रोत्साहन सोहळा कार्यक्रमाप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष तनसुख झांबड, राम बंधु मसाल्याचे चेअरमन हेमंत राठी, किराणा मर्चंट असोसिएशनचे संस्थापक ओमप्रकाश कोयटे व पुरस्कारार्थी.**




नाशिक जिल्ह्यातील औद्योगिक समस्या व अडअडचणींच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी आयोजित बैठकीमध्ये उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांना निवेदन देतांना उपाध्यक्ष सुधाकर देशमुख समवेत कार्यकारीणी सदस्य हेमंत कांकरीया, भरत येवला, धनंजय बेळे, पालकमंत्री दादाजी भुसे, रतन पडवळ, रवि जैन, सचिन शहा, राजेंद्र कोठावदे.



दैनिक भास्कर समुहाचे चेअरमन मनमोहन अग्रवाल व संपादक प्रकाश दुबे यांनी महाराष्ट्र चेंबरच्या मुख्य कार्यालयात चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांची सदिच्छा भेट घेतली. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दैनिक भास्कर समुहाचे चेअरमन मनमोहन अग्रवाल यांना भगवद्‌गीता व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. अध्यक्ष ललित गांधी यांनी राज्यातील व्यापार उद्योगांच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबरतर्फे करत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली तसेच महाराष्ट्र चेंबरने राज्यातील व्यापारी उद्योगांना देश व परदेशातही स्थान मिळवून देण्यात महत्वाची भूमिका बजावत असल्याचे सांगितले. दैनिक भास्कर समुहाचे चेअरमन मनमोहन अग्रवाल यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती घेऊन महाराष्ट्र चेंबरच्या कार्याचे कौतुक केले व राज्यातील व्यापार उद्योगांना महाराष्ट्र चेंबर निश्चितच जागतिक स्तरावर स्थान मिळवून देण्यात यशस्वी होईल असे सांगितले. याप्रसंगी विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे उपस्थित होते.

## हार्दिक अभिनंदन!



महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारीणी सदस्य प्रकाश मालाडकर यांच्या ॲफेको हिटिंग सिस्टिम्स कंपनीला 'राष्ट्रीय ऊर्जा कार्यक्षमता इनोव्हेशन ॲवॉर्डस' अंतर्गत 'ऊर्जा कार्यक्षम ॲल्युमिनियम होल्डिंग फर्नेस' श्रेणीत पुरस्कार प्राप्त



महाराष्ट्र चेंबरचे सदस्य व शासकीय समन्वय समितीचे चेअरमन प्रदीप पेशकर यांचे जी-२० राज्य समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र चेंबर तर्फे हार्दिक अभिनंदन व भावी वाटचालीस शुभेच्छा!



दै. सकाळ तर्फे दिला जाणारा 'आयडॉल ऑफ सांगली' पुरस्कार महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे गव्हर्निंग काऊन्सिल मेंबर स्वप्निल शहा यांना मिळाल्याबद्दल महाराष्ट्र चेंबर तर्फे हार्दिक अभिनंदन व भावी वाटचालीस शुभेच्छा!

# बिझनेस जत्रा २०२२ उत्साहात संपन्न



**बिझनेस जत्रा २०२२ चे फित कापून उद्घाटन करतांना उद्योगमंत्री ना. उदय सामंत, दिपप्रज्वलन करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, कोसियाचे मानद सरचिटणीस निनाद जयवंत, वेल्थ गाईडचे संचालक अरुण सिंग.**

**ठाणे** : बिझनेस जत्रा २०२२ – सोहळा उद्योजकतेचा दिनांक ११ आणि १२ नोव्हेंबर २०२२ रोजी टीप टॉप प्लाझा, ठाणे येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

बिझनेस जत्रा २०२२ चे उद्घाटन उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते फीत कापून व महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, कोसियाचे मानद सरचिटणीस निनाद जयवंत, आणि वेल्थ गाईडचे संचालक अरुण सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी राज्य सरकारतर्फे राज्यातील उद्योग वाढीसाठी करत असलेल्या प्रयत्नांची व योजनांची माहिती दिली.


महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरतर्फे चेंबरतर्फे सर्व जिल्ह्यात कौशल्य विकास केंद्र सुरू करत असल्याची माहिती दिली. महाराष्ट्र चेंबरचा गौरवशाली इतिहास उपस्थितां समोर मांडला. महाराष्ट्र चेंबरच्या शतक महोत्सवी वर्षांकडे सुरू असलेल्या वाटचालीबाबत व उपक्रमांची माहिती दिली.

बिझनेस जत्रा २०२२ च्या माध्यमातून सर्व पातळीच्या उद्योजकांना, प्रोफेशनल व्यक्तींना, तज्ञांना, ग्राहकांना, पुरवठादारांना, बँकांना, आणि व्यावसायिक संघटनांना एका छताखाली एक आगळेवेगळे व्यासपीठ प्राप्त झाले. बिझनेस जत्रा २०२२ मध्ये १२० उद्योजकांनी सहभाग घेऊन आपल्या उत्पादन व सेवांचे प्रदर्शन सादर केले.

महाराष्ट्र चेंबर, कोसिया, टिसा, या संस्थांचे विशेष सहकार्य बिझनेस जत्रा २०२२ साठी लाभले. त्याचप्रमाणे MIDC, KVIC, NSIC, MSME Dept. भारत सरकार, ठाणे महानगरपालिका आणि ठाणे स्मार्ट सिटी कॉर्पोरेशन यांसारख्या शासकीय संस्थाचा देखील बिझनेस जत्रा २०२२ मध्ये सक्रिय सहभाग होता. टोटल ट्रान्सपोर्ट, Voltas, TJSB बँक, युनियन बँक, बँक ऑफ बडोदा, सारस्वत बँक, हावरे प्रॉपर्टीज, Nippon मुच्युयल फंड आणि पितांबरी यांसारखे अग्रणी ब्रॅण्ड्स बिझनेस जत्रा २०२२ मध्ये सहभागी झाले होते.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, ठाणे शहराचे माजी महापौर श्री. नरेश म्हस्के, विधानसभा अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर, खासदार श्री. राजन विचारे, श्री. केदार दिघे आणि दिग्दर्शक श्री. अभिजित पानसे यांनी बिझनेस जत्रा २०२२ ला भेट दिली.

त्याचप्रमाणे खास लघुउद्योजकांसाठी विविध क्षेत्रातील तज्ञ आणि दिग्गज व्यक्तींचे मार्गदर्शनपर परिसंवाद आयोजित करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त उद्योजक, गुंतवणूकदार आणि Venture Capitalist दिपक घैसास, चित्रपट दिग्दर्शक विजू माने, निसर्ग संवर्धनाच्या क्षेत्रात काम करणारे कोकणी रानमाणूस प्रसाद गावडे, प्रदीप पेशकार, संचालक – MSME बोर्ड भारत सरकार, मानसोपचार तज्ञ डॉ. राजेंद्र बर्वे आणि महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य

आमदार प्रसाद लाड यांसारख्या दिग्गजांनी उद्योजकांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी सांगता समारोहप्रसंगी महाराष्ट्र चेंबरच्या उपाध्यक्षा सौ. शुभांगी तिरोडकर, लक्ष्यवेधचे संस्थापक अतुल राजोळी व इतर मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सर्व स्टॉलधारक व पारितोषिक विजेत्यांना खास पारितोषिके त्यांच्या हस्ते देण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अनेक सभासद उपस्थित होते. बिझनेस जत्रा २०२२ म्हणजे उद्योजकांची एकजूट, संधीची लयलूट याची प्रचिती सर्वांना आली. दोन दिवसांत ५०००+ लोकांनी बिझनेस जत्रा २०२२ ला भेट दिली. लक्ष्यवेधी बाब म्हणजे प्रत्येक सहभागी उद्योजकांना व्यवसायासाठी ग्राहकांचे आणि पुरवठादारांचे उत्तम कनेक्ट्स मिळाले. विशेष म्हणजे Voltas च्या उत्पादनांना १३०+ ग्राहकांनी पसंती दिली आणि खरेदीची तयारी दर्शविली, तसेच Spacecom Worldwide या होम अप्लायन्सेस ब्रॅण्ड्ला बिझनेस जत्रा २०२२ मध्ये थेट ११ लाख रुपये किंमतीची ऑर्डर मिळाली.



**समारोहप्रसंगी मार्गदर्शन करतांना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्षा सौ. शुभांगी तिरोडकर.**






# PLOT FOR SALE

Plot for Sale at Ambad MIDC, Nashik-422010

Area – 7962 Sq Mtr.

Contact:

MR. HEMANT PABALKAR

Mobile: 9819448899

Email: hemantpabalkar@gmail.com





**निर्यात  इन्सेंटिव्ह (प्रोत्साहन) योजना कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना उत्तर महाराष्ट्र शाखेचे को-चेअरमन संजय सोनवणे समवेत, प्रशिक्षण अजित शहा, पुरूषोत्तम शालिग्राम व सहभागी उद्योजक, अधिकारी.**

# ‘निर्यातीवर इन्सेंटिव्ह कसा मिळवायचा’ या विषयावर कार्यशाळा संपन्न

महाराष्ट्र चेंबर ऑफ  कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर तर्फे निर्यात  प्रोत्साहन योजना (Export Incentive) या विषयावर बुधवार दिनांक २१ डिसेंबर २०२२  रोजी कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेत आंतरराष्ट्रीय व्यवसाय सल्लागार प्रशिक्षक अजित शहा यांनी अनेक उद्योजकांना निर्यात होणाऱ्या मालावर सरकारकडून इन्सेंटिव्ह मिळतो यांची माहिती नसल्याने त्यामुळे उद्योजकांचे आर्थिक नुकसान होते. उद्योजकांसाठी शासनाच्या प्रोत्साहनपर योजना आहेत त्यापैकीच ‘निर्यात इन्सेंटिव्ह’ योजनेची माहिती देतांना निर्यातीवर मिळणारा इन्सेंटिव्ह कसा मिळवायचा, त्याचे महत्त्व आणि प्रक्रिया याची सविस्तर माहिती उपस्थितांना सम जावून सांगितली. तसेच निर्यात मार्केटिंग मध्ये कशाप्रकारे काम करावे, यांची तांत्रिक माहिती उपस्थितांना दिली.

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र शाखेचे को-चेअरमन संजय सोनवणे, महाराष्ट्र चेंबरचे सदस्य पुरुषोत्तम शालिग्राम, प्रशिक्षक अजित शहा उपस्थित होते.

को-चेअरमन संजय सोनवणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व  पुष्पगुच्छ देऊन प्रशिक्षक अजित शहा यांचा सत्कार केला. उत्तर महाराष्ट्र शाखा को चेअरमन संजय सोनवणे आणि पुरुषोत्तम शालिग्राम यांनी प्रास्ताविकात कार्यशाळेची थोडक्यात माहिती दिली आणि महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली.

उत्तर महाराष्ट्र शाखेचे को- चेअरमन संजय सोनवणे यांनी आंतरराष्ट्रीय बाजारात निर्यातीवर इन्सेंटिव्ह कसा मिळवायचा हे आजच्या कार्यशाळेत समजणार असून उपस्थित सर्वांना या कार्यशाळेचा निश्चित फायदा होईल. तसेच आपल्या दर्जे दार उत्पादनासाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ग्राहक मिळण्यास मदत होईल असे सांगितले. आभार प्रदर्शन सचिव विनी दत्ता यांनी केले.  बेदमुथा  इंडस्ट्रीज, अनिश फ ार्मा इक्विप प्रायव्हेट लिमिटेड, गोदावरी इक्विपमेंट प्रायव्हेट लिमिटेड आदीसह विविध  कंपनीतर्फे उद्योजक सहभागी झाले होते तसेच सिन्नर, निफ ाड, कोपरगाव आणि गुजरात मधील उद्योजक सुद्धा मोठ्या संख्येने सहभागी  झाले होते. कार्यशाळेत सहभागी उद्योजक व अधिकाऱ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

## हार्दिक अभिनंदन!



**कॅटचे नाशिक जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संजय सोनवणे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करतांना कॅटचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सचिन निवांगुणे, समवेत महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष सुधाकर देशमुख, ट्रेड असोसिएशन समिती उत्तर महाराष्ट्र चेअरमन प्रफल्ल संचेती. महाराष्ट्र चेंबरच्या सदस्या निलिमा पाटील यांची महिला संघटकपदी निवड झाली तर मेहुल थोरात यांची महाराष्ट्र सहसचिवपदी निवड झाली**

## PRAKASH STEELAGE LTD

### PRAKASH GROUPS

Mr. Prakash C. Kanugo, is the Promoter, Chairman & Managing Director of the Company. He established Prakash Steelage Ltd. in the year 1991. Prakash Steelage Ltd. is a flagship company of the Prakash Group.

PSL got listed in both of the stock exchanges “BSE and NSE” in the year 2010 and engaged in the manufacturing of welded stainless steel Pipes, Tubes, and U-tubes. Prakash Steelage Ltd. is an ISO 9001: 2008 & PED Certified Company and also a “Govt. Recognized Star Export House” exporting to several MNCs into more than 40 countries across the Globe.

The Company entered into a joint venture agreement in the year of 2015 with Tubacex S.A. Spain, a world leader in the manufacturing of seamless stainless steel tubes for its seamless division at its factory with the name of Tubacex Prakash India Pvt. Ltd. Umbergaon (Gujarat). The Joint Venture was in force till March 2021. Also, have had a Silvassa manufacturing plant since 1996.

Head Office: 101, 1st Floor, Shatrunjay Apartment, 28, Sindhi Lane, Nanubhai Desai Road, Mumbai- 400004, Maharastra, India

Plant: Survey No. 46/1, Village Kherdi, U.T. of Dadra & Nagar Haveli, Silvassa (India).

+91-22-6613 4500

sales@prakashsteelage.com




Umbergaon

### PROJECT - UMBERGAON, GUJARAT

Prakash Land Developers combines the expertise of its promoters Mr. Hemant Kanugo & Mr. Jagdish Chandan in the area of industrial plants, plot development, bungalow projects, and Commercial & residential projects across several states.

Driven by the passion to deliver high-quality projects with technical superiority and superior living experiences, Prakash Land Developers continues to exceed expectations with every project. Very close to Railway station, Jain temple, Schools, and Market place.

Regional Office: Plot No. 33 GIDC Colony, Opp. Police Station, Near Garba Mandal, Umbergaon - West. Umbergaon 396171 District Valsad. Gujarat

prakashprojects.com

+91 98203 09051

Site Office: New Survey No - 48 & 49, At Dahad, Umbergaon Station Road, Taluka Umbergaon, Dist - Valsad, Gujarat. 396165

### KRISHNA INDUSTRIAL PARK



UMBERGAON - GUJARAT

This Industrial Park in the town of Umbergaon in South Gujarat was designed and developed to provide newly built and infrastructure-ready industrial plots for factories, warehouses, workshops, service stations, etc. This park is set upright on state highway 5 connects to the major national highway 8 and other highways and is just a few kilometers from the Umbergaon Road Railway station offering excellent road and rail connectivity.

### PRAKASH INDUSTRIAL PARK



WAVANJE (TALOJA) - MUMBAI

Vavanje is a developing node, for all industrialists, Manufacturers, and warehousing companies, the leaders have preferred to travel all the way to locations like Taloja.

Navi Mumbai International Airport is a greenfield international airport located at Panvel/Uran, It will be the extension to the existing Chhatrapati Shivaji Maharaj International Airport as India's first urban multi-airport system.



केंद्रीय मंत्री राणे : महाराष्ट्रातील युवक, महिला उद्योजकांना मिळणार प्रोत्साहन

## महाराष्ट्र चेंबर, एमएसएमई मंत्रालय संयुक्त अभियान राबवणार

लोकनामा

नवभारत

महाराष्ट्र चैंबर ऑफ कॉमर्स के अध्यक्ष ललित गांधी का प्रतिपादन

## ई-कॉमर्स कंपनियों से बढ़ी परेशानी

महिला उद्यमियों की समस्याएं होंगी हल

लोकमत

## विदर्भ औद्योगिक विकासाचे धोरण ठरणार

विदर्भ विकास परिषद २०२२ : औद्योगिक क्षेत्राचा आढावा घेणार

## नॉनओव्हन बॅग्ज, पेपर उत्पादने बंदिमुक्त

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या मागणीला यश : ललित गांधी

या वस्तूंवरील बंदी उठवली

१८९ आयटीआय अत्याधुनिक करणार • महाराष्ट्र शासनासह सामंजस्य करार; १० हजार रोजगार वाढणार

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स वर्षभरात उभारणार १० कौशल्य विकास केंद्र

पहिल्या टप्प्यात १० हजार तरुणांना रोजगार मिळणार

पुढारी

## महाराष्ट्रातील विमानसेवेला गती देणार

महाराष्ट्र चेंबरच्या बैठकीत ज्योतिरादित्य सिंधिया यांची ग्वाही

Nashik Edition
Dec 4, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

लोकमत

## सोलापूरच्या विमानसेवेची चर्चा आता होणार दिल्लीत

ज्योतिरादित्य शिंदेंची भेट : चेंबरच्या पदाधिकाऱ्यांना निमंत्रण

न्यूज अपडेट्स

उपोषणाची दिली माहिती

Solapur Main
Page No. 2 Nov 26, 2022
Powered by: erelego.com

पुढारी

## 'फिक्की'च्या संचालकपदी ललित गांधी यांची हॅट्ट्रिक

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

LOKMAT TIMES

## Projects worth ₹41K cr sanctioned for Vid

MACCIA to prepare roadmap for development of each district of Maharashtra

Uday Samant speaks

Nidhhay Udyog Scheme to be implemented

लोकमत

## 'चेंबर ऑफ कॉमर्स'कडे उद्योजकांनी मांडली गाऱ्हाणी!

डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट फोरमची स्थापना होणार

Jalgaon Main
Page No. 2 Dec 25, 2022

**Date of Publish : 24th January 2023** **Page No. 1 to 60**
WPP License No.: NMR/Tech/WPP-21/Nashik/2022-23 License to Post without prepayment. Posted on 24th January 2023 at Nashik
Head office Regd. No: NSK/RNP-82/2021-2023. Registered with Regr. of News Papers for India, Delhi under Regd. No. 20803/71


# Maharashtra's Largest Trade Fair

# MiTEX

## Maharashtra International Trade Expo

17th-26th FEBRUARY 2023

BANDRA KURLA COMPLEX, MUMBAI



| | |
|---|---|
| INTERNATIONAL PAVILION | INTERIORS AND HOME DECOR |
| GOVERNMENT AND STATE PAVILION | BEAUTY, HEALTH AND FITNESS |
| ELECTRONICS AND DURABLES | PROCESSED FOOD |
| TEXTILES / FASHION & ACCS. | FARM AND AGRO |
| AUTOMOBILE-FOCUS ON EV | TRAVEL AND TOURISM |
| REAL ESTATE DEVELOPMENT | WRITING INSTRUMENTS |
| BUILDING MATERIALS | STATIONERY AND GIFT ARTICLES |

**Highlights**

- Delegations from various countries • TIE-UPS with Domestic & International trade bodies
- Seminars and Conferences • Cultural Programmers • Buyer Seller Meets

Supported by

Register now..

ORGANISED BY

MACCIA 100

Maharashtra Chamber of Com. Industry & Agriculture

FOR DETAILS CONTACT

**SAGAR NAGARE**, Secretary General
**Mob.: 9870417866 / 8286008977** • Email: sagar@mitex.in
**AKSHITA MENON**, Manager – Sales
**Mob.: 9326697879 / 9326681330** Email: akshita@mitex.in
**Web: www.mitex.in**


हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक विनी दत्ता यांनी मालक महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर यांचेकरीता विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स, सातपूर, नाशिक-७ येथे छापुन २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक-१ येथे प्रसिध्द केले.

If undelivered please return to:
Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture
201, Sarda Sankul, Vakil Wadi, M.G. Road, Nashik-1